# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. १८/०५/२००६

आज दि. १८/०५/२००६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची दि. १८/०५/२००६ रोजीची तहकुब महासभा दुपारी १२.०० वाजता सभा सुचना क्र. ०२ दि. ०८/०५/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ४) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सभापती, स्थायी समिती |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सभापती, महिला बालकल्याण |
| ७) | श्रीम. उर्मिला कोमल भामरे | उप-सभापती, महिला बालकल्याण |
| ८) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ९) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| १०) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| ११) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| १२) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १३) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १४) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १५) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १६) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १७) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १८) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १९) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २०) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २१) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २२) | श्री. नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| २३) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| २४) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २५) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २६) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २७) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| २८) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| २९) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३०) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३१) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३२) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ३३) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ३४) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ३५) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ३६) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | सदस्या |
| ३७) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ३८) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ३९) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४०) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४१) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ४२) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ४३) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ४४) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ४५) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ४६) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ४७) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ४८) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ४९) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ५०) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ५१) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ५२) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ५३) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ५४) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ५५) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ५६) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ५७) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ५८) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ५९) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ६०) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ६१) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ६२) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ६३) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ६४) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सदस्य |
| २) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ३) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| ४) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ५) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| ६) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ७) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ८) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ९) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| १०) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ११) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| १२) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| १३) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |

## रजेचा अर्ज दिलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ३) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ४) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ५) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ६) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ७) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |

वरीलप्रमाणे महासभेकरिता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यास सांगितले. त्यानुसार वंदे मातरम् राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

(नगरसचिव ह्यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**मा. महापौर :-**

१८ मे, २००६ रोजीची तहकूब मा. महासभा. नमस्कार. महानगरपालिकेचे उपमहापौर चंद्रकांत वैतीजी, आयुक्त सुदामराव गायकवाड साहेब, तसेच स्थायी समितीचे सभापती तुळशीदास म्हात्रे साहेब, महिला व बालकल्याण समितीचे सभापती सभागृह नेते हॅरल बोर्जीस साहेब, विरोधी पक्षनेते परशुराम पाटील साहेब, शिक्षण मंडळाचे सभापती श्री. प्रकाश ठाकूर साहेब, परिवहन सेवा समिती सभापती शांताराम ठाकूर साहेब, सर्व गटनेते व प्रभाग समितीचे अध्यक्ष, सन्मा. नगरसेवक, नगरसेविका, सचिव श्री. हरेश पाटील साहेब, सर्व सन्मा. उपायुक्त, सर्व खात्यांचे अधिकारी वर्ग, वृत्तपत्रांचे प्रतिनिधी व प्रेक्षक गॅलरीत बसलेले सर्व बंधू आणि भगिनिंनो आपणांस सांगण्यास आनंदाची बातमी अशी की, आपल्या समोर गेल्या मा. महासभेमध्येच श्री. मिल्टन डिसोझा ह्यांचे आपण अभिनंदन करून त्यांना पुढील खेळासाठी शुभेच्छा व पन्नास हजाराचे अनुदान दिले होते. श्री. मिल्टन डिसोझा ह्यांनी त्याचे चीज केल्याचे दिसून येते. श्री. मिल्टन डिसोझा ह्यांनी आपल्या मिरा भाईंदर शहराचे आणखीन एक मानाचा तुरा रोहिला आहे. त्याने वर्ल्ड किंग बॉक्सींग चॅम्पीयनशीप मध्ये तिसरे पारितोषिक मिळवून मिरा भाईंदर शहराचा मान वाढविलेला आहे. त्यांचे अभिनंदन. तसेच, क्रिडा समाजकल्याण सांस्कृतीक समिती सभापती पदी सौ. अनिता पाटील, माध्यमिक पूर्व प्राथमिक शिक्षण समिती सभापती सौ. हेलन जॉर्जी, आरोग्य शिक्षण समिती सभापती श्री. रोहीदास आत्माराम पाटील साहेब, तसेच गलिच्छ निर्मूलन समिती सभापती श्री. चिंतामण पाटील ह्यांची नियुक्ती करून त्यांना सभापती निवडण्यात आले. त्यांना ही शुभेच्छा. तसेच, महानगरपालिकेत नुकतेच शिक्षण मंडळ अध्यक्ष पदी श्री. प्रकाश ठाकूर ह्यांची नियुक्ती करून त्यांना बहुमान दिलेला आहे. या सर्वांना शुभेच्छा आणि पुढील कारकीर्दीसाठी हार्दिक शुभेच्छा. धन्यवाद. तसेच, नुकतीच घडलेली घटना म्हणजे मिरा भाईंदर हद्दीतील चेना येथे घडलेली दुर्घटना, या सर्व मृतांना आपल्या मिरा भाईंदर शहारातर्फे छोटेसे सहकार्य, एक मदत म्हणून मृतांना पंचविस हजार रूपये तर जखमींना दहा हजार रूपये असे देण्याचे मी घोषित करत आहे. धन्यवाद. सचिवजी कामकाजाला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराच्या तासाला सुरूवात होत आहे. पहिला प्रश्न हा श्री. रतन कृष्णा पाटील यांचा आहे. श्री. रतन कृष्णा पाटील हे गैरहजर आहेत

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदया, सन्मा. सदस्य रतन कृष्णा पाटील हे गैरहजर आहेत. परंतु, गेल्यावेळेला आपण झोपडपट्टीच्या संदर्भामध्ये सुभाषचंद्र बोस मैदान.....

**नगरसचिव :-**

आपल्याला जर त्यांच्या प्रश्नावर बोलायचे असे तर आपल्याला त्यांची परवानगी घ्यावी लागेल.

**अनंत पाटील :-**

कारवाई काहीच झालेली नाही ना! गेल्या वेळेला अर्धवट कारवाई आपण पुर्ण केली होती.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या.

**नगरसचिव :-**

पुढील प्रश्न ५० क्रमांकाचा, ओमप्रकाश अग्रवाल ह्यांचा प्रश्न आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, हा जो विषय आहे तर बहूतेक दोन वर्ष या विषयाला झालेली आहेत. या विषयाचा सर्वप्रथम मी ह्याच मा. महासभेमध्ये विषय उपस्थित केला होता. मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये एकूण महापालिकेचे मालकीचे भाडे, किंवा त्यांनी दिलेले गाळे यामध्ये स्थायी समितीने केलेले निर्णय आणि मागच्या दोन वर्षापासून मी स्थायी समितीने केलेल्या ठरावाबद्दल अनेकवेळा अधिकाऱ्यांशी संपर्क करून, अधिकाऱ्यांना पत्र देउन विचारपूस केली असतानाही त्याचे मला उत्तर मिळाले नाही. हा प्रश्न बघितला तर हा महापालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे. हा कुठला व्यक्तिगत प्रश्न नाही. महापालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने हा विषय आहे. आज आपण जे उत्तर दिलेले आहे त्या उत्तराचे उपप्रश्न म्हणून लेखी स्वरूपात सचिव साहेबांना पत्र देतोय, पुन्हा उपप्रश्न उपस्थित करत आहे. त्या उपप्रश्नाचे उत्तर संबंधित अधिकाऱ्यांनी द्यावे. मी एक एक प्रश्नाचे वाचन करणार आहे. लेखी स्वरूपात हे प्रश्न मी आपल्याला देत आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, अशा स्वरूपाचे लेखी प्रश्न सभागृहामध्ये आपण घेउ शकतो का? तसे झालेतर कालांतराने प्रत्येक सदस्य हा अशा स्वरूपाचे लेखी प्रश्न सन्मा. सदस्यांना जे काही प्रश्न विचारायचे असतील तर मा. महापौर साहेबा त्यांनी त्यांच्या भाषणाच्या स्वरूपात, त्यांचे मुद्दे

मांडण्याच्या स्वरूपात त्यांनी विचारायला पाहिजे. अशी आमची धारणा आहे. तरी ह्याबद्दल आपण रूलिंग द्यावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, याच महापालिकेच्या याच सभागृहामध्ये विद्यमान आमदार मुझफ्फर हुसेनजी आणि त्यावेळचे उपमहापौर मुझफ्फर हुसेनजी ह्यांना जेव्हा हे प्रश्न विचारले होते आणि त्याच्यावर उपप्रश्न विचारण्याकरिता मी प्रश्न उपस्थित केला तेव्हा त्यांनी लेखी स्वरूपामध्ये द्यावे असे सांगितले पाहिजे तर त्या महासभेची प्रोसिडींग तुम्ही वाचावी. त्यानंतर कधी अशी परिस्थिती आली नाही की, लेखी द्यावे म्हणून. पण काही वेळ कमी जावा व माझ्या प्रश्नामध्ये कोणी हस्तक्षेप करू नये आणि थोडक्यामध्ये जर प्रशासनाला उत्तर देता आले तर द्यावे म्हणून मी लेखी स्वरूपामध्ये दिलेले आहे जर ते मान्य नसेल तर माझा उपप्रश्न माझ्या व्यक्तिशः स्वरूपाने विचारत आहे. त्याचे उत्तर द्यावे.

**याकुब कुरेशी :-**

आता सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेबांनी विचारले, जो प्रश्न आहे त्याच्या संदर्भात खुलासा केला तर बरे होईल.

**मा. महापौर :-**

संबंधित अधिकाऱ्यांनी, सन्मा. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देण्यात यावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझा प्रथम उपप्रश्न आहे. स्थायी समिती दि. २८/०५/२००३ ठराव क्र. १८ अन्वये गाळेधारकांकडून मासिक रू. ६००/- व मटण विक्रेत्याकडून रू. ८००/- निश्चित करण्यात आले. सदर बाबतचा आदेश करविभाग ह्यांना मिळाला आहे का? कोणत्या तारखेस?

**विजय पाटील :-**

सदर बाबतचा ठराव कर विभागास प्राप्त झालेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कोणत्या तारखेस?

**विजय पाटील :-**

तारीख आता सांगता येणार नाही. ठराव आम्हाला प्राप्त झालेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण तारीख बघा ना. भुईभाडे संबंधी विषय आहे. तुम्ही सगळे आणले असेल ना?

**विजय पाटील :-**

स्थायी समिती सभा दि. १३/११/०३ रोजी ठराव क्र. १४६ प्रमाणे प्रकरण क्र. १६६ ठराव क्र. १४६ आम्हाला मिळालेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बरोबर आहे.

**विजय पाटील :-**

होय.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यानंतर तो ठराव मिळाल्यानंतर एकूण किती धारकांपैकी, किती भाडेकरूंकडून किती रक्कम जमा केलेली आहे. जे भाडे निश्चित केलेले आहे. म्हणजे जे दुकानदार आहेत त्यांच्याकडून सहाशे, माझ्या माहितीप्रमाणे आणि जे मटन विक्रेते आहेत त्यांच्याकडून आठशे रुपये ते एकूण एकशे वीस गाळे माझ्या माहितीप्रमाणे आहेत. त्याच्यातले किती धारकांकडून आपण भाडे वसुल केले आहे. ह्या विषयाला दोन वर्षे झाली. तुम्हाला तो ठराव मिळालेला आहे. दोन वर्षामध्ये.......

**विजय पाटील :-**

२००५-०६ मध्ये रु. ४०,१५८/- वसूल केलेले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अपेक्षित किती आहे? एकूण धारकांकडून अपेक्षित किती आहे?

**विजय पाटील :-**

मी आपल्याला एकूण मागणी सांगतो. एकूण मागणी आहे रु. १,१७,८६६/-

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे दोन वर्षाची आणि मागची मागणी आपण पकडतच नाही आणि आता वसूल किती झाली आहे?

**विजय पाटील :-**

४०,१५८ रुपये.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे एक टक्का पण वसूल झालेली नाही.

**विजय पाटील :-**

बरोबर आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याबाबत प्रशासनाने सांगावे की, का वसूल केले नाही किंवा धारक देत नाही किंवा तुम्ही वसूल करण्यामध्ये अकार्यक्षम आहे म्हणजे शेवटी हा महापालिकेचा पैसा आहे.

**विजय पाटील :-**

आमची वसूलीची कार्यवाही चालू आहे. त्या सगळ्यांना बिले बजावलेली आहेत. सर्व मासळी विक्रेते आणि मटन विक्रेते गाळे धारक आहेत त्या सगळ्यांना आम्ही महानगरपालिकेकडून, कर विभागाकडून बिले बजावलेली आहेत आणि जे लोक पैसे भरणार नाहीत त्यांच्यावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका कायद्यान्वये त्यांच्यावर आम्ही कारवाई करणार आहोत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कारवाई करायला दोन वर्षाची मिळून अकरा लाखाची मागणी आहे. मागची तर सोडून द्या, त्या ठरावाच्या आधीची ती रक्कम तुम्हाला सांगतच नाही. ह्या अकरा लाखापैकी तुम्ही एक टक्का पण वसुल केलेली नाही आणि आता तुम्ही नियम सांगतात, कारवाई म्हणजे बाकींच्या वर किती दिवसामध्ये कारवाई करणार? काय करणार? ते सांगू नका. तुम्ही कारवाई का केली नाही आणि कारवाई किती दिवसात केली पाहिजे होती ह्याचे आपण पहिल्यांदा उत्तर द्या. आपण करणार आहोत हे आम्ही प्रत्येक वेळी तुमच्या उत्तरामध्ये माझ्याकडे दहा उत्तर आहे.

**विजय पाटील :-**

मार्च २००६ पर्यंतची सगळी बिले दिलेली आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बिल दिलेली आहेत २००४-०५-०६. आपण मला हे उत्तर द्या की, एक टक्का पण वसुली झालेली नाही.

**विजय पाटील :-**

बरोबर आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बरोबर आहे ना?

**विजय पाटील :-**

होय.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्याला जबाबदार कोण आणि तुम्ही ज्या लोकांनी भरलेले नाही. तुम्ही प्रांतिक नियम, हे ते नियम ह्याच्यावर नोटीस दिलेली आहे. तर त्या नोटीसची पण काही मर्यादा असते. एक मर्यादा असते, दहा दिवस, पंधरा दिवस तीही गेलेली आहे. त्याबद्दल आपण कोणावर कारवाई करणार आहात? स्वतःवर कारवाई करून घेणार आहात की, त्या भाडेकरूंवर कारवाई करणार आहात?

**विजय पाटील :-**

या आधी तुम्हाला सविस्तर असे निवेदन करतो की, महानगरपालिकेची घरपट्टीची वसुली फार महत्वाची आहे. घरपट्टीच्या वसुलीमध्ये आपला सगळा स्टाफ लागलेला होता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

घरपट्टीचा विषय आणि हा विषय आपण मिक्स करू नका. आयुक्त साहेब, आपण या विषयावर लक्ष घाला कारण दोन वर्षापुर्वी तत्कालिन आयुक्त आर. डी. शिंदे साहेब होते. त्यांना ही बाब लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनी ही बाब चांगली आहे. महापालिकेच्या उत्पन्नाची बाब आहे आणि त्यांनी ताबडतोब स्थायी समितीमध्ये हा ठराव करून हा विषय विषयपटलावर आणला. म्हणजे अधिकारी वर्ग तीन वर्षानंतर मागणीमध्ये फक्त एक टक्का ही वसुल करू शकत नाही. म्हणजे ह्याच्यावर अधिकाऱ्यावर कारवाई करणे योग्य आहे का, नाही. हे आपण सांगावे.

**विजय पाटील :-**

आम्ही बिले बजावलेली आहेत आणि जे थकबाकीदार आहेत त्यांच्यावर वसूलीची कारवाई चालू आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

काय वसूली चालू आहे. म्हणजे तुम्ही बाकीच्या लोकांना घरपट्टी भरली नाहीतर त्यांच्या घराला तुम्ही सिल करतात. त्याला वॉरंट फी, व्याज फी किंवा त्याची जप्ती करून लिलावाचे आदेश वाचा तुम्ही काय केलेले आहे आणि मला त्याची सत्यप्रत द्या. वसुली केली असेल तर त्याची मला सत्यप्रत द्या.

**परशुराम पाटील :-**

साहेब, जर आपल्याला त्यांच्या प्रश्नाचे उत्तर देता येत नसेल तर माझे प्रामाणिक मत आहे की, त्याला बिल वसुली करायची मुदत आहे ना. मग त्या मुदतीच्या आतमध्ये वसुल करणार असे तुम्ही त्यांना सांगा ना.

**विजय पाटील :-**

साहेब, वसुली करतोय ना. वसुली थांबावलेली नाही. वसुलीची कार्यवाही चालू आहे.

**परशुराम पाटील :-**

मग वसूली का झाली नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभागृह नेते साहेब, ११ लाखाची मागणी आणि ४० हजार रूपये वसुली. आपण या भाईंदर शहराचा विकास करायला चाललो आहोत. तुम्ही पण विचार करा. म्हणजे अधिकाऱ्यांना तुम्ही पाठीशी घालू नका. ११ लाखाच्या मागणीमध्ये फक्त ४० हजार रूपयाची वसुली ही मा. महासभेसाठी गंभीर बाब आहे. म्हणजे महानगरपालिकेचे उत्पन्न अधिकाऱ्यांना वसुल करण्याचे काही, मी माहितीच्या अधिकाराखाली प्रश्न दिलेला आहे. मला माहितीच्या अधिकाराच्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. अधिकारी कुठेतरी नियमात सापडू नये म्हणून त्याचा मी पाठपुरावा केला नाही.

**मोहन पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये........

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, माझा प्रश्न आहे. मा. महापौर मॅडम, माझ्या प्रश्नाची वेळ सपली असेल आणि नंतर त्यांना जे काही बोलायचे असेल ते त्यांनी बोलावे. फुकट आपण प्रत्येकवेळी सभेमध्ये विषयांतर करतो.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्यांनी माहितीच्या अधिकारामध्ये माहिती मागवली आणि त्यांना माहिती दिली नाही हे कसे होईल?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण विषयाचे विषयांतर करत आहात. हे बरोबर नाही.

**मोहन पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची येथे बसलेली जी लोक आहेत, त्या लोकांना.......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आपण हा ठराव केलेला होता आणि मा. महासभेचा हा विषय महापालिकेच्या उत्पन्नाचा विषय आहे. कुठल्यातरी राजकारणाचा किंवा कुठल्यातरी प्रसिद्धी घेण्याचा हा विषय नाही. मी कुठल्यातरी राजकीय पक्षाची प्रसिद्धी घेत नाही. हा प्रसिद्धीचा प्रश्न नाही. म्हणजे किती अकार्यक्षमपणाने होत आहे आणि आता परत ठराव.......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपला जो प्रश्न आहे त्या तेवढ्या प्रश्नाबाबत आपण तेवढे बोला. आपल्याला त्यांच्याकडून काय उत्तर अपेक्षित आहे ते बोला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणून विचारले ना.

**मा. महापौर :-**

बाकी इतर पक्षांनी काय केले आहे आणि काय करायला पाहिजे ते तुम्ही वक्तव्य करू नका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कुठे, आम्ही काय वक्तव्य केले?

**मा. महापौर :-**

आपला जो प्रश्न आहे तेच बोला. आपल्याला जे उत्तर अपेक्षित आहे ते मिळेल.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल ह्यांचा जो प्रश्न होता त्याला उपप्रश्न म्हणून त्यांनी आपल्याला जे पत्र दिलेले आहे. सन्मा. आयुक्त साहेब, मागील सन २००५-०६ आर्थिक वर्षामध्ये बिले इश्यु केलेली आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेबा, ही पद्धत बरोबर आहे. त्यांनी बोलायला आमची हरकत नाही. तुम्ही बाकीच्या लोकांनी प्रश्न विचारल्यानंतर त्याला हस्तक्षेप करू देत नाही आणि हा प्रश्न आहे आणि ह्या प्रश्नामध्ये सभागृह नेता किंवा विरोधी पक्षनेता ह्यांच्यामध्ये भाषण होत नाही. जे अधिकारी वर्ग आहेत किंवा त्या संबंधित खात्यातला अधिकारी आहे किंवा व्यास पीठावर जर मंत्री असेल तर त्यालाच फक्त उत्तर देण्याचा अधिकार आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपका जो प्रश्न है, उसके फेवरेबलमे ही बोल रहा हूँ। आपसे कुछ निगेटीव नही बोल रहा हूँ।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, माझा वेळ वाढवून देणार आहे का?

**हॅरल बोर्जीस :-**

मॅडम, प्रशासनाकडून २००५-०६ ची बिल इश्यू झाली होती. त्याच्यावर कार्यवाही व्हायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रत्येकवेळी मा. महासभेत आपण ह्या पद्धतीने गोंधळ घालण्याचा प्रयत्न करतात ती बाब बरोबर नाही. महापालिकेने बिल पाठवली, बिल पाठवल्यानंतर......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, सभागृह नेत्यांना दोन मिनिट बोलू द्या. त्यांना त्यांचे मत व्यक्त करू द्या. आपण बसून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांनी हा प्रश्न .....

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, ही पद्धत योग्य नाही. जेव्हा सभागृह नेते हे ह्या सभागृहाचे नेते आहेत ते बोलत असताना पुन्हा पुन्हा त्यांच्या वाक्यावर त्यांना हस्तक्षेप करत आहे हे चुकीचे आहे ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभागृह नेत्यांनी अगोदर माहिती घेतली पाहिजे होती.

**आसिफ शेख :-**

सभागृह नेते अत्यंत सक्षम आहेत. त्यांना व्यवस्थित चांगली माहिती आहे. ते खुलासा करत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, सभागृह नेत्यांना ह्या प्रश्नाचे एवढे गांभिर्य होते तर त्यांनी मा. महासभेच्या आधी अधिकाऱ्यांना संपर्क साधून हे विषय घेतले असते. आता मी पुन्हा सांगतो. हा कुठलातरी विषय नाही, हा विषय महापालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने विषय आहे. या विषयाला तीन वर्ष झाली आणि मी त्यानंतर ह्यांना पत्र दिलेले आहे आणि पाठपुरावा झाला नाही म्हणून मा. महासभेमध्ये प्रश्न आणि मा. महासभेमध्ये पण दिड वर्षानंतर हा प्रश्न आलेला आहे.

**महेंद्रसिंग चौहान :-**

मा. महापौर मॅडम, इस तरह जो प्रश्न सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजीने उठाया है, सही मायने मे नगरपालिका के उत्पन्न का प्रश्न है और यह घडी - घडी हर मिटींग मे इस तरह जो सब्जेक्ट उठाते है उसका आशय यह है की, नगरपालिका की इनकम हो। मै मा. आयुक्त महोदय से निवेदन करूंगा, अगर इसबारे मे आप तीन महिने मे जो बॅलेन्स है वह वसूल करे। दुसरी घरपट्टी लेने जाते हो तो उनका टी.व्ही. वगैरे जप्त करते हो और ताला मार देते है। यहाँपर यह कारवाई नही हो सकती क्या? इस तरह की कारवाई करके तीन महिने के अंदर यह वसुली करे। यह प्रश्न करीब दो साल से लगातार पेंन्डींग है। पार्टी कोई भी हो। यह मेरे प्रभाग मे आता है। इसलिये मै बोलता हूँ की, तीन महिने के अंदर इस तरह आप वसूल करनेकी क्षमता बताईये। आपके पास पुरी ताकद है। पुरे लोग है वसुल करनेके लिए आपने दस परसेन्ट वसली करके अभी बता दो इसका मतलब यह नही की, पुरे साल की वसुली आपने कर ली। जो बॅलेंन्स है वह तीन महिने मे वसुल करेंगे ऐसा आश्वासन दिजीए।

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, पंधरा वर्ष मे पहिली बार सन्मा. सदस्य चौहाण साहब और ओमप्रकाश अग्रवालजी की पहली बार यहापर जम गई है। यह एक अच्छी बात है।

**महेंद्रसिंग चौहान :-**

आयुक्त महोदय, यह आपके कामकाज की बात है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जहाँपर विकास की बात है वहा हम एक है।

**महेंद्रसिंग चौहान :-**

यह आपके एज्युकेशन की बात है। बुरा मत मानिए, यह आपके कार्य करने के पद्धती की बात है के आपके अधिकारी इतना बडा पेमेन्ट बाकी बताते हूए इनको नोटीस दिया है बिल सबमिट किया है लेकिन वसुल क्यो नही किया गया है? तीन महिने के अंदर वसुल किया जायेगा ऐसा आप सदस्य को आश्वासन दिजीए। सदस्य कोई भी हो बी.जे.पी. का हो, एन.सी.पी. का हो, कॉंग्रेस का हो लेकीन पैसा तो आपके खजाने मे जाएगा। आपको विकास मे लगेगा ना।

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, आयुक्त साहेब आपण ह्याच्याकरिता उपायुक्त नेमलेले आहेत. पण ह्याच्याबद्दल उपायुक्तांनी काय कार्यवाही केली. त्यांनी जवाब द्यावे की, वसुली का नाही? त्यांना आपण इतका स्टाफ दिलेला आहे. त्या स्टाफच्या मोबदल्यात जे कार्य करतात, जो आपला स्टाफ कार्य करतो त्यांना

ओव्हर टाईमचे देखील आम्ही मंजूर केलेले आहे. उपायुक्तांनी ह्याच्याबद्दल सांगावे की, त्यांना वसुंली करिता काय अडचण आहे?

**शशिकांत भोईर :-**

काकांनी जो खुलासा केला त्याच्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करत आहे.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. महापौर महोदया आणि सन्मा. सदस्य अग्रवाल साहेब आपण जो प्रश्न विचारला आहे त्यासंदर्भात आपल्याला लेखी उत्तर दिलेले आहे. तुम्ही आता जो प्रश्न विचारलेला आहे ह्याच्या संदर्भात सविस्तर अहवाल तीन महिन्याच्या नंतर देण्यात येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, पहिला विषय असा आहे की, ठराव झालेला आहे त्याचा ह्याच्यात उल्लेख आहे. ठरावानंतर आपण त्याची मागणी पण दाखवलेली आहे.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

सगळीच माहिती आम्हाला नाही. आता जे आपण.....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडमनी रूलिंग द्यावे की, या विषयावर पुन्हा पुढच्या मा. महासभेत चर्चा करावी.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

पुढच्या मा. महासभेत नाही. जेव्हा तुमचा रितसर प्रश्न येईल ना त्यावेळेस, क्रमानुसार. तुमचा प्रश्न क्रमानुसार ज्यावेळेस येईल .....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण सांगता आता उत्तर येत नाही. मला उपप्रश्न विचारण्याचा अधिकार आहे की, नाही.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

होय.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अधिकार आहे ना. तर तुम्ही तयारीत असायला पाहिजे होते आणि मागचे पुढचे दोन विषय तुम्ही वाचले. मॅडम, त्यामध्ये आणखीन गांभीर्य आहे.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपला जो मुळ प्रश्न आहे ना, त्याची आम्ही तयारी केलेली आहे. तुम्ही उपप्रश्न हे वेगळेच विचारलेले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठराव झालेला आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, साहेब हे जे उत्तर देत आहे ते चुकीचे देत आहे. कारण आता सन्मा. सदस्य ओमपकाश अग्रवालजी ह्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. मला वाटते येथे बसलेले सर्व सभासद त्यांच्या बाजुने आहे. कारण अकरा लाखाची वसुली झाली की, नाही झाली त्याचा तुम्हाला शोध करावा लागेल. कशाला नाही झाली? आपण उपायुक्त आहात आणि आपण अशातऱ्हेने उत्तर देणे हे मला योग्य वाटत नाही. आपण जे जवाब देत आहेत ते योग्य नाही. वसुली एक पैशाची झाली नाही. ती कशाला झाली नाही. त्याबद्दल तुम्ही शोध करणार आहात आणि त्याचा तुम्ही अहवाल आम्हाला नंतर देणार आहात का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ही ठरावानंतरची रक्कम आहे. त्याच्या आधीची अजून आली नाही. त्याचा उल्लेखच नाही.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

जे भुईभाडे वसूल करायचे आहे. त्याची कार्यवाही तीन महिन्यात करून त्यासंदर्भात मा. महासभेला कळविण्यात येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब आता उपायुक्तांनी तीन महिन्यात वसूली करू असे सांगितलेले आहे. न केल्यास आयुक्त म्हणून आपण आपण कोणत्या नियमाखाली त्यांच्यावर कार्यवाही करणार त्याचे मला आपल्याकडून उत्तर पाहिजे. कारण शेवटी अधिकाऱ्यावर आपण कार्यवाही करणार आहोत आणि त्यांनी जे आश्वासन दिलेले आहे. तीन महिन्यात वसुली करतोय त्याबाबत आपण मला सांगावे की, हे कार्य तीन महिन्यात न झाल्यास आयुक्त म्हणून मी या नियमाखाली ह्यांच्यावर कार्यवाही करणार.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जो याठिकाणी मूळ प्रश्न विचारलेला आहे आणि त्या मुळ प्रश्नाला उपप्रश्न विचारून लेखी स्वरूपामध्ये प्रशासनाकडे पाठवलेले आहे. त्याबाबतीमध्ये मी एवढेच सांगू इच्छितो की, आता उपायुक्तांनी जो काही खुलासा केलेला आहे आणि सभागृहाला जे आश्वासन दिलेले आहे त्याची पुर्तता सभागृहाला

आश्वासन दिल्यानंतर त्याची पुर्तता तर केली जाते. शेवटी महापालिकेची जी काय थकबाकी असेल किंवा महापालिकेची जी रक्कम वसूल करायची असेल तर त्याबाबतीमध्ये कायद्यामध्ये तरतुदी आहे. आपल्याला कशापद्धतीने वसुल करायच्या आहेत किंवा त्याच्यावर कूठल्याप्रकारे कायदेशीर कार्यवाही करायची आहे सभागृहाला उपायुक्त जेव्हा एखादे आश्वासन देतात तर त्याची प्रतिपुर्ती होणारच आहे. जर होणार नाही तर पुढील कार्यवाही करण्याचा प्रश्नच येत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आयुक्त साहेब, याच मा. महासभेमध्ये मा. महापौरांनी रूलिंग दिलेले आहे. मागच्या सभेची आपण रूलिंग वाचा. एकाही रूलिंगचे इम्पलीमेंट झालेले नाही. म्हणून आपल्याकडून आश्वासन पाहिजे. केलेले बरे आहे ना. मग आपण सुटलो आणि मी ही सुटलो, तेही सुटले. तीन महिन्यात महापालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ झाली. पण शेवटी कोणाला तरी त्या उत्पन्नाच्या मागे लागावे लागणार आहे. आयुक्त महोदय, आपण या महापालिकेचा सर्व कारभार बघतात म्हणून काहीतरी ''मास्तर जसे शाळेच्या पोरांना शिकवतात'' त्याचप्रमाणे तुमच्याकडे सर्व अधिकार आहेत. तुम्ही त्यांच्यामार्फत आश्वासन द्या की, तीन महिन्यात झाले नाही तर ह्यांच्यावर मी ही कार्यवाही करणार आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, तसेच आश्वासन मागील माझा प्रश्न गोविंद नगर बद्दल होता. तर आपण मला स्वतः आश्वासन दिले होते की, त्यांच्यावर आपण गुन्हा नोंदवू आणि तिथले कनेक्शन कट करू. पण आजपर्यंत त्या जागेवर कनेक्शन कट झाले नाही. म्हणजे येथून आम्हाला जो आश्वासन मिळतो. त्याप्रश्नाला मी इनक्लूड करत नाही. आता प्रश्न तसा उपस्थित झाला की, येथून जी रूलिंग मिळते आणि आश्वासन मिळते ते इम्पलिमेंट हाते. साहेब, पण ते होतच नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आयुक्त साहेब, याबाबतीत आपण आपला निर्णय द्यावा.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, अभी इन्होने कहा के दो साल से टॅक्स बाकी है। तो वह वसुल क्यो नही होता उसका जवाब यह लोग क्यो नही देते है। क्यो वसूल नही होता है? इसका कुछ कारण होगा ना वसुल क्यो नही हो रहा है। जब एक साधारण आदमी के घरपट्टी के लिये आप टी.व्ही. उठाके ला सकते है। उसका बर्तन उठाके ला सकते है। उसका रूम सिल कर सकते है। तो वह जो दूकानदार है। उनका भाडा क्यो नही वसूल होता है वह तो हमको बताईए। कूछ कारण होगा ना, नही तो राजनैतिक दबाव है ऐसा बोलो, इनका भाडा वसूल मत करो।

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे, त्याबाबतीमध्ये मी सभागृहाला आश्वासन देउ इच्छितो की, आत्ताच उपायुक्तांनी जे आश्वासन दिलेले आहे, तीन महिन्यामध्ये वसूल करण्याचे. तर मी पुन्हा प्रशासनाच्या वतीने आपल्याला सांगू इच्छितो की, तीन महिन्यामध्ये वसूली आपण कंम्पलसरी करणार आहोत. जर समजा, वसुलीमध्ये संबंधित जो कोणी वसुल करणारा अधिकारी असेल आणि त्याच्याकडून समजा जर काही त्रुटी राहिली तर त्याच्या चुकांमुळे किंवा त्याच्या हलगर्जीपणामुळे जर वसुल करायचे राहून गेले तर त्यांच्यावर नियमाप्रमाणे कडक कार्यवाही करण्यात येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, माझा पुढचा प्रश्न एस.टी कार्यालयाची जागा कोणाच्या मालकीची आहे? महापालिकेने सर्व जागा भाडेपोटीने असेल तर त्याचे मालक कोण आहे?

**दिपक खांबित :-**

सदर एस. टी. कार्यालयाचे जे स्ट्रक्चर आहे ते १९९२ साली काम सुरू झाले होते आणि २००१ ला पुर्ण झाले आहे. त्याच्या मालकीबाबत वाद आहे. वी.सी.सी आणि सॉल्ट डिपार्टमेंट ह्यांच्यामध्ये मालकी बाबतचा वाद आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

खांबीत साहेब, माझ्याकडे महापालिकेचे पत्र आहे. त्या मालकाला तुम्ही पत्र दिले आहे की, ती जागा आम्हाला भाडे तत्वाने द्या. त्याच्याशी तुम्ही करार केलेला आहे. करारीनंतर त्याचा रेट फिक्स करण्यासाठी दोनदा त्यांनी तुम्हाला अर्ज दिलेला आहे. म्हणजे तुम्ही सांगतात वाद आहे. ता सॉल्ट डिपार्टमेंटचा वाद आहे. की. कोणाचा ते मला माहित नाही. पण महापालिकेने त्यांना पत्र दिलेले आहे. ही जागा आहाला ह्या कामासाठी द्या. माझ्याकडे पत्राची कॉपी आहे. महापालिकेने त्यांना उत्तर दिले की, देतोय. नंतर महापालिकेने त्यांना दिलेली आहे. त्यानंतर दोन वेळा त्यांनी महापालिकेला पत्र दिलेले आहे की, माझ्या भुईभाड्याबद्दल काय आहे? मला पुढची कार्यवाही करावी लागेल. म्हणजे तुम्ही त्या वादाला जाऊ नका. तुम्ही त्यांना पत्र दिलेले आहे. तुम्ही त्याच्याकडून जागा हस्तांतरण करुन घेतलेली आहे. हा मग वादाचा प्रश्न आहे. तो त्यांचा सॉल्ट डिपार्टमेंटचा प्रश्न आहे. एकतर तो वादाचा विषय होता. तर तुम्ही ती जागा घेतली कशाला? तुम्ही त्यांना पत्र दिलेले आहे. माझ्याकडे पत्र आहे.

**दिपक खांबित :-**

ते पत्र कोणाचे आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते तुम्ही डिपार्टमेंटमधून बघा. तुम्ही पत्र दिले का नाही दिले? त्या जागेसाठी मागणी केली की, नाही?

**दिपक खांबित :-**

ते पत्र दाखवा ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाही, नाही. असे नाही. मी प्रश्न विचारलेला आहे तुम्ही तयारी करुन यायला पाहिजे होती.

**दिपक खांबित :-**

साहेब असतील, दिले असतील ना. पण पत्र तरी बघायला पाहिजे ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणून सांगतो मा. महापौर मॅडमनी वेळ द्यावी. पुढच्या मा. महासभेत वेळ द्यावी. ही कामाची पद्धत नाही. जेव्हा मी हा प्रश्न विचारलेला आहे की, एस.टी. महामंडळाच्या जागेबद्दल प्रश्न विचारलेला होता. त्याबद्दल आपल्याकडे संपूर्ण कागदपत्र असली पाहिजे. आपण एका मालकाला पत्र देता की, ती जागा आम्हाला द्या. मालक तुम्हाला जागा देतोय. त्याचे भुईभाडे ठरले जाते. ती जागा तुम्ही एस.टी. महामंडळाला देता. एस.टी. महामंडळ तुम्हाला भाडे देत नाही. आपण त्यांना दिले की, नाही अजून ते संशयास्पद आहे म्हणजे शेवटी काय चालले आहे.

**दिपक खांबित :-**

आपण आपल्याकडील असलेली माहिती आम्हाला द्या आम्ही तुम्हाला उत्तर देतोय.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उद्या जर त्यांनी भाडेपोटी दहा लाखाची मागणी केली. तर तुम्ही ते कुठल्या ऑडीटमध्ये दाखवणार आहात?

**दिपक खांबित :-**

नाही देणार. मिटींगमध्ये जे होईल तेच आपण करणार.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य मी ह्या विषयावरच बोलणार आहे परंतु, जर माझ्या बोलण्याने सन्मा. सदस्यांची पाच मिनिट खाली जात असतील तर त्यांना ती वाढवून द्यावी. कारण ह्या प्रश्नाची जी वस्तुस्थिती आहे ती मला सांगणे आवश्यक वाटत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, मी अधिकाऱ्यांकडून उत्तर अपेक्षित करतो. त्यांनी अधिकाऱ्यांच्या कानामध्ये सांगावे, त्यांना बाजूला घेउन आणि अधिकाऱ्यांनी मला तसे सांगावे.

**दिपक खांबित :-**

आपण पत्र द्या. आम्ही तुम्हाला त्याची माहिती देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही पत्र दिले का, नाही दिले. तुम्ही १९९२ सालीचा उल्लेख केला.

**दिपक खांबित :-**

साहेब, बघायला पाहिजे ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बघून सांगा ना. पुढच्या सभेला सांगा. तुम्ही पत्र शोधा. महापालिकेत कागदपत्र गहाळ होत नाही. हे तरी सिद्ध होणार. मी पत्र दिले की, तुमचे काम हलके होणार आहे. मी पत्र देणार नाही. तुम्हाला स्वतःला शोधायला लागेल.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहापूढे वस्तूस्थिती जी मला माहित आहे ती.....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांना जर सांगायचे असेल तर पाच मिनिटाची वेळ त्यांना द्या. अधिकाऱ्यांना बाहेर घेउन जावे अधिकाऱ्यांना त्यांनी सांगावे आणि त्यानंतर अधिकाऱ्यांनी ते मला सांगावे. हे योग्य ठरणार. पण माझ्या प्रश्नाच्या मध्ये कोणी बोलणे हे योग्य नाही. प्रत्येकवेळी हा विषय येतो आणि नेमके ह्या विषयाला........

**नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ संपलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम म्हणजे माझा हा विषय पेंन्डींग आहे ना.

**मा. महापौर :-**

होय.

**नगरसचिव :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने, श्री. मिल्टन डिसोझा ह्यांना जागतिक किंग बॉक्सींग चॅम्पीयन स्पर्धेमध्ये तिसरे पारितोषिक मिळाले म्हणून त्यांचे आपण याठिकाणी सत्कार करीत आहोत. मी श्री. मिल्टन डिसोझा ह्यांना सभागृहात बोलवत आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, श्री. मिल्टन डिसोझा या खेळाडूचा या ठिकाणी मा. महासभेमध्ये सर्व सन्मा. सदस्यांच्या वतीने आणि आपल्या तर्फे या ठिकाणी जाहीर सत्कार होत आहे.

**नगरसचिव :-**

मा. महापौर मॅडम, श्री. मिल्टन डिसोझा ह्यांचे स्वागत करत आहे. कृपया श्री. मिल्टन डिसोझा ह्यांनी डायसवर यायचे आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सर्व सन्मा. सदस्यांना मी विनंती करतो की, सगळ्यांनी कृपया आपल्या जागेवरती उठून या खेळाडूचा मानाने सत्कार करायचा आहे.

(मा. महापौर मॅडम, ह्यांच्या हस्ते श्री. मिल्टन डिसोझा ह्यांचे स्वागत करण्यात आले.)

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, खेळाडूला जर दोन शब्द बोलायचे असतील तर परवानगी द्यावी.

**मिल्टन डिसोझा :-**

आज अगर मै वर्ल्ड चॅम्पीयनशिप मे तिसरा पदक लिया है और इंडिया को आगे किया है। इंडिया की तरफसे हम दोहीजन थे। एक का हाथ डिसलोकेटेड होने के कारण वह कूछ नही कर पाया। मगर आज इस मेडल का पुरा श्रेय मै मिरा भाईंदर महानगरपालिका और मा. महापौर मॅडम, आयुक्त सर और दुसरा क्रेडीट हमारे प्रेस रिपोर्टर जो यहापर है उनको भी देना चाहता हूँ। क्योंकी उन्होने इसको आगे लाया और मेरी काफी मदत की है।

**नगरसचिव :-**

सभेच्या पुढील कामकाजाला सुरूवात करत आहे.

**रतन पाटील :-**

सचिव साहेब, मी एक लक्षवेधी दिलेली आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन कृष्णा पाटील ह्यांची लक्षवेधी, महापालिकेचे सुसज्ज अद्यावत रूग्णालय करणेबाबत. मिरा भाईंदर शहरामध्ये नागरिकांना अद्यावत सुविधा देण्यासाठी व त्यांच्या आरोग्याची देखभाल करण्यासाठी मिरा रोड येथे आपण गेल्याच वर्षी आमदार आदरणीय मुझफ्फर हुसेन साहेब ह्यांच्या फंडातून त्या हॉस्पीटलचे उद्‌घाटन केले. या ठिकाणी रक्तपेढी, दवाखाना, शवगृह, तसेच प्रभाग समितीचे कार्यालय व दवाखाना, वाचनालय इत्यादींची सुविधा केलेली आहे. यासाठी आमदार मुझफ्फर हुसेन साहेब ह्यांनी ४७ लाख ३८ हजार रूपये इतका फंड उपलब्ध करून दिलेला आहे. तसेच, आदरणीय पालकमंत्री गणेशजी नाईक साहेब ह्यांनी १९ लाख २० हजार रूपये इतका फंड या हॉस्पीटलसाठी उपलब्ध करून दिलेला आहे. तसेच, परभणीतील आमदार फौजीया खान ह्यांनी १ लाख रूपये ह्या हॉस्पीटलसाठी फंड दिलेला आहे. प्रस्तावित हॉस्पीटलसाठी मुझफ्फर आमदार साहेब ह्यांनी १० लाख रूपये फंड देण्याचे मान्य केलेले आहे. तसेच, आदरणीय पालकमंत्री गणेशजी नाईक ह्यांनी पुढील कामासाठी २५ लाख रूपये अधिक मंजूर केलेले आहे. एकूण ७८ लाख ३६ हजार रूपये एवढा फंड वरील कामासाठी उपलब्ध झालेला आहे. प्रस्तावित काम हे एकूण १ कोटी २३ लाख ९५ हजार रूपये इतक्याचे काम आहे. त्यापैकी फंडाततून मिळालेली रक्कम ७८ लाख ३६ हजार रूपये उपलब्ध झालेली आहे आणि या फंडामध्ये महानगरपालिकेचा फार मोठा सहभाग आहे. महानगरपालिकेने ४८ लाख रूपये या कामासाठी वापरलेले आहेत. तसेच, आपल्या अधिक माहितीसाठी सांगत आहे की, आजच्या मा. महासभेमध्ये आपण या हॉस्पीटलचे अद्यावत काम, सुसज्ज हॉस्पीटल व्हावे म्हणून वाढीव मजले तसेच इतर कामासाठी २ कोटी २९ लाख रूपये हा निधी उपलब्ध केलेला आहे. अशाप्रकारे पुर्ण शहरासाठी मिरा भाईंदर शहरात हे हॉस्पीटल सर्व मान्यवरांच्या तसेच, महानगरपालिकेच्या फंडातून अद्यावत हॉस्पीटल निर्माण होत आहे आणि जवळ जवळ ह्याचे ६० टक्के काम पुर्ण झालेले आहे आणि उर्वरित काम लवकरच पुर्ण होउन पुर्ण शहरासाठी हे हॉस्पीटल तयार राहील आणि म्हणूनच आपली दिलेली लक्षवेधी आम्ही फेटाळत आहोत. आपण उल्लेख केलेले नवघरचे ३०२ ह्या आरक्षणाचा उल्लेख आपण आपल्या पत्रामध्ये केलेला आहे. महानगरपालिकेचे आरक्षण हे खाजगी जमिनीवर आहे. संबंधित मालकाशी या विषयावर चर्चा सुरू आहे. ज्याप्रमाणे आपल्या भावना आहेत, पुर्ण सभागृहाच्या आणि सर्व नगरसेवकांच्या ही भावना आपल्याशी सहमत आहे. आरक्षण ३०२, नवघर समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून सदर आरक्षण विकसित

करण्याचा सर्वांचा प्रयत्न आहे. आपणाकडून ही ह्या कामासाठी आम्ही सहकार्याची अपेक्षा बाळगत आहोत म्हणन आपली लक्षवेधी आम्ही फेटाळत आहोत.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, आपण निश्चितच आमदार मुझफ्फरजी हुसेन साहेब ह्यांचा गौरव करण्यासारखे काम मिरा भाईंदर शहरामध्ये उभे राहत आहे आणि त्यांच्या कामाचा गौरव आपण आता वाचलेले आहे. पण ते हॉस्पीटल तिथे होत आहे हे किती बेडचे हॉस्पीटल तिथे होत आहे?

**मा. महापौर :-**

५५ बेडचे हॉस्पीटल आहे.

**रतन पाटील :-**

कुठले?

**मा. महापौर :-**

मिरा रोडचे.

**रतन पाटील :-**

आता, ह्या प्रेझेन्टवर आणि आता महापालिकेने जे आरक्षण आहे ३०२ चे तिथे आपण काय करणार आहोत? तिथे कुठले हॉस्पीटल तयार करणार आहोत?

**मोहन पाटील :-**

त्या जागेच्या संदर्भात त्या जागा मालकाशी बोलणी सुरू आहे. असे आपण अगोदर सांगितलेले आहे आणि तेव्हा तेही आरक्षण विकसित करण्याचे आहे त्याची बोलणी सुरू झाल्यानंतर ती जागा घेतल्यानंतर आपण ती जागा डेव्हलप करू.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, उत्तर देतील ना. आपण कशाला?

**मोहन पाटील :-**

पण आजच्या तारखेला मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये ५० खाटांचे हॉस्पीटल आपण सुरू केलेले आहे आणि त्याच्यानंतर टेंम्बा हॉस्पीटल साठी ३० खाटांचे करत आहोत त्याचीही अंतिम मंजुरी आलेली आहे.

**रतन पाटील :-**

सुरू केला नाही. सुरू झाला नाही.

**मोहन पाटील :-**

त्याच्यामुळे आपण ही लक्षवेधी फेटाळलेली आहे. ती योग्य आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण लक्षवेधी फेटाळलेली आहे. सचिवजी आपण पुढील कामकाजाला सुरूवात करा.

**रतन पाटील :-**

नागरिकांच्या वैद्यकिय सेवेशी आपण खिलवाड करत आहात.

**मा. महापौर :-**

सदस्य आपण बसुन घ्या. सचिवजी सभेच्या पुढील कामकाजाला सुरूवात करा.

**रतन पाटील :-**

आपण नागरिकांच्या वैद्यकीय सेवेशी खिलवाड करत आहात. मिरा भाईंदरमध्ये इतके हॉस्पीटल आहेत त्यात डिपॉझिट घेतल्याशिवाय कोणालाही प्रवेश दिला जात नाही. ह्याबाबत आपण काय भुमिका ठेवलेली आहे. मिरा भाईंदरमध्ये सात लाख लोकांची वस्ती आहे. पण मिरा भाईंदरच्या लोकांना काय सुविधा पुरवल्या जातात.

**मा. महापौर :-**

सदस्य आपण बसुन घ्या. आपल्याला सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे.

**रतन पाटील :-**

मी तुमचा निषेध करतो.

( नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. १९ चे वाचन केले. )

**प्रकाश दुबोले :-**

पान क्र. ४० मध्ये, आयुक्त साहेब सर्व सदस्यांचे म्हणणे ऐकून घ्या आणि नंतर सर्व प्रश्नांवर एकदम खुलासा करा. नाहीतर प्रत्येकाला उत्तर देत बसाल तर पुढील कामकाज कधी पुर्ण कराल. असा तो शब्द गाळलेला आहे. पुढील कामकाज कधी पुर्ण कराल. तसेच, पान क्र. ४८ मध्ये खालून चवथ्या लाईनमध्ये मी भाष्य केलेले आहे. त्यामध्ये मांडलानी पुढे डॉट डॉट कलेले आहे तिथे त्यावर मला तपशीलवर बोलण्याची संधी द्यावी असे म्हटलेले आहे.

**रोहीत सुवर्णा :-**

पान क्र. ७२ मध्ये, ज्याठिकाणी सन्मा. सदस्या शुभांगी (ताई) नाईक बोलतात, त्या ठिकाणी सदरचा विषय असा पाहिजे. तसेच पान क्र. ७५ मध्ये सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालविस ज्याठिकाणी बोलत आहेत आयुक्त साहेब आपले कामगार १९९५ पासून पाहिजे.

(सन्मा. सभागृह नेता श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. १९ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १९ :-**

दि. २०/०१/२००६ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १८ :-**

दि. २०/०१/२००६ रोजीचे मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. २० चे वाचन केले.)

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. २० चे वाचन आता सचिव साहेबांनी केले. तर तो विषय घेण्यापुर्वी जर आपण प्रकरण क्र. २६ विषय घेतला. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम ३०, पोटकलम १ अन्वये विशेष समित्या स्थापन करणेबाबत. तो विषय आपण अगोदर घेउ या. नंतर मग हा विषय घ्यावा. असा मी ठराव मांडत आहे.

**नगरसचिव :-**

सभागृहाची मान्यता असेल तर!

**रतन पाटील :-**

राष्ट्रगीत पण घ्या ना.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, विषय क्र. २६ चा जो सिक्वेन्स आहे. तो २० वर घेण्याकरिता सन्मा. सदस्य आसिफ शेख ह्यांनी सभागृहाला आपल्याला विनंती केलेली आहे. सभागृहाची जर त्याला मान्यता असेल तर २६ नंबरचा विषय घेउन नंतर पुढील सिक्वेन्स प्रमाणे २० नंबरपासून विषय सुरू करावे अशी आपल्याला मी विनंती करतो.

**धनराज अग्रवाल :-**

विषय क्रमप्रमाणे घ्यावे. आपल्याला कसली घाई आहे.

**नगरसचिव :-**

पुढील प्रकरण घेण्याकरिता जर सभेची मान्यता असेल तरच पुढील प्रकरण घेता येईल.

**धनराज अग्रवाल :-**

क्रमप्रमाणे घ्या.

**रतन पाटील :-**

क्रमांकाने घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, प्रकरण क्र. २० चालू आहे का? आम्ही मान्यता दिली नाही म्हणजे चालू आहे विषय संपला. आम्हाला चर्चेची परवानगी द्या.

**रतन पाटील :-**

प्रकरण क्र. २० वाचले गेले आहे त्याच्यावर आता चर्चा झाली पाहिजे.

**आसिफ शेख :-**

मा. महासभेने तशी परवानगी द्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या सुचनेवर आमची हरकत आहे. विषय संपला.

**आसिफ शेख :-**

आपण एवढी घाई कशाला करता?

**रतन पाटील :-**

प्रकरण क्र. २० वाचले गेले आहे त्याच्यावर चर्चा झाली पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

आता हा जो २० क्रमांकाचा विषय दिलेला आहे. यामध्ये माझ्या माहितीनुसार हायकोर्टामध्ये न्यायालयीन लढाई झाली. हे डिस्प्यूट आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या. आपल्याला बोलण्याची परवानगी दिलेली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही विचारतोय ना.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण परवानगी घेतलेली नाही. आपण बसून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला बोलायला परवानगी द्या.

**मा. महापौर :-**

आपण बसून घ्या.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम.......

**मिलन म्हात्रे :-**

आपण ह्यांना परवानगी दिली का? त्यांना पण खाली बसवा. मी खाली बसलो, त्यांनाही खाली बसवा. आपण परवानगी दिलेली नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ज्यांचे हात वर असतील त्यांना परवानगी दिलेली आहे. त्यांना क्रमाक्रमानुसार दोन-मिनिटे, पाच-पाच मिनिटे बोलण्याची संधी दिली जाईल. मधेच कोणीही कुठून गोंधळ घालण्याचा प्रयत्न करू नका.

**मिलन म्हात्रे :-**

हा नियम सगळ्यांना लागू करा. मॅडम, आम्हाला बोलण्याची परवानगी हवी आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा, प्रकरण क्र. २० ऐवजी प्रकरण क्र. २६ अगोदर सुरू करावा अशी मी आपणांस विनंती केलली आहे. सन्मा. आमचे माजी सभापती मोहनजी पाटील साहेब हे सन्मा. सदस्यांबरोबर चर्चा करत आहे. आपण कृपया परवानगी द्यावी आणि सभागृहाची परवानगी घेउनच आपण विषय पुढे घेउ या. नंतर मग क्रमाने २०, २१ असे घेता येईल.

**मा. महापौर :-**

सचिवजी, प्रकरण क्र. २६ नंबरचा विषय २० नंबरवर घेउन त्या विषयाच्या चर्चेला सुरूवात करावी.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. २० वाचले गेले आहे. २० नंबरच्या विषयाचे वाचन झाले आहे. आपण त्याच्यात बदली करता?

**मिलन म्हात्रे :-**

त्याला आमची मंजुरी नाही. सचिवांनी सांगितल्या प्रमाणे हा विषय पुढे घेण्याकरिता आमची मंजुरी नाही. आपण बोलतात सभागृहाची मंजुरी असेल तर......

**नगरसचिव :-**

सदस्यांची मंजुरी लागते.

**मिलन म्हात्रे :-**

आमची मंजुरी नाही. आपण बाकीच्या सदस्यांची मंजुरी घ्या.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबांनी रुलिंग दिलेले आहे ना.

**रतन पाटील :-**

रुलिंग दिले आहे. पण त्या रुलिंगला आमची मंजरी नाही आमचा विरोध आहे हे प्रकरण पुढे न्यायला.

**आसिफ शेख :-**

पिठासीन अधिकारी हे सर्वोच्च आहेत ना?

**मिलन म्हात्रे :-**

सभाशास्त्राला रुलिंगची गरज लागत नाही. विषयपत्रिका दिली आहे त्या विषयपत्रिकेवरील विषय मागे घेण्याचे कारण काय दिले?

**रतन पाटील :-**

प्रकरण क्र. २० वाचले गेले आहे तोच विषय घेण्यात यावा.

**मिलन म्हात्रे :-**

वाचन झाल्याप्रमाणे चालू करा. गोषवारा दिलेला नाही, काही नाही. करोडो रुपयाची मालमत्ता आहे. कोर्टामध्ये सर्व मॅटर गेलेले आहेत. उद्या, काय प्रॉब्लेम झाला तर आमच्या समोर येतील. आपण पहिल्यांदा कोर्टाचे कागदपत्र सभागृहासमोर सादर करा.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, आता विषय क्रमाक २० या ठिकाणी पुकारला होता. तरी हा २० क्रमांकाचा विषय पुर्ण झाल्यानंतर आपण २६ नंबरचा विषय घ्यावा असे मी सभागृहाला विनंती करत आहे.

**मा. महापौर :-**

विषयपत्रिकेवरील विषयानुसार प्रकरण क्र. २० वर चर्चा करण्यात यावी.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, त्यावेळी आपण मला सांगितले की, जी काय चर्चा करायची आहे ती लेखी द्या. ह्याला काय अर्थ आहे. गेल्यावेळी ऑक्ट्रायचा विषय होता. मी चर्चा करायला उभा राहिलो त्यावेळी आपण सांगितले की, आपल्याला चर्चा करायची आहे किंवा जे काय सांगायचे आहे ते आपण लेखी द्या.

**मा. महापौर :-**

त्यावेळी वेळ कमी होता.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, वेळ कुठे कमी होता? म्हणजे असे झाले ''कृष्णा करे तो चमत्कार, हम करे तो बलात्कार''. ज्यावेळी सन्मा. सदस्य रतन पाटील साहेबांचा विषय होता त्यावेळी सन्मा. सदस्य अनंत पाटील एक मिनिटासाठी उभे राहीले. त्यांना आपण ताबडतोब एका मिनिटात बसवले.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला काय बोलायचे आहे? आपल्याला कुठल्या विषयावर चर्चा करायची आहे. आपण परवानगी घ्या आणि त्या विषयावर चर्चा करा. मागे काय झाले ते आता बोलू नका. विषय कुठला चालू आहे त्याविषयावर आपण बोला.

**नरेंद्र मेहता :-**

आपला डिसीजन एक ठेवा ना. कायम ठेवा ना.

**मा. महापौर :-**

डिसीजन कायम आहे. पण आता तुमच्याकडून लेखी मागितले का?

**नरेंद्र मेहता :-**

त्यावेळी आपण सांगितले होते की, चर्चा करायची नाही लेखी माहिती द्या.

**मा. महापौर :-**

आता लेखी मागणी केली आहे का?

**नरेंद्र मेहता :-**

मग दरवेळेस चेंजेस असतील तर!

**मा. महापौर :-**

चेंजेस असतील ते द्या. त्यावेळची परिस्थिती वेगळी होती तेव्हा लेखी मागणी केली होती.

**नरेंद्र मेहता :-**

काही एक परिस्थिती वेगळी नव्हती.

**मा. महापौर :-**

त्या विषयावर भरपूर चर्चा झाली होती म्हणून नंतर सदस्य त्याच विषयावर दोनदा-तिनदा पुन्हा पुन्हा रिपीटेशन होत होते म्हणून लेखी मागितले होते.

**नरेंद्र मेहता :-**

आपले असे म्हणणे आहे की, जर उशिर होत असेल तर लेखी द्यायचे.

**मा. महापौर :-**

तसे नाही. रिपीटेशन झाले होते म्हणून लेखी मागण्यात आले होते.

**नरेंद्र मेहता :-**

काही एक रिपीटेशन झाले नव्हते.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला काय बोलायचे आहे?

**नरेंद्र मेहता :-**

ऑक्ट्रायच्या विषयावर सिंगल चर्चा देखील झाली नव्हती कोणी एका सदस्याने देखील चर्चा केली नव्हती. मी दोन मिनिट बोलायला उभा राहिलो आणि आपण मला बसवले.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या. आपल्याला परमिशन पाहिजे असेल तर बोला. आपण वाद घालण्याचा विषय नाही. आपण बसून घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

आपण नक्की डिसीझन घ्या की, चर्चा करायची का नाही करायची?

**मा. महापौर :-**

चर्चा करायला वेळ दिलेला आहे. आपण सुरूवात करा.

**नरेंद्र मेहता :-**

चर्चा करायला गेल्या सभेला वेळ नाही आणि ह्या सभेला वेळ आहे.

**मा. महापौर :-**

आपण वेळ वाया घालवत आहात. आपल्याला जर त्या विषयावर बोलायचे असेल तर बोला नाहीतर आपण बसून घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

त्या विषयाबद्दल बोलायचे आहे की, ह्यापुढे परत असे होता कामा नये. आम्ही उभे राहिल्यावर आपण सांगायचे की, लेखी द्या, नाहीतर बसा. सगळ्यांसाठी एकच नियम ठेवावा.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सदर विषय हा स्थायी समिती दि. ०५/०५/०६ रोजी आला होता. त्यावेळेला एकंदरीत सर्व सदस्यांचे एकच मत होते की, जकातीचे पैसे १ कोटी ६२ लाख रूपये हे त्या जकात धारकाला देउ नये आणि कुठल्याही पद्धतीने नुकसान भरपाई देऊ नये. आज प्रशासनाचे सुद्धा तेच मत आहे. आमच्या आयुक्त साहेबांचे निश्चितच अभिनंदन करावे लागेल. त्यांनी हा विषय आपल्या परिने फेटाळला की, तुम्हांला एक पैसा सुद्धा नुकसान भरपाई मिळणार नाही. पण त्यानंतर त्या जकात धारकाने सचिव ह्याच्याकडे हा प्रश्न उपस्थित केला. सचिवांकडे याबाबतची सभा लावली होती. पण सभा घेतली गेली नाही आणि झाली नाही. कारण त्यांना वेळ नसल्याकारणाने. त्यांनी उपसचिव ह्यांच्याकडे ही सभा करावी असे गृहीत धरले. पण त्यांच्यानंतर हा विषय स्थायी समिती मध्ये आल्यानंतर सर्वांचे एकमताने असे ठरले की, जर उपसचिव ह्यांना त्या ठिकाणी नेमायचे असेल तर आम्ही मा. आयुक्त साहेब शिवमूर्ती नाईक साहेब ह्यांची तिथे नियुक्ती करावी किंवा प्रधान सचिव ह्यांच्या मार्फत हा प्रश्न सोडवावा. उपसचिवांच्या मार्फत हा प्रश्न सोडवू नये. एका वेळेला मिटींग झाली त्यांना वेळ मिळाला नाही. पण दुसऱ्या वेळेला त्यांना निश्चितच वेळ मिळेल. प्रधान सचिवांकडे हा प्रश्न निश्चितच सोडवावा. मिरा भाईंदरच्या उत्पन्नाच्या दृष्टीने १ कोटी ६२ लाख रूपये म्हणजे फार मोठी रक्कम आहे. मिरा भाईंदर मध्ये किती नुकसान झाले हे सर्वांना माहिती आहे. त्या जकात धारकांचे किती नुकसान झाले हे आपल्याला माहिती आहे. महापालिकेने अन्य नागरिकांना काय नुकसान भरपाई दिली हे सर्व सुद्धा लोकप्रतिनिधींना माहिती आहे. मग आपण त्यांना का १ कोटी ६२ लाख रूपये द्यायचे. एक पैसा, एक छदाम सुद्धा त्यांना द्यायचे नाही असे मी आपल्या सभागृहाला सांगतोय. कारण हा जनतेचा पैसा आहे. कशासाठी, कोणाचे नुकसान झाले आहे? त्याचे काय नुकसान झाले आहे ते सांगा ना. त्याचे काय वाहुन गेलेले आहे? त्याचे काय नुकसान झाले आहे तर त्याचे काही एक नुकसान झालेले नाही. म्हणून सभागृहाला विनंती आहे. मा. महापौर मॅडम, मा. आयुक्तांनी जसे ज्या पद्धतीने हा ठराव फेटाळला गेला आहे. त्यापद्धतीने एक असा ठराव ठेवून त्या जकात धारकाला एक पैसासुद्धा न देता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आणि नागरिकांच्या दृष्टीने १ कोटी ६२ लाख रूपये हे त्याला देउ नये. अशी मी आपणांकडे विनंती करतो.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, १ करोड ६२ लाख रूपये टेंडरधारकाने आपल्याकडे निवेदन केलेले आहे का? आणि निवेदन केले असेल तर त्याला कोणत्या पद्धतीने त्याच्यामध्ये घाटा आलेला आहे. मग तो घाटा आला असेल तर वसूली कधी केलेली नाही आणि वसूली केलेली असेल तर आपल्याला सांगितलेले आहे का? त्या पद्धतीने त्याला १ करोड ६२ लाख रूपये का द्यायचे? हा जनतेचा पैसा त्यांना देउ नये सदस्य रतन पाटील साहेब यांच्या मताशी मी सहमत आहे आणि माझा ठामपणे विरोध आहे की, कृपया साहेब, पैसा देउ नये.

**महेंद्रसिंग चौहान :-**

मा. महापौर महोदया, सन्मा. सदस्य रतन पाटीलजी यह स्थायी समिती के सदस्य है। उनको पता है की, डिस्प्यूट क्या है? हमलोग ज्यादातर लोग यहा आमसभा मे बैठे हुए है। अभीतक यह पता नही है की, डिस्प्यूट किस तरह से अराईज हूआ? महानगरपालिका और कोनार्क मे डिस्प्यूट पहिली बार सामने आया लेकिन डिस्प्यूट क्या है? सन्मा. सदस्यने बता दिया है की, कुछ करोड का मामला है। अगर कुछ करोड का मामला है तो, जनरल बॉडी मे यह सब्जेक्ट क्यो आया? हमलोगो को किसतरह से पता चले की, यह क्या

मामला है? पुरे ड्युरींग का पिरीयड अभीतक महानगरपालिका ने उसके साथ डिस्प्यूट नही किया। अब जो डिस्प्यूट अराईज हुआ है। उसके बारे मे सन्मानित आयुक्त या उपायुक्त महोदय इसके बारे मे बताऐगे की, किस तरह से डिस्प्युट अराईज हुआ है। जिससे की, हमलोग इसपर चर्चा कर सके।

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, स्थायी समिती सभेमध्ये सन्मा. सदस्य रतन पाटील म्हणत होते की, त्याला पुर्णपणे आमचा विरोध आहे. मग विरोध असताना देखील या ठिकाणी विषय कसा काय आणला गेला? बरोबर आहे. त्याला मान्यता बरोबर आहे. पण तो तिथे नाही आणि आम्हाला त्याची टिपणी ही नाही. मग हा विषय आलाच कसा?

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृह सन २००५-०६ सालातील जकात वसुली बाबत. आयूक्त मिरा भाईंदर महानगरपालिका आणि अभिकर्ता मे. कोणार्क ह्यांच्यातील वादाबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत. सभागृहापुढे या विषयची माहिती थोडीशी गफलत झाल्यामुळे सदस्य त्याचे झालेले नुकसान भरून द्यायचे की, नाही भरून द्यायचा हा विषय येथे नाही. हा विषय आहे की, पाहणी करण्यासाठी विशिष्ठ समितीची किंवा विशिष्ट अधिकाऱ्याची नेमणूक करणेबाबत, लवाद नेमण्यासाठी हा विषय आपल्यापुढे आलेला आहे. ह्या संदर्भाबद्दल माहिती पुर्णपणे आयुक्त साहेब देतील आणि ह्यानंतर मग आपण चर्चा करू या.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपण त्याचे जे ॲग्रीमेंट आहे ते नुसते वाचले तरी पुर्ण झाले. कारण त्या ॲग्रीमेंटमध्येच लिहिलेले आहे की, कोणतेही आपत्कालीन मोबदला मिळणार नाही.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य आपण स्थायी समितीमध्ये सदस्य आहात. आपल्याला माहिती आहे काय डिस्प्युट आहे. तिथे काय सुसंवाद झाला आहे ते आपल्याला ही माहिती आहे. ते आम्हाला येथे सभागृहाला कळू द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महापौर महोदयांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, महापालिका जकात अभिकर्ता मे. कोणार्क इनफ्रास्ट्रक्चर ह्यानी माहे २६ जुलै, २००५ रोजीच्या दरम्यान जी मिरा भाईंदर व परिसरात मोठी अतिवृष्टी झाली आणि दैनंदिनी ट्रान्सपोर्टेशनमध्ये, दळणवळणामध्ये नागरिकांच्या जीवनमानामध्ये व्यत्यय आला आणि त्या अनुषंगाने त्या दरम्यानच्या एक हप्त्यामध्ये जे अपेक्षित उत्पन्न आहे ते त्याला मिळू शकलेले नाही आणि त्या हप्त्यामध्ये जे नुकसान झालेले आहे, १ कोटी ६२ लाख रूपये, ते महापालिका त्यांचे एकूण देय होणाऱ्या रक्कमेतून रिबीट द्यावी किंवा ही नुकसान भरपाई द्यावी अशी त्यांनी मागणी महापालिकेकडे केली होती. त्या अनुषंगाने संबंधितांशी सुनावणी घेण्यात आली आणि संबंधितांनी महापालिकेबरोबर जो करारनामा केलेला आहे त्या करारनाम्यानुसार त्यांनी दर हप्त्याला १ कोटी २० लाख ६१ हजार २०२ रूपये ही रक्कम भरणे अपेक्षित होती तरी आजपावेतो ती रक्कम नियमित भरत आहे. वस्तुस्थितीप्रमाणे त्या काळामध्ये नागरिकांच्या जीवनमानात, राहणीमानात किंवा दळणवळणात जो व्यत्यय आला त्याबाबत त्यांनी जी मागणी केलेली आहे आणि आपल्याशी त्यांनी जो करारनामा केलेला आहे. त्या करारनाम्यामध्ये स्पष्ट क्लॉज नं. १३ मध्ये तरतुद आहे की, ह्या भविष्यामध्ये त्यांनी आपल्याकडून जकात वसुलीचा जो ठेका घेतलेला आहे त्या दरम्यानच्या काळामध्ये जर नैसर्गिक आपत्ती किंवा इतर कोणत्याही कारणाने जर बंद झाला किंवा स्ट्राईक झाली अशी कोणतीही बाब होउन त्याच्या उत्पन्नामध्ये जर काही नुकसान झाले किंवा तोटा झाला तर ते मागण्याचा त्याला हक्क नाही. असे स्पष्ट आपल्या करारनाम्यामध्ये तरतुद आहे. त्या तरतुदीचा विचार करून आणि त्यांनी नियमित रक्कम भरणे हे अपेक्षित आहे आणि ती रक्कम ते आपल्याला भरत आहे. म्हणून त्याचे जे ॲग्रीमेंट आहे त्या ॲग्रीमेंटच्या रेफरन्स घेउन त्याची मागणी आपल्याला मान्य नाही, त्याचा वादच आपल्याला मान्य नाही हा आपण त्यांना निर्णय दिलेला आहे आणि ह्याच करारनाम्यामध्ये दैनंदिन कामकाजामध्ये किंवा इतर कोणत्याही बाबतीमध्ये जकात अभिकर्ता आणि महापालिका ह्यांच्यात कोणतेही वाद उदभवल्यास क्लॉज नं. १२ प्रमाणे यामध्ये लवाद म्हणून प्रधानसचिव नगरविकास विभाग हे काम पाहत आहे अशी आपल्या करारनाम्यामध्ये तरतुद आहे आणि त्यांचे निर्णय जर अंतिम नसेल तर संबंधितांनी कोणीही शासनाकडे अपील करू शकते अशी तरतुद आहे आणि ह्यानंतर ही काही वाद असतील तर सक्षम कोर्टामध्ये वाद मिटवावे अशी तरतुद आहे. तर क्लॉज नं. १२ च्या तरतुदीचा फायदा घेउन आपण त्यांची मागणी फेटाळलेली आहे त्या अनुषंगाने त्यांनी शासनाकडे आपल्या विरोधात अपील केलेले आहे. लवादाकडे अपील केलेले आहे. सन्मा. प्रधानसचिव साहेब त्यावेळेस अधिवेशन चालू होते त्याची बैठक लावलेली होती. पण ती बैठक संपन्न होउ शकली नाही आणि दरम्यानच्या काळात मा. प्रधान सचिवांना या काळामध्ये वेळ अपेक्षित नाही. या अनुषंगाने महापालिकेला मा. आयुक्तांना त्यांनी पत्रव्यवहार केलेला आहे. लवाद म्हणून इतर महानगरपालिकेचे आयुक्त किंवा सहसचिव आपल्याला चालतील का? याबद्दल आपले मत कळवावे. नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त मा. आयुक्त साहेबांनी त्या दरम्यान शासनानेच निर्णय घ्यावा असे पत्र त्यांना पाठवलेले होते दरम्यानच्या काळात शासनाने आपल्याला प्रस्ताव पाठविलेला आहे की, यामध्ये सहसचिव हे लवाद म्हणून काम करतील. याबाबत महापालिकेने आदेश निर्गम करावेत हे आदेश निर्गमित होण्याच्या अनुषंगाने हा प्रस्ताव स्थायी समिती कडे

सादर केला होता. मा. स्थायी समितीने यावर सर्वतोपरी विचार विनिमय करून यामध्ये या प्रकरणात लवाद म्हणून भिवंडी महापालिकेचे आयुक्त श्री. शिवमुर्ती नाईक ह्यांनी कामकाज पाहावे किंवा त्यांच्याकडून शक्य नसेल तर प्रधानसचिवच ह्यामध्ये लवाद म्हणून कामकाज पाहतील असे मा. स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे आणि त्या निर्णयाच्या अनुषंगाने अंतिम निर्णय होण्यासाठी हे प्रकरण मा. महासभेमध्ये आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, सर्वप्रथम मी प्रशासनाचे अभिनंदन व्यक्त करते. कारण त्यांनी क्लिअर पिक्चर आपल्या समोर केलेले आहे. त्यांच्या ॲग्रीमेंटमध्ये क्लॉजमध्ये क्लिअर कट लिहिलेले आहे तर पहिली गोष्ट ही येते की, जेव्हा क्लिअर कट गोष्ट आहे तर हाउसमध्ये असा विषय आणण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. कारण महानगरपालिकेमध्ये आपण जो पैसा गोळा करतो तो लोकांसाठी आपण ठेवायला पाहिजे आणि प्रशासनाला मी पुन्हा धन्यवाद देते. असे ही प्रकरण जेव्हा मी स्थायी समितीमध्ये सदस्या म्हणून होती तेव्हाही दुसरे प्रकरण उद्‌भवीत झाले होते की, मेडीकलवर आपण ऑक्ट्राय कॅन्सल केले होते आणि तो ठराव त्यांच्यापर्यंत पोहचला होता आणि त्यांच्याकडून हप्ते वसूल केले होते आणि ते वसूल केलेले पैसे कुठे गेले, कसे गेले, बोगस बिल किती झाले? त्याचाही आजपर्यंत काही निर्णय झालेला नाही. साहेब, त्याच्यावर देखील आपण लक्ष द्या. तशी मी आपल्याकडे मागणी करते आणि पुन्हा आपले धन्यवाद करते.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आज सभागृहामध्ये आपला जो जकातीचा विषय आलेला आहे ॲक्च्युअली खऱ्या अर्थाने चुकीचा विषय याठिकाणी आणलेला आहे. आज दहा महिने झाले. जुलै महिन्यामध्ये पाउस पडला होता. हा पाउस भाईंदर पुरता पडला नव्हता हा संपुर्ण महाराष्ट्रामध्ये पाउस झालेला आहे आणि कॉन्ट्रॅक्ट सिस्टम जकातीचे महाराष्ट्रामध्ये अनेक महानगरपालिकेमध्ये चालले आहे. इतर महानगरपालिकेमध्ये अशा तऱ्हेने दुसऱ्या कोणत्याही ठेकेदाराने आपली नुकसान भरपाई दाखवलेली आहे का? तर कुठेही झालेली नाही. आपलाच कॉन्ट्रॅक्टवाला आपल्याच महानगरपालिकेत फक्त अशापद्धतीने नुकसान भरपाईची मागणी करतो आणि स्पष्टपणे आपल्या ॲग्रीमेंटमध्ये असे नमुद देखील केलेले आहे. नैसर्गिक आपत्ती असो किंवा आणखीन कुठली आपत्ती असो तरी त्यांना ही भरपाई देता येत नाही. हे सगळं असताना देखिल आपला हा विषय याठिकाणी आणलेला आहे. मी भिवंडी महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, मालेगाव महानगरपालिका अशा महापालिकेत कॉन्ट्रॅक्ट सिस्टम चालली आहे. पण त्याठिकाणी अशा कुठल्याही कॉन्ट्रॅक्टवाल्यांनी अशी नुकसान भरपाईची मागणी केलेली नाही. ही चुकीची मागणी याठिकाणी आलेली आहे. मी आपल्याला सभागृहाच्या वतीने एवढेच सांगेन की, हा जनतेचा पैसा आहे १ करोड ६२ लाख रूपये कमी किंमत नाही हा शहराच्या विकासाच्या दृष्टीने मोठा गंभीर विषय आहे. हा विषय आपण ह्याच्यामध्ये काढून आपल्या महानगरपालिकेमध्ये कोणार्क कंपनी कोर्टामध्ये जरी गेली किंवा प्रधानसचिवांकडे विषय गेला तरी देखील आपण पुन्हा कोर्टामध्ये जाउ शकतो. आपण जो स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे की, भिवंडी महानगरपालिकेचे कमीशनर श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांची जर आपण नेमणूक करायची तर आम्ही या सभागृहामध्ये सर्वानुमते अनुमती देतो की, शिवमुर्ती नाईक साहेबांची नेमणूक करायला काय हरकत नाही. आम्ही सर्वजण शिवमुर्ती नाईक साहेबांना विनंती करू की, आमचा हा जो विषय आहे ह्याच्या साठी आपण निश्चितपणे आमची मागणी मान्य करा आणि ते निश्चितपणे मागणी मान्य करतील. जर शिवमुर्ती नाईक साहेबांनी ती मागणी मान्य केली नाही तर आपण प्रधान सचिवांकडे जाउ शकतो. परतु, कोणार्क एजन्सीची जी नुकसान भरपाईची मागणी आहे ती आपण मान्य करायची नाही. हे मी सभागृहाच्यावतीने आपल्याला सांगू इच्छितो.

**नरेंद्र मेहता :-**

उपायुक्त साहेब, आपले जे १ करोड ६८ लाख रूपयांची आपल्याकडे नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे. ते त्यांनी त्या कालावधीमध्ये आपल्याकडे पैसे भरले आहेत की, बॅलेन्स ठेवले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

ते सर्व त्या ठेकेदाराने रेग्यूलर भरलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की, दुसरी गोष्ट, त्या ठेकेदाराने सांगितले की त्याचे १ करोड ६८ लाख रूपयाचे नुकसान झाले तर मला असे समजले की, बिल बुक डूबली की त्याची गाडी डूबली १ करोड ६८ लाख रूपये ऑक्ट्रायवाल्याचे कसले नूकसान झाले? नुकसान मिरा भाईंदर शहराचे झालेले आहे आणि नुकसानाचा तो माल परत मिरा भाईंदरमध्ये आलेला आहे. म्हणजे एका अर्थी समजा की, एखाद्याचे अनाज गेले असेल, कपड्याचे दुकान गेले असेल तर तेवढे उलट जास्त माल मिरा भाईंदरमध्ये परत आलेले आहे. तर त्याने ते मागायचे कारणच नाही. कारण त्याचे व्यक्तिगत कुठलेही नुकसान झालेले नाही आणि आपण जी परवानगी देत आहोत ती देण्याची गरज असेल तरच परवानगी द्यावी आणि द्यायचे नसेल, आपल्याला आरबीट्रेटर अप्वॉईंट करायचे आहे.......

**रिटा शाह :-**

साहेब, त्याच्याही पलीकडे जाउन सांगते की, आपण जो ऑक्ट्रायचा ठेका त्यांना दिलेला आहे. त्याच्यावर तो पॅनेल्टी वसूल करतो. ॲक्च्युअली त्याला पॅनेल्टी वसूल करण्याचा अधिकार नाही. ते पैसे कुठे जातात?

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, त्याने एके वेळी असे केले, आज मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये आणि जे ऑक्ट्राय व्हॅल्युएशन करतात त्यांच्यावर जो दहापट ऑक्ट्राय स्विकारायचा आहे तो मिरा भाईंदर महानगरपालिकेचा अधिकार आहे. पण तो ठेकेदारच दहा टक्के ऑक्ट्राय वसुली करत आहे. तर कुठेतरी ते दाबले तर ते बॅलेन्स होईल.

**मिलन म्हात्रे :-**

विषय क्र. २० करिता जी स्थायी समितीची टिपणी दिलेली आहे. हा ठराव दि. ०५/०५/०६ रोजी झालेला आहे. सदर ठरावाची आम्हाला माहिती मिळाल्यानंतर प्रशासनाच्या वतीने सन्मा. शिवमुर्ती नाईक साहेब ह्यांच्याशी काय विचारणा केली गेली का? कारण हा ठराव पारित झाल्यानंतर मी स्वतः त्यांच्याशी या विषयावर बोललो. एका ठिकाणी त्यांची भेट झाली तर त्यांनी मला स्पष्ट भाषेत सांगितले की, मला माझ्या कामामध्ये फुरसत मिळत नाही. मला हे अतिरिक्त काम झेपणार नाही आणि मी ह्या कामाचा नकार कळवणार आहे. हा ठराव पारित झाल्यानंतर मी विचारले. आता सभागृहापुढे विषय आलेला आहे. सन्मा. उपायुक्त खतगांवकर साहेबांनी जी माहिती दिली. जर ॲग्रीमेंटमध्ये तरतुद असेल तर आपल्याला पुढचा विचार करण्याची काही गरजच नाही. ॲग्रीमेंटमध्ये कुठे दिले आहे, आरबिट्रेटर नेमा असे.

**मा. आयुक्त :-**

आहे. तसे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कारण सांगतो तुम्हाला, ह्याच्यावर मी पत्रव्यवहार केलेला आहे आणि अजूनपर्यंत आम्हांला ॲग्रीमेंटची कॉपी मिळालेली नाही. ह्याच्यावर माझा पत्रव्यवहार आहे. मला अजून त्याच्यातल्या बऱ्याचशा कॉपीझ मिळालेल्या नाहीत. हार झाल्यानंतर ह्याच्यावरती मी हायकोर्टामध्ये रिट केले होते. त्या संदर्भामध्ये मी पत्रव्यवहार केला. प्रत्येक आपल्या ऑक्ट्रायच्या टेंडरवर माझे रिट आहे. माझी दोन रिट झाली आहेत. ह्याच्यामध्ये काही माहिती मागितली असतासुद्धा मिळालेली नाही. म्हणून मी पहिलाच बोललो यामध्ये आयुक्तांनी टिपणी द्यायला हवी होती की, ह्याच्यामध्ये कुठची कुठची रिट झाली आहे? तो कोर्टात गेला होता का? ह्याच्यामध्ये कोर्टाने काय आदेश दिलेले आहेत का? आमची स्टेप काय असावी? आता आपण जे म्हणलात, ह्याच्यावर आम्हांला निदान त्या ॲग्रीमेंटचे क्लॉज वाचून दाखवले त्याचे पान तरी आम्हाला येथे लावून द्यायला पाहिजे होते. ते सुद्धा आम्हाला मिळालेले नाही. आता पुढे आणखीन एक विषय आहे त्याच्यावर टिपणीच नाही. मेन म्हणजे आम्ही निर्णय घ्यायचा कशावर? आपण आम्हाला ही माहिती दिली जर माहिती नसती मिळाली. सन्मा. सदस्य रतन पाटील ह्यांनी विचारल्यावर तुम्ही आम्हाला माहिती दिली. पण माहिती मिळालीच नसती तर आम्ही कुठे गेलो असतो? कारण ही माहिती सभागृहाला सभागृहाला पहिला कोणताही निर्णय व्हायच्या अगोदर सदस्यांना द्यायची हा सभाशास्त्रानुसार नियम आहे. ह्या येथे आम्हाला कुठल्याही प्रकारची टिपणी दिलेली नाही. हा ठराव एक लावून दिला आणि त्याच्यात काय ही क्लिअर दिलेले नाही. प्रधान सचिव किंवा आपले शिवमूर्ती नाईक ह्या दोनपैकी कोणतरी एक ठरवायचे आहे. पण त्याचे कॉम्पनसेशन किती आहे? कशाकरिता आपला वाद झाला आहे आणि माझे म्हणणे असे कशाकरिता स्पष्ट आहे की, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आणि आपल्याकडे जिकडे जिकडे अतिवृष्टी झाली त्या ठिकाणी ट्रान्सपोर्टपेक्षा सर्व जनजीवन ठप्प होते. शासनाने उलट सगळ्यांना कॉम्पनसेशन दिले आहे. कारण ट्रान्सपोर्टच चालू नव्हते आणि हे सगळं जगजाहीर आहे. आपण काय पुरावे द्यायची गरज नाही. असे असताना हा वाद घोळत ठेवण्यापेक्षा या सभागृहामध्ये त्याला कॉम्पेन्सेशन देउ नये असा ठराव आपण पास करावा अशी माझी आपल्याला विनंती आहे. कशासाठी आपण त्या डिसप्युटमध्ये जायचे? परत कुठेतरी फाटे फुटतात. कायदा कुठेतरी येतो. सभागृहात सरळ स्पष्ट सर्व सन्मा. सदस्यांना मी सांगतो की, १ करोड ६२ लाखाचा हा विषय आहे. सरळ ठराव करून टाकावा की, ह्याला हे कॉम्पन्सेशन देण्यात येउ नये आणि आरबिट्रेटर जे काय असेल ते ह्या ॲग्रीमेंटनुसार काम करावे, विषय संपला.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी आता जे सांगितले की, शिवमूर्ती नाईक साहेबांशी त्यांनी चर्चा केली आणि नकार दिला. ही चुकीची गोष्ट आहे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण मला परवानगी दिल्यानंतर हे सदस्य बोलत आहे तर मी बसू का?

**दिनेश नलावडे :-**

आज सकाळी माझे त्यांचे फोनवरून बोलणे झाले असता त्यांनी नकार दिलेला नाही. ते बोलले सभागृहामध्ये जो काही निर्णय होईल त्या नंतर कामकाज करू. पण त्यांनी नकार दिलेला नाही. ह्याची कृपया मा. महापौर मॅडम आपण नोंद घ्यावी.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण एखादा निर्णय घेताना ठोस निर्णय घ्या. त्याच्यामुळे असे प्रश्न निर्माण होतात.

**मा. महापौर :-**

माहित आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला माहिती आहे हो, मॅडम आणि आम्हाला ही माहिती आहे. आम्ही तिसऱ्या टर्ममध्ये आहोत, नगरसेवक म्हणून. आम्हाला सगळे नियम माहिती आहेत. दि. ०५/०५/२००६ च्या स्थायी समितीमध्ये मुळातच विषय काय चालला आहे. जर तांदळाच्या गोणी भिजल्या असतील तर त्यांनी ऑगस्टमध्ये तांदुळ आणलेले असेल म्हणजे त्याचा ऑक्ट्राय त्याला मिळाले. कपडे भिजले तर कपडे लोकांनी खरेदी केलेले आहेत. ते आणताना त्यानी त्याचा ऑक्ट्राय घेतलेला आहे. परंतु २५ आणि २६ तारखेचे दाखवून हे अशा तऱ्हेने महापालिकेला लूबाडण्याचे षडयंत्र तो रचतोय त्याच्यासाठी आपल्या शहरातले काही लोक त्याला सामिल होण्याची शक्यता आहे. हे लक्षात घ्या. मी कुणाचे नाव घेत नाही आणि ह्या गोष्टीचा आपण संपूर्णपणे विरोध केला पाहिजे. प्रधान सचिवांची नेमणुक आपण करावी.  आपण शिवमुर्ती नाईक साहेबांना विनंती करूया की, आपण चांगले काम केलेले आहे. पुन्हा एकदा आम्हाला मदत करा. अशी त्यांना सभागृहातर्फे विनंती करूया त्यांनी जर मान्य नाहीच केले तर प्रधान सचिवांशिवाय इतर कोणाचीही आपण मान्यता करू नये आणि जर आपण हरले तर आपण सुप्रीम कोर्टामध्ये जायची तयारी करूया. असे मी या सभागृहाला सांगू इच्छितो.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, या संदर्भामध्ये मा. सभागृहाला अधिक माहितीसाठी शासनाचे एक पत्र आलेले आहे. हे पत्र मी आपल्याला वाचून दाखवतो.

(पत्राचे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, मॅडम आता आमचे जेष्ठ सदस्य जयंत पाटील यांनी सविस्तर माहिती दिलेली आहे. ते बरोबर आहे. आमच्या स्टँन्डींगमध्ये ही गोष्ट झालेली आहे आणि स्टँन्डींगने हा ठराव बरोबर केलेला आहे म्हणून मा. महासभेने हा विषय आणलेला आहे. मा. महासभा सर्वश्रेष्ठ असल्याकारणाने तो विषय आणला गेलेला आहे आणि त्याला मा. महासभेची मान्यता पाहिजे आणि आपले ॲग्रीमेंटच्या बाहेर आपले जे ॲग्रीमेंट झालेले आहे. त्याच्याप्रमाणे त्याच्या ॲग्रीमेंटच्या बाहेर कोणताही लवाद नेमलेला जो असेल तो कोणत्याही ॲग्रीमेंटच्या बाहेर जावून कोणताही निर्णय देवू शकत नाही. ते आम्हाला सुद्धा माहिती आहे ह्याच्या बाहेर नक्कीच आपल्या ॲग्रीमेंटच्या बाहेर कोणी लवाद देउ शकला नाही, ही आम्हाला पुर्ण खात्री आहे. म्हणून त्यांनी कुठेही जावे. म्हणून आम्ही शिवमुर्ती साहेबांना म्हटलेले आहे. शिवमुर्ती साहेबांकडे नाही झाले तर प्रधान सचिवांनी हा निर्णय दिला तरी तो आपल्या महानगरपालिकेच्या हद्दीत राहूनच ते निर्णय देणार आहेत ही खात्री आहे आणि नक्कीच ते काम होणार आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, याठिकाणी जो विषय आलेला आहे. प्रकरण क्र. २० जकात वसूली बाबत मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका आणि अभिकर्ता कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि. ह्यांच्यातील वादाबाबत केलेल्या कारवाई बाबत अवलोकनार्थ सादर, ह्यामध्ये महापालिकेने कारवाई काय केली? त्याची आम्हाला डिटेल्स दिलेली नाही आणि जो स्थायीला विषय मांडला तो ही अवलोकनात विषय मांडला होता आणि मा. महासभेत तो विषय अवलोकनार्थ मांडलेला आहे.  अधिकार कोणाला? जर स्टँन्डींगला अधिकार होते तर हा विषय पुन्हा मा. महासभेत का आणला? आणि मा. महासभेला अधिकार होते तर मग विषय स्टँन्डींगला का मांडला? दोन्ही ठिकाणी फक्त अवलोकनार्थ पाठवलेला आहे आणि लवाद नेमला. आपण ॲग्रीमेंटमध्ये जे प्रधान सचिव नेमलेले आहे. त्यामुळे इतर कोणाचीही नेमणूक करायचा प्रश्न येत नाही. त्यामुळे प्रधान सचिवांना अधिकार आपण ॲग्रीमेंटमध्ये दिलेले आहे. आता प्रधान सचिवांनी शासनाच्या वतीने जे पत्र आणले आणि सह सचिव श्री. खवारे यांना नेमावे असे पत्र आलेले आहे. त्याबाबत सभागृहाला निर्णय घेणे याठिकाणी विचार करायला लागेल आणि दुसरी बाब अशी आहे, साहेब, लवादा समोर जेव्हा प्रकरण चालेल तर आपल्या महापालिकेची बाजू कोण मांडणार. हा ही विषय महत्वाचा आहे ना. त्या अनुषंगाने आपल्याला कोण वकिल किंवा तज्ञ नेमावा लागेल का? या गोष्टीचा याठिकाणी विचार होणे आवश्यक आहे का? कारण फक्त लवाद नेमून त्यांच्यासमोर हेअरींग चालेल. पण आपली बाजू कोणत्या ठिकाणी मांडणार? मग, आपण प्रशासन म्हणून मांडणार की, आपण आपले वकील वगैरे, तज्ञ नेमणार. त्यावरती या गोष्टीचा याठिकाणी विचार होणे आवश्यक आहे आणि

मा. महासभेला अधिकार असेल तर त्याप्रमाणे लवादाच्या समोर करावे आणि तज्ञ वकिल त्याठिकाणी नेमून आपली बाजू मांडावी अशी मी ह्या ठिकाणी शिफारस करित आहे.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, जकात अभिकर्ता और महापालिका इनमे विवाद के लिए जो शिवमुर्ती नाईक साहब का आपने नाम इधर स्टँन्डींग कमीटी मे सुनाया उसका किसीभी सदस्य का यहापर विरोध नही है। शिवमुर्ती नाईक साहब यह एक सक्षम मा. आयुक्त साहब है। और उनके द्वारा भिवंडी महानगरपालिका मे जिस प्रकार ६० करोड रूपये का जिस प्रकार उसने अभिकर्ता से वापस लिया। शासन ने देने के बाद भी। सुप्रीम कोर्ट मे जाके स्टे लाके उनको दिया नही। तो मेरी आपसे रिक्वेस्ट है की, मा. सभागृह की भावना शिवमुर्ती नाईक साहब को बतादी जाए की, सभी सभागृह पैसा देने के विरोध मे है। और आप उसका निर्णय उचित लेंगे ऐसी उनको हमारी भावना बतादी जाए। धन्यवाद।

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ठराव करताना माझी एक विनंती आहे की, निर्णय त्याच्या अगोदरची पार्श्वभूमी सांगते की, स्थायी समिती कडे हा विषय निर्णयाला येत असताना आणि आज मा. महासभेमध्ये येत असताना. मा. आयुक्त साहेबांनी ह्याच्यामध्ये पहिल्यांदा त्यांना ओढवण्याच्या कामी चांगली पावले उचलली की, जो क्लॉज त्यामध्ये नाहीच आहे, नुकसान भरपाईचा. तर त्यांनी पहिल्या फेरीतच उडवून लावलेला आहे. तर त्याबद्दल मा. आयुक्त साहेबांचे त्या ठरावामध्ये अभिनंदन करावे की, पहिलेच पाउल चांगले उचललेले आहे आणि आपण आता दुसऱ्या पावलाकडे वाटचाल करत असताना मा. सभागृहाची भावना ध्यानात ठेवून आणि आपण दुसऱ्या मार्गाचा अवलंब करावा. अशी आपणांस विनंती आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते, की, त्याच्याही पलीकडे जावून मी सांगते की, लवादचा मिनिंग मला माहित पडले नाही. पण आता मला सन्मा. सदस्या प्रभात पाटील मॅडम ह्यांनी संगितले, आपण काहीतरी कमिटी फॉर्म करणार आहे. जी गोष्ट आपण देवू शकत नाही, होवू शकत नाही, आपल्या ॲग्रीमेंटमध्ये क्लिअर कट लिहीलेले आहे. त्याच्यामध्ये तुम्ही शोधाशोध काय करणार आणि रिपोर्ट काय लावणार आहे आणि कमिटीची कशाला गरज आहे. तो क्लिअर कट विषय आहे. मा. आयुक्त साहेबांनी तसा निर्णय दिलेला आहे. मला वाटते की, स्थायी समिती किंवा मा. महासभेला असे काही अधिकार आम्हाला राहिलेलेच नाही. आपल्या ॲग्रीमेंटमध्ये जे क्लॉज लिहिलेले आहे की, त्याला द्यायचेच नाही. मग, त्याचा आपण शोधाशोध काय करणार आणि कमिटी त्याच्यावर निर्णय काय लावणार आहे. त्याच्यामध्ये फक्त एकच निर्णय आहे की, प्रधान......

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, त्याच्यामध्ये मला वाटते की, मा. उपायुक्त, खतगावकर साहेब, यांनी मघाशी वाचले, १२ नंबर मध्ये काहीतरी नमुद केले की, त्याला पुढे न्याय मागण्याचा, दाद मागण्याचा त्याला अधिकार दिलेला आहे, त्यानुसार त्यांनी मागितले.

**रिटा शाह :-**

त्याला दाद मागण्याचा अधिकार आहे ते कुठेही जावून दाद मागवू देना. हायकोर्टाला जावू द्या. सुप्रीम कोर्टाला जावू द्या. कुठेही जावू द्या. पण महागरपालिकांना त्याला सहकार्य करण्यासाठी आपल्याला कमिटी कशाला बनवायला पाहिजे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, सदर बाबतीमध्ये त्याची मागणी सन्मा. आयूक्त साहेबांनी वेळीच अमान्य केलेली आहे. त्याच्यानंतर तो क्लॉज १२ प्रमाणे आरब्यूटेशन ॲक्सलेट थ्रू गेला तिकडून सुद्धा हे झाले नाही. त्याच्यामुळे क्लॉज २२ प्रमाणे आता चेक सेक्रेटरी कडे हा प्रकरणनेण्याचा विषय मा. महासभेपूढे आलेला आहे.

(सन्मा. सभागृह नेता श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. २० च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**परशुराम पाटील :-**

अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव पुढील विषय घेण्यात यावा. विषय क्र. २६ हा २१ क्र. वर घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. २० :-**

सन २००५-०६ सालातील जकात वसुली बाबत आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका आणि अभिकर्ता मे. कोनार्क इन्फ्रा. प्रा.लि. ह्यांच्यातील वादाबाबत (Dispute) मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले दि. ०५/०५/२००६ रोजीचे प्रकरण क्र. १३ मंजुर करणे बाबत.

**ठराव क्र. १९ :-**

संदर्भाधिन विषयानुसार कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००५-०६ सालातील जकात वसूलीचा ठेका मे. कोनार्क इन्फ्रा. प्रा. लि. ह्यांना करारनाम्यातील मंजुर अटीशर्तीनुसार दिलेला आहे.

प्रस्तुत संदर्भात माहे जुलै दि. २६/०७/२००५ रोजी अतिवृष्टी झाल्याने त्याचा विपरीत परिणाम जकात वसुलीवर झाल्याने त्याबाबत मे. कोनार्क इन्फ्रा. प्रा. लि. ह्यांनी दि. ०१/०८/२००५ दि ०५/०८/२००५ दि. ०९/०८/२००५ रोजी पत्र पाठवून त्याबाबत दि. २६ जुलै २००५ ते दि. १५ ऑगस्ट २००५ एकूण २१ दिवसाच्या, प्रती दिन रू. ७,७६,०८९/- प्रमाणे झालेली रू. १,६२,९७,८६६/- एवढी नुकसान भरपाई मिळणे बाबत त्यांनी मागणी केलेली होती. सदर संदर्भात मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि. २२/०८/२००५, दि.२९/०८/२००५ दि.२३/०९/२००५, दि. १३/१०/२००५ दि.२७/१२/२००५ दि. ०९/०१/२००६ दि. १०/०२/२००६ रोजी पत्रे पाठवून दि. २६ जुलै २००५ च्या अतिवृष्टीमुळे व तद्नंतर उद्‌भवलेल्या परिस्थितीमध्ये जकात उत्पादनात झालेल्या नुकसानीच्या अनुशंगाने करारनाम्यातील अटीशर्तीनुसार नमुना क्र. ३१ मध्ये दैनंदिन जकात वसुलीची माहिती देण्यास कळविण्यात आले होते. परंतू, ठेकेदाराकडून आवश्यक माहिती उपलब्ध होउ शकली नाही.

सदर प्रकरणी उपायुक्त (मु.) यांच्याकडे दि. ३०/१२/२००५ व दि. १०/०१/२००६ रोजी सुनावणी घेउन ठेकेदानाचे म्हणणे ऐकूण घेण्यात येउन महापलिका पत्र जा. क्र. / मनपा/जकात/३७६/२००५अ०६ दि. १०/०२/२००६ अन्वये कुठल्याही स्वरूपाची नुकसान भरपाई दिली जाणार नाही, असे मा. आयुक्त सो ह्यांचे मान्यतेने कळवून प्रकरण निकाली काढणेत आलेले होते.

सदर संदर्भात मे. कोनार्क इन्फ्रा. प्रा. लि. ह्यांनी मा. प्रधान सचिव - २, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ह्यांच्याकडे दि. १६/०३/२००६ रोजी पत्र देउन निविदा प्रपत्रातील Clause no. 22 प्रमाणे त्यांनी सदर नुकसान भरपाई बाबतचा वाद हा प्रधान सचिव ह्यांच्याकडे मांडलेला आहे. सदर बाबत मि. भा. म. पा. ११०६/५३०/प्रक्र ७१/०६/नवी २८ नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई - ३२ दि. २८/०३/२००६ च्या पत्राने निविदा प्रपत्रातील खंड २२ अन्वये मा. प्रधान सचिव -२, नगरविकास विभाग यांच्याकडे निर्णयाकरिता बैठक आयोजित केलेली होती. सदर संदर्भात महाराष्ट्र शासन पत्र क्र. मि.भा.म.पा. ११०६/५३० प्रक्र, ७१/०६/नवी २८ नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई - ३२ दि. १३/०४/२००६ रोजीच्या पत्रानुसार त्यांनी दोन्ही पक्षात झालेल्या वादासंदर्भात निर्णय घेण्यासाठी प्रधान सचिव - २ यांच्या ऐवजी शासनातील सहसचिव किंवा अन्य महानगरपालिकेचे आयुक्त ह्यांची सदर संदर्भात लवाद म्हणून नियुक्ती केल्यास आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिकेची समंती असल्यास त्याबाबत शासनास तसे कळविणे बाबत सुचित केले होते. शासनाच्या सदर पत्रास इकडील पत्र क्र. मनपा/जकात/४२/२००६-०७ दि. १७/०४/२००६ नुसार कळवून सदर वादासंदर्भात निर्णय घेण्यासाठी प्रधान सचिव - २ ऐवजी शासनातील सहसचिव अथवा अन्या महानगरपालिकेचे आयुक्त ह्याचे लवाद म्हणून नियूक्ती केल्यास त्यास मनपाची सहमती राहील असे कळविण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक मि.भा.म.पा. ११०६/४३० प्रक्र, ७१/०६/ नवी २८ नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दि. २५/०४/२००६ च्या पत्राने लवाद कामी शासनाचे सहसचिव मा. श्री. के. एन. खवारे यांची शिफारस शासनाने केली असून आवश्यक आदेश निर्गमित करण्यास सुचीत केलेले होते. त्या अनुषंगाने प्रस्ताव अवलोकनार्थ स्थायी समिती समोर सादर केला असता स्थायी समिती ठराव क्र. १४ दि. ०५/०५/२००६ नुसार त्यांनी सदर प्रकरणात लवाद म्हणून मा. . श्री. के. एन. खवारे, सहसचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२ यांच्याऐवजी श्री. शिवमुर्ती नाईक, आयुक्त, भिवंडी महानगरपालिका ह्यांची नियुक्ती करण्यास मान्यता दिलेली आहे. तथापि मा. आयुक्त, भिवंडी लवाद म्हणून कामकाज पाहण्यास हि महासभा मान्यता देत आहे. तसेच सदर वादांसंदर्भात मा. प्रधान सचिव - २ यांच्याकडील निकाल विरोधात गेल्यास म.न.पा. मा. उच्च न्यायालयात दावा दाखल करील व मा. उच्च न्यायालयातील निकाल विरोधात गेल्यास म.न.पा. मा. सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल करेल. सदरची कार्यवाही करणेबाबत ही महासभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने प्रकरण क्र. २६ हा विषय अगोदर घेण्यासाठी मा. महापौर मॅडम यांनी सुचना केलेली आहे.

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. २६ चे वाचन केले.)

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, याठिकाणी गोषवारा दिलेला नाही. तर समित्या कोणत्या आहेत?

(सन्मा. सभागृह नेता श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. २६ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**रिटा शाह :-**

या ठरावाला अनुमोदन देताना मी असेही नमुद करते की, दोन कमिटी आपण फॉर्म करतो. त्याच्याबरोबर बांधकाम आणि नियोजन सुद्धा आपण फॉम करा अशी मी सुचना करत आहे. अनुमोदन आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, आजच्या मा. महासभेवरती फक्त दोन समित्यासाठी हा विषय घेतलेला होता पण तशा पद्धतीच्या विशेष समित्या जर आपल्याला स्थापन करायच्या असतील तर सभेकडून वाढीव समित्यांची मागणी झालेली आहे. प्रशासनाकडून त्याचा खुलासा व्हावा. जर तशा पद्धतीने प्राविधान असेल तर त्याच्यावर विचार करा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. २६ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण क्र. २ नियम ३० पोटकलम १ अन्वये विषय समित्या स्थापन करणे बाबत. सन्मा. सभागृह नेता हॅरल बोर्जीस साहेब यांनी ठराव मांडलेला आहे. त्यांना अनुमोदन देत असताना आमच्या सहकार्य पक्षाच्या नगरसेविका सन्मा. जेष्ठ सदस्या रिटा शाह यांनी विनंती केली. त्यांनी उपसुचना केलेली आहे की, दोन समित्या अजून गठीत करण्यास पाहिजे असे मला वाटते. विषयपत्रिकेवर विषय असाच आहे की, विशेष समित्या स्थापन करणे. विशेष समित्या स्थापन करण्याचा विषय असेल तर माझ्या सहकारी पक्षाने जी मागणी केलेली आहे. त्याप्रमाणे आणखीन दोन समित्या गठित करण्यास काहीच हरकत नसावी आणि एक से भले दो, दो से भले चार होवू द्या. म्हणजे ४ समित्या गठित करण्यास हरकत नसावी.

**रिटा शाह :-**

मी सुचना केली होती की, दोन कमिटी करताना पण फॉर्म करते वेळी विषय कसा जाईल विशेष समित्या स्थापन करणे जेव्हा समित्या ह्या स्थापनच करायच्या आहेत तर आपण दोन विभाग कशाला सोडायचे म्हणून बांधकाम विभाग आणि नियोजन कमिटीवर कमिटी फॉर्म करायची असा मी ठराव मांडत आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

विशेष समित्या स्थापन करणेबद्दल मी दोन समित्यांचे वाचन केले. त्यामध्ये सन्मा. सदस्या रिटा शाह यांनी अतिरिक्त दोन समित्यांची वाढ सुचवलेली आहे त्या सगळ्यामध्ये अंतर्भुत करून सगळे ठराव मंजुर करावे. अशी मी विनंती करतो.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. २६ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम ३० पोटकलम १ अन्वये विशेष समित्या स्थापन करणेबाबत.

**ठराव क्र. २३ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये (१) पाणी पुरवठा समिती, (२) विधी कामकाज समिती, (३) बांधकाम समिती व (४) नियोजन समिती अशा चार समित्या गठित करण्यास ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(लंच टाईम दु. ०१.४० वा.)**

**नगरसचिव :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने जेवणानंतर सभेच्या कामकाजाला सुरूवात होत आहे. मा. आयुक्त साहेबांनी पाठवलेले कामकाज.

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. २१ चे वाचन केले.)

**अनंत पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, मौजे भाईंदर सर्व्हे नं. ६५२, ७५८, ७५९ पै. ७७८ पै. जागा नाविकास विभागात अंतरापासुन या सी.आर.झेड. नुसार बाधित आहे. सदर जागेमध्ये हे जे काही सर्व्हे

केलेले आहे. आपल्या महापालिकेमध्ये सर्व्हे करण्याची व्यवस्था आहे काय? सर्व्हे करणारा कोणी अधिकारी आहे का? सर्व्हे करणारा अधिकारी आपल्याकडे आहे का?

**मा. आयुक्त :-**

आपला जो प्रश्न आहे तो मला जर पुन्हा एकदा सांगा.

**अनंत पाटील :-**

आपण ही जी टिपणी दिलेली आहे.

(मा. आयुक्त साहेबांनी पुन्हा प्रकरण क्र. २१ चे वाचन केले.)

**अनंत पाटील :-**

तर मला ह्या संदर्भात एवढेच म्हणायचे आहे की, कब्रस्तान, स्मशानभुमिला आमचा विरोध नाही. परंतु, सर्व्हे करताना आपल्याकडील सर्व्हेअर आहे त्या सर्व्हेअरनी जागा पाहिली का? मला ह्याचे उत्तर द्या.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य सदर जागेची पाहणी केली का, याचे उत्तर आपणांस पाहिजे.

**अनंत पाटील :-**

नाही. पाहणी केली सर्व्हे झालेला असेल असे तुमचे जर म्हणणे असेल तर त्याची जी काही मार्कींग आहे म्हणजे आपण मार्कींग करतो. त्याच्यामध्ये मार्किंग केलेले आहे का? सध्या ७७८ सर्व्हे नं. हा सुभाषचंद्र बोस मैदानाचा आहे. सुभाषचंद्र बोस मैदान आपल्याला कब्रस्तानाला द्यायचे आहे काय? मला ह्याची माहिती द्या. ७७८ सर्व्हे नं. २३० हा नविन सर्व्हे नं. आहे. सुभाषचंद्र बोस मैदानाच्या अंतर्भूत आहे. तर सुभाषचंद्र बोस मैदान आपल्याला कब्रस्तानासाठी द्यायचे काय?

**अशोक ब. पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, प्रकरण क्र. २१ हा विषय आपण अजेंडावर आणलेला आहे. हा विषय आणताना ह्याच्या बरोबर प्रशासनाने टिपणी जोडलेली नाही. तर प्रशासनाच्या संबंधित हा विषय आहे का? प्रशासनाला ह्या विषयाची पूर्ण माहिती आहे. प्रशासन या विषयाशी सहमत आहे का? ह्याचा जरा पहिल्यांदा खुलासा व्हावा.

**अनंत पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांची टिपणी ह्याच्यामध्ये आहे.

**अशोक ब. पाटील :-**

टिपणी कुठे आहे?

**अनंत पाटील :-**

टिपणी तुम्हाला मिळाली नसेल पण टिपणी आहे.

**अशोक ब. पाटील :-**

आम्हाला गोषवाऱ्याची कॉपी मिळाली नाही. कृपया ती मिळण्याची व्यवस्था करावी. सचिव साहेब, आम्हाला गोषवाराची कॉपी मिळाली नाही. कृपया ती कॉपी मिळण्याची व्यवस्था करावी.

**नगरसचिव :-**

गोषवारा ह्याच्यात दिलेला आहे. विषय दिलेला आहे सर्व्हे नं. ७७८ त्याच्या ऐवजी गोषवाऱ्यात टिपणी दिलेली आहे. त्याच सर्व्हे नंबरचा विचार करायचा आहे.

**अनंत पाटील :-**

७७८ सर्व्हे नंबरचा खुलासा करा.

**नगरसचिव :-**

७७८ नाही गोषवारा नंबर दिलेला आहे ना. गोषवाऱ्यामध्ये नंबर दिलेला आहे.

**अनंत पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपल्या टिपणीमध्ये गोषवारा आहे. सर्व्हे नंबर जे आहे. त्या सर्व्हे नंबरच्या संदर्भात आपल्याला प्रश्न विचारलेला आहे की, जो ७७८ सर्व्हे नं. ७५२, ७५८, ७५९ आणि ७७८. तर ७७८ सर्व्हे नंबरची परिस्थिती काय आहे? यामध्ये काय काय आहे? त्याचा आपण खुलासा करावा.

**दिलीप घेवारे :-**

सर्व्हे नं. ७७८ मध्ये स्टेडियमचे आरक्षण आहे. परंतू, पार्टली जैमीन नो डेव्हलपमेंट झोन मध्ये आहे. या विकसीत भागामध्ये आणि आता आपण जो प्रस्ताव केलेला आहे. हा प्राथमिक स्वरूपाचा प्रस्ताव आहे. आता ह्याच्यामध्ये, स्मशानभुमी, दहनभुमी, दफनभुमी आणि बगीचा असे आपण २५ एकरमध्ये आरक्षण प्रस्तावित करत आहे. आता आपल्या मा. महासभेने मंजुरी दिल्यानंतर आपण त्याचे प्लॅन आणि ते नोटीफिकेशन तयार करून पेपरला आणि गॅझेटमध्ये देवू या आणि त्याच्यानंतर त्या लोकांचे त्या जनतेचे ऑब्जेक्शन येतील.....

**अनंत पाटील :-**

साहेब, मला फक्त एवढच म्हणायचे आहे की, ७७८ सर्व्हे नंबर जो आहे ना. त्यात पार्ट १ आहे, पार्ट २ आहेत, पार्ट ३ आहेत, तर सुभाषचंद्र बोस मैदान आहे. ते त्यात अंतर्भुत आहे. सुभाषचंद्र बोस मैदानामध्ये तुम्ही कब्रस्तान, स्मशानभुमी बनवणार आहात काय? असा माझा प्रश्न आहे.

**दिलीप घेवारे :-**

नाही. तसे नाही.

**अशोक पाटील :-**

मग, तुम्ही पर्टीक्युलर सांगा ना. २ हेक्टरमध्ये सुभाषचंद्र बोस मैदान आपण विकसित केलेले आहे. जागा उरते कुठे? आहे ते सगळे झोपडपट्टीमध्ये बसलेले आहे ७७८ सर्व्हे नं. बद्दल मी बोलतो.

**दिलीप घेवारे :-**

७७८ सर्व्हे नं. हा नं. सरकारी फॅक्टर ची जमीन आहे. हा फॅक्टर एरिआ आहे.

**अशोक पाटील :-**

सरकारी आहे. त्याच्यामध्ये आपण गार्डन विकसित केलेले आहे.

**परशुराम पाटील :-**

साहेब, या गोष्टीला ७७८ सर्व्हे नं. जो आहे ना. तो भाईंदर स्मशानभूमी पासून लागला तो सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत लागला. हा कलेक्टर लॅन्ड आहे आणि त्याच्यामध्ये ७४७ काहीतरी तुम्हाला दिलेले आहे. तो जो निर्णय आहे. ती गॅरेन्टी सॉल्ट डिपार्टमेन्टची आहे. मग, आता आपण विकसित करण्यासाठी जे कब्रस्तानासाठी जागा देतात मग हा सर्व्हे नंबर कोणाचा आहे आणि ते आता सेन्ट्रल गर्व्हमेंटचा आहे. मग त्याच्यात तुम्ही करू शकाल का?

**दिलीप घेवारे :-**

मी सांगतो. जे सर्व्हे नं. ७५८ आहे ते बुबू आगार आहे. सॉल्ट डिपार्टमेंट ७५९ आहे ते कांदुर्ली आगार आहे.

**अनंत पाटील :-**

साहेब ७७८ सर्व्हे नं. आहे तो बिन आकारणी खाजन आहे. ते जवळ जवळ ३ हेक्टर ७० प्वॉईन्ट आहे. त्याच्यानंतर ७७८ सर्व्हे नं. ७८ ब ७७८ नं. ६ आर आहे. याच्यानंतर ७७८ सर्व्हे नं. १ 'अ' ८ हेक्टर ७ आर आहे. पण या संदर्भात आम्हाला एवढे म्हणायचे आहे. सुभाषचंद्र बोस मैदान जे बसलेले आहे. त्या संदर्भामध्ये तुम्ही स्मशान, कब्रस्तान वगैरे जी काही व्यवस्था करणार आहात का? हा माझा प्रश्न आहे.

**दिलीप घेवारे :-**

त्यानंतर ६५२ सर्व्हे नं जो आहे. तो राधा स्वामी सत्संगचा आहे.

**अनंत पाटील :-**

७७८ सर्व्हे नं. बद्दल बोलतात.

**दिलीप घेवारे :-**

७७८ सर्व्हे नं. बद्दल सांगितल ना की, ती सरकारी जमीन आहे.

**मिलन पाटील :-**

ती किती आहे त्याचा सर्व्हेचा रिपोर्ट असेल ना, तुमच्याकडे सर्व्हेचा रिपोर्ट असल्याशिवाय तुम्ही हा विषय मा. महासभेत ........

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, की मागच्या कामाला गेल्यावर्षी तुम्ही लिडर काळ लावलेला होता की, कब्रस्तान ह्याच्यासाठी आणि ख्रिश्चन धर्मीयांसाठी बनवायचे होते भाईंदर इस्ट ला सर्व्हे नं. दिलेला आहे. आपल्याकडे लेटर पण आहे. सर्व्हे नं. २०९ मध्ये किती उपलब्ध जागा कलेक्टर लॅन्ड आहेत त्याशिवाय सॉल्ट डिपार्टमेंटची आपल्याला कशी परमिशन मिळणार? तुम्ही असे कसे करता? गरज काय आहे ते तुम्ही मला सांगा. जावू दे ना. तिकडे एका साईडला ८० एकर जागा पडली आहे. आपल्या चौपाटीपासून ते घोडबंदर पर्यत तिथे आपला प्रायमिंग रिपोर्टर आहे ना. त्याच्यामध्ये रिझर्व्ह जागा आहे ना. या मालकी जागेमध्ये लोकांच्या आगराचे त्यांचे पोटाचे रोजंदारी गर्व्हमेंटने काढायला घेतलेली आहे. त्यांच्यासाठी आंदोलन चालू आहे आणि आणखीन तुम्ही त्याच्यामध्ये अंगार टाकून जळवायची बाजू त्यांना करता. हे चुकीचे आहे. लोकांना काय राहिल? तुम्ही मिटिंगमध्ये आहात. मा. आयुक्त साहेबांनासुद्धा ही गोष्ट माहित आहे.

**अशोक पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, अगोदर हा विषय आणताना तुम्ही मंजुर करता.

**परशुराम पाटील :-**

आता काय करता? लोक काय म्हणतील? हा विषय तुम्ही अजेंडावर आणलेला आहे. हा विषय तुम्ही रद्द करा. नाही केला तर आम्ही तुमच्या महानगरपालिकेसमोर उपोषण करू, आंदोलन करू.

**मोहन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये असे अनेक विकास कामे व्हावी अशी सर्व सदनाची इच्छा आहे आणि विकास झाला पाहिजे या मताशी सर्व सभागृह आहे. परंतु, आज या ठिकाणी ज्या पद्धतीने शिघ्र गतीने प्रश्न समोर आलेला आहे आणि संपूर्णपणे प्रशासनाची या विषयावर कोणतीही तयारी नाही. ॲक्च्यूअल स्टेडियमच्या जागेमध्ये हे आरक्षण आहे. मघाशी ज्याप्रमाणे विरोधी पक्ष नेता बोलले की, स्मशानभुमी पासून ह्या स्टेडियम पर्यंत सेम आरक्षण आहे आणि या सेम आरक्षणमध्ये किती जागा मिळते. ती

जागा पहिली बघायला पाहिजे. नाहीतर आपण हा जो ठराव केलेला आहे की, स्टेडियम बनवायचा आणि दूसरा ठराव आपण करतो सिल्व्हर पार्क बनवायचा. त्याच्यासाठी सुद्धा जागा पाहिजे म्हणून मला ह्या ठिकाणी असे बोलायचे आहे की, तीव्र भुमिका काही ठिकाणी ह्या सदस्यांनी मांडली. विषय चांगला आहे. विषय झाला पाहिजे. या सन्मा. सदस्यांचे सगळ्यांचे मत आहे. परंतु, प्रशासनाने पूर्णपणे जागेचे सर्व्हे करा. त्याचा पाठपुरावा करून घ्या आणि संपूर्णपणे ते प्रकरण पुन्हा मा. महासभेपूढे आणावे आणि पुढच्या वेळेला हा विषय घ्यावा.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आतापर्यंत सर्व्हे नं. दिलेले आहेत की, नाही. त्याच्यामध्ये ७५७ नं. जो आहे. त्याच्यामध्ये जवळ जवळ १६ एकर जमीन आगराची आहे. ७५७ सर्व्हे नं. जो आहे तो पेलणी आगार म्हणून आहे, शिलोत्र्यांचा आहे आणि त्या शिलोत्र्यांचे पेलणी आगार आहे. मध्येपण आम्ही विरोध केला होता. सॉल्ट डिपार्टमेंन्टला देते वेळी आम्ही त्याचा विरोध केल होता. त्याच्यानंतर तुम्ही दुसरा सुद्धा नंबर दिलेला आहे. बुबु आगार ७५८ सर्व्हे नं. चा हा बुबु आगार शिलोत्र्यांचा आहे. तो २५ हेक्टर २२ गुंठयाचा आहे आणि ७५९ हा जो कांदुर्ली आगार आहे तो ८ हेक्टर २४ गुंठ्याचा आहे. आपण सर्व आज स्टेडियमसाठी राखुन ठेवलेले आहे आणि त्याच्यामध्ये सुद्धा तुम्ही आरक्षण लावता. म्हणजे कुठलेही तऱ्हेची पूर्ण माहिती न घेता, कुठलेही त्याच्यामध्ये अंदाज न घेता, वस्तुस्थितीची पाहणी न करता तुम्ही आज आरक्षणाचा प्रस्ताव पारित करता. तुम्ही त्या संदर्भामध्ये योग्य ती माहिती मिळवा. सर्व्हेअर ठेवलेले आहे. आपण सर्व्हेअरांना पगार देतो. कुठल्याही सरकारी लॅन्डची माहिती मिळत नाही, हे आपल्या लोकांच दुर्दैव आहे आणि कुठेतरी आपण लादतो आणि हा त्रास मग तुम्हाला भोगावा लागतो. या संदर्भात मला एवढेच म्हणायचे आहे की, आपण दिलेली जी काही प्रस्ताव नाही ना त्या दफनभुमीला किंवा स्मशानभुमीला आमचा विरोध नाही. पण वस्तुस्थितीला धरून करा. एवढे माझे म्हणणे आहे. नाहीतर शिलोत्री लोक या संदर्भामध्ये आम्ही निषेध व्यक्त करू आणि शिलोत्र्यांवर अन्याय झाला तर आम्ही सहन करणार नाही. ह्याच्याजवळ ३०% लोक शिलोत्री आगरी समाज मिठावर जगणारे आहे. ह्याच्यात ख्रिश्चन पण आहे, गुजराथी पण आहेत, आगरी आहेत. ह्याच्यामध्ये सर्व इनक्ल्यूड आहेत आणि आपण हा आतताईपणे आणलेला निर्णय आहे. हा निर्णय चूकीचा आहे याचा आम्ही निषेध व्यक्त करतो.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम, नगरसेवक अनंत पाटील यांनी जे याच्यावर निवेदन केलेले आहे. तर त्याच्यावर आपण आम्हाला खुलासा द्या. कारण, ही गंभीर गोष्ट आहे. कारण शिलोत्र्याचा प्रश्न आहे. आता सेंट्रल गर्व्हमेंन्ट मध्ये मोठमोठ्या लोकांकडे जावून आले. त्यांचा प्रश्न सुटलेला नाही. तरी ही बाब त्याच्यातल्या आपण सभागृहात सांगाल अशी आपणांस विनंती आहे.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ये जो शिलोत्री का प्रश्न है। शिलोत्री जनम से यहाँपे नमक बिकाते है। उनके छोटे छोटे पार्टस मे नमक के आगार है। नमक के आगार का पहले से ही वाद है की, वो अगर सेंट्रल गर्व्हरमेन्ट का या खुद का है। उसी मुसीबत मे पडे है। अभी आजाद मैदान मे कल उनका मोर्चा गया था सेंट्रल गर्व्हमेंट कुछना कुछ करके आगार बंद करवाना चाहती है। सेंट्रल गर्व्हमेंट बंद करने के बाद भी अगर जमिन आपको मिलेगी ये भी नक्की नही है। तो आप यहाँके स्थानिक निवासी जो आगरी समाज है। उनका आप रोजी रोटी बंद करके और ये दफन भुमी, स्मशान भुमी आप बनानेका जो प्रस्ताव लाये वो प्रस्ताव गलत है। भारतीय जनता पार्टी इसका विरोध करती है। दफन भुमी और स्मशानभुमी होना चाहिए। देखीए आप दुसरे रिझर्वेशन देखो और वहाँ पे वो प्रस्ताव लाओ।

**मा. महापौर :-**

दोनच मिनिट बोला.

**अशोक ब. पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, आपण हा जो आरक्षणाचा विषय क्र. २१ आणलेला आहे. त्याबद्दल मी आपल्याला थोडेसे सुचित करू इच्छितो की, जे मुस्लीम कब्रस्थान, स्मशानभूमी, बरेल ग्राउन्ड आणि बगीचा हे आरक्षण आपण या जागेवर करण्यासाठी हा प्रस्ताव इथे आणलेला आहे. तर त्या बद्दल मला थोडेसे तुम्हाला सांगावेसे वाटते की, मुस्लिम कब्रस्थान, जे बोहरी लोकांचे कब्रस्थान आहे. हा प्रश्न इकडे ज्वलंत आहे आणि बोहरी लोकांना या महानगरपालिकेकडील वारंवार पाठपुरावा केलेला आहे. त्याठिकाणी कब्रस्थान आहे. त्याठिकाणी त्यांना एक्सटेंन्शन हवे. हा एक्सटेंन्शनचा विषय कित्येक वर्ष या नगरपालिकेमध्ये, महानगरपालिका झाली तरी देखील प्रलंबीत आहे आणि बऱ्याचवेळा या जागेवरती वाद झालेला आहे. मी स्वतःदेखील त्या जागेवर गेलेलो आहे आणि आपण एक्स्टेंन्शन न देता हा इतर ठिकाणच्या जागांच्या आरक्षणाचा विषय उपस्थित केलेला आहे, हा चुकीचा आहे. त्यांचे आरक्षण त्या ठिकाणी त्याचे कब्रस्तान जे आहे त्याच्या बाजूला ऑलरेडी खाजन जमिनी उपलब्ध आहे. त्या खाजन जमिनीमध्ये त्यांचे पजेशन देखील आहे आणि त्या लोकांचे असे म्हणणे आहे की, आमचे जे पजेशन आहे. त्या खाजन जमिनीमध्ये इथे आम्हाला जमिनीचे आरक्षण वाढवून द्यायचे हा पस्ताव नगरपालिकेपासून पाठपुरावा करत

आहे. त्यांना आपण न्याय देवू शकलो नाही आणि इतर ठिकाणी जिथे तांत्रिकदृष्टया अवघड आहे आणि ते होवू शकणार नाही. अशा ठिकाणी आपण त्यांना कब्रस्तानाचे रिर्झवेशन देवून त्यांना आणखीन वादात टाकत आहोत. तर माझे तुम्हाला प्रशासनाला असे म्हणणे आहे की, जी त्यांची रास्त मागणी आहे की, ज्या ठिकाणी त्यांचे ओरिजनल कब्रस्तान आहे. त्याठिकाणी त्यांना जागा उपलब्ध आहेत. त्या उपलब्ध जागेमध्ये त्यांना वाढीव कब्रस्तानाचा प्रस्ताव मा. महापौर मॅडम तुम्ही पुढच्या सभेमध्ये आणा आणि त्या वाढीव कब्रस्तानची जागा जी रिकामी आहे, सरकारी खाजन आहे, त्याच्यामध्ये त्यांना वाढवून देण्यात यावे आणि दुसरा प्रश्न असा आहे की, स्मशान भुमीची जागा आहे त्या जागेत तुम्ही स्मशानभुमी टाकू इच्छिता. त्याच्या अगदी हद्दीच्या अंतरावरती भाईंदर स्मशानभुमी उपलब्ध आहे. मग दुसरी स्मशानभुमी बाजूला एवढ्या अंतरावरती का? आवश्यकता का? आणि तुम्ही तो बगिचा सांगता, बाकीचे आरक्षण ६० फुट रोडच्या बाजुला आरक्षण क्र. ९० तिकडे उपलब्ध आहे. ते आपण विकसीत करू शकत नाही. ते विकसीत न करणे दुसरे बगिच्याचे आरक्षण करणे आवश्यक आहे काय? एवढे सगळे उपलब्ध असताना. एवढे सगळे अडचणीत असताना आपण त्या अडचणीच्या जागेमध्ये शिलोत्र्यावर अन्याय करतो. त्या सॉल्ट डिपार्टमेन्टशी पंगा घेतो. एकतर तुमच्या स्टेडियमची जागा आपण ४५ एकरमध्ये ठेवले आरक्षित केलेले आहे ती जागा बाधीत आहे. त्याचे तुम्ही पजेशन अनधिकृत घेतलेले आहे. त्याचा अनधिकृत कब्जा आपण घेतलेला आहे. शिलोत्र्यांना आपण न्याय दिला नाही आणि सॉल्ट डिपार्टमेंटला पत्र लिहून दिले आणि असे असताना देखील हा दुसरा वाद कशाला उत्पन्न करता? मा. महापौर मॅडम, तुम्हांला आणि प्रशासनाला कळकळीची विनंती आहे की, जे होणार नाही ते आरक्षण कृपया तुम्ही आणू नका आणि जे आवश्यक आहे. त्या बोहरी कब्रस्तानासाठी जी जागा त्यांना उपलब्ध आहे. त्या जागेत त्यांचा प्रस्ताव तिकडे मंजूर करून द्या. एवढी मा. सभागृहाला माझी विनंती आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आता आपल्यासमोर प्रकरण क. २१ हा मा. सभागृहासमोर आलेला आहे. त्या प्रकरणाशी माझा काही संबंध नाही. परंतु, मी सर्व्हे नं. मौजे खारी या ठिकाणी सर्व्हे नं. २०९ आहे. त्याठिकाणी कब्रस्तानासाठी रिझर्वेशन प्लॉट आहे आणि मी महानगरपालिकेमध्ये ०३/०२/२००३ पासून पत्रव्यवहार केलेला आहे. ३ एकर त्याठिकाणी प्लॉट आहे. मला महानगरपालिकेकडून संपूर्ण पत्र व्यवहार झालेला आहे. महानगरपालिकेने ती जागा सरकारी असल्यामुळे, मिरा भाईंदर महानगरपालिका ०१/१२/२००३ रोजी कलेक्टरने पत्र व्यवहार केलेला आहे. ती जागा महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यासाठी त्या जागेचा सर्व्हे केल्याने २ लाख ९२ हजार रू. देखील भरलेले आहे. तर हा सगळा पत्रव्यवहार इथे झालेला असताना आपले हे कब्रस्तानाच रिझर्वेशन प्लॉट आहे. ते रिझर्वेशन प्लॉटवरती अजुन पर्यंत हा विषय आपण याठिकाणी यापटलावरती आणला नाही. इथे सर्व पत्रव्यवहार झालेला आहे. मला लेटर दिलेले आहे. कलेक्टरकडे सुद्धा लेटर दिलेले आहे. यासाठी माजी कमिशनर शिंदे साहेब यांनी एम. एच. मोरे साहेब यांना निवृत्त केले होते. मला वाटते जेवढी सरकारी जागा आपल्याला हस्तांतरीत करून घेण्यासाठी मला वाटते. त्यांना एक वर्षाची मुदत दिली होती. त्या एका वर्षाच्या मुदतीमध्ये मोरे साहेबांकडून ती संपूर्ण जमिन आपल्याला हस्तांतरित झाली नाही. चौपाटी, कब्रस्तान भरपूर ठिकाणी या जागा दल्या होत्या. त्याच्यानंतर ह्या जागा ताब्यात घेण्यासाठी पुन्हा सहा महिन्याची मुदत दिली. सहा महिन्याची मुदत देवून सुद्धा अजुन आपल्या महानगरपालिकेच्या ताब्यात आली किंवा नाही. हे आम्हाला माहित नाही. परंतु, ती जागा सूद्धा ताब्यात आली नाही. प्रकरण क्र. २१ ह्याठिकाणी आपल्याकडे आलेले आहे. परंतु, महानगरपालिकेच्या ताब्यामध्ये असलेली जागा ती अजुन आपण कवर करू शकत नाही. मा. महापौर मॅडम, मी आपल्याला विनंती करतो की, कमीत कमी हे जे दिलेले आहेत. आम्हाला महानगरपालिकेकडून पत्र व्यवहार झालेला आहे ही जागा आपल्या कब्रस्तानचे रिझर्वेशन प्लॉट त्या ठिकाणी आहेत. हा दुसरा वाद निर्माण करतील. आपल्याकडे ह्या जागा आहेत. ते आपण ताब्यात घेवू आणि तो विषय विषयपटलावर घेवून या. आज बोहरी समाजाने त्याठिकाणी लेटर दिलेले आहे. २ वर्ष झालेले आहे आज आपण मागणी करतो मा. महापौर मॅडम, ह्या विषयावरती पूर्वीच्या प्रकरणावरती हा सुद्धा विषय घ्यावा आणि ही कब्रस्तानची जागा आपल्याला हस्तांतरीत करून घ्यावी आणि त्याठिकाणी त्यांना मंजुर करून द्यावी ही सभागृहाच्या वतीने आपल्याला विनंती करतो.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो साहेब हा बांधकाम मध्ये विषय आहे. हा विषय इथे नाही. तरीपण बांधकाममध्ये विषय येतात आणि मला पत्र व्यवहार आलेला आहे. त्या पत्राचा मी आपल्याकडे जरा खुलासा करतो की, आपल्या महानगरपालिकेमध्ये काशिमिरा येथे म्हणजे आपल्याला तर माहिती असणारच आणि आपण तिथे गेला आहात. हे पत्र माझ्यापर्यंत आलेले आहे. पुजा पार्क आणि विनायक नगर आपल्याला माहित असणारच. मॅडम मला वाटते वॉर्डामध्ये आहे. रस्ता त्यांना रस्ता नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य विषयाला धरून बोला. विषय कुठला आहे तोच बोला.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही असे म्हणता काय? विषयाला अस धरून बोला हा विषय ह्याच्यामध्ये नसल्याने हा बांधकाममध्ये येतो की नाही ते तुम्ही मला सांगा.

**मा. महापौर :-**

आता सध्या या विषयाची आपण चर्चा करतो. त्याच विषयावर तुम्ही बोला.

**परशुराम पाटील :-**

आपण पहिला नागरिक मा. महापौर मॅडम आहात साहेब, असे काही तुम्ही म्हणू नका.

**मा. महापौर :-**

आपण बसून घ्या. त्याच्या व्यतिरिक्त विषय असेल तर आपण चर्चा करण्यात वेळ घालवू नका. आपण बसून घ्या. आता विषय नाही. पुजा पार्क आणि जो म्हणता तो असा सध्या आपण जो विषय......

**परशुराम पाटील :-**

मग त्यांना रस्ता नको, पाणी नको. तुम्ही तुमच्या............

**मा. महापौर :-**

तुम्हाला या गोष्टी माहिती नाही.

**परशुराम पाटील :-**

मला संपूर्ण माहिती आहे माझ्याकडे...........

**मा. महापौर :-**

नगरसेवक आसिफ पटेल साहेब, तुम्ही त्यांना उत्तर द्या. काय केलेले आहे? त्यांचा तो प्रत्यक्ष वॉर्ड आहे. तुम्हाला या सभागृहात........

**आसिफ पटेल :-**

तुम्ही ऐकून घ्या. आम्ही फरक करतो ते आम्हाला माहित आहे.

**मा. महापौर :-**

तिथे आम्ही जावून काय केले. त्यांचा प्रश्न काय सोडवला ते आम्ही खुलासा करतील.

**परशुराम पाटील :-**

त्यांचा वॉर्ड आहे, तुमचा वॉर्ड आहे. आम्हाला त्याच्याशी काही घेणे नाही. तुम्हाला लोक प्रतिनिधी आम्हाला......

**मा. महापौर :-**

आपण ऐकून घ्या. त्या विषयावर भरपुर चर्चा झालेली आहे.

**आसिफ पटेल :-**

विरोधी पक्ष नेता साहेब, ऐका जरा. तुमचे उत्तर एक मिनिटात देतो. तुम्ही जर ऐका. तिथे काहीही करायला आपण गेलो तर कंटेप्ट ऑफ कोर्ट होईल कंटेप्ट ऑफ कोर्ट करण्याची तयारी असेल तुमची तर तुम्ही येतो. कंटेप्ट होईल तिथे मग बोला ह्या विषयावर.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण त्या माणसाला .........

**मा. महापौर :-**

आपण बसून घ्या. आपण त्या विषयावर बोलूच नका.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ह्यांना हा विषय करून द्याना नंतर तो विषय पुर्ण करा.......

**मा. महापौर :-**

इथे हा विषय नाही तर ह्या विषयाला सुरूवात कशाला करायची.

**मोहन पाटील :-**

आता हा विषय पुर्ण करून घ्या.

**परशुराम पाटील :-**

एकतर ह्याच्यामध्ये अर्थ आहे का आम्हाला बोलायला देत नाही.

**मा. महापौर :-**

चार वेळा त्याठिकाणी मोर्चे आणलेले आहे. तिथे आंदोलन झालेले आहे. तिथे मा. आयुक्त साहेब, सर्व नगरसेवक तिथले वॉर्डमध्ये स्वतः मा. महापौर आम्ही जातीने हजर होतो आणि तिथला प्रश्न सोडवण्यासाठी त्यांना वाट करून दिली आम्ही दुसऱ्या बाजूने आणि आपण जे उपस्थित करता त्यांना जाण्या-येण्यासाठी रहदारीसाठी रस्ता उपलब्ध करून दिलेला आहे.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर साहेब, तिथून पण रस्ता बंद केला. ज्यानी रस्ता बंद केला त्याला एफ.एस.आय. एकूण दिले. सगळे त्याला दिले..........

**मा. महापौर :-**

तुम्हाला ह्या गोष्टी फार उशिरा माहिती पडल्या या छोट्या छोट्या गोष्टी.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आमच्याकडे येत जा......

**मिलन पाटील :-**

साहेब, विषय क्र. २१ चाललेला आहे.

**परशुराम पाटील :-**

लोकांचे प्रश्न सोडवले नाही म्हणून आमच्याकडे येतात. तुम्ही आम्हाला काय शिकवता.

**मा. महापौर :-**

प्रश्न सोडवलेले पण आहे.  रस्ता दिलेला पण आहे.

**परशुराम पाटील :-**

काही नाही. फक्त खुर्चीमध्ये बसा.

**मा. महापौर :-**

तुम्हाला जेवढे विषयावर बोलायचे आहे तेवढेच तुम्ही बोला. याच्या व्यतिरिक्त बोलू नका.

**परशुराम पाटील :-**

मला माहित आहे. मी इथे चौथ्यांदा आहे. समझले ना. आम्हाला सभागृहाची सगळी माहिती आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य म्हणून तुम्हाला बोलण्याचा काहीही अधिकार आहे का?

**जयाबाई भोईर :-**

वॉर्ड आमचा आहे ना तुम्हाला कशाला एवढी कळकळ लागली?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, विषय आरक्षणाच्या बाबतीमध्ये चाललेला होता.

**जयाबाई भोईर :-**

आम्ही भांडत नाही. तुमच्यासमोर आम्ही बसतो ना ४ वेळा आम्ही तिथे गेलो. मा. आयुक्त साहेब, तिथे गेले. मा. महापौर मॅडम गेल्या पोलिस स्टेशन पर्यंत आम्ही सर्व केलेले आहे.

**याकूब कूरेशी :-**

मा. महापौर मॅडम, ४ वर्षे विरोधी पक्ष नेता आहे. एका पदावरती आहे. त्यावरच त्यांनी काय केले?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, सन्मा. विरोधी पक्षनेता साहेब यांच्या भावना आहेत.  आपण त्या विषयावरती चर्चा घडवून घ्यावी. मॅडम, विषय आरक्षणाचा चाललेला होता. आपण सन्मा. सदस्यांना थोडीशी सुट देता आणि मग विषय कुठल्या कुठे निघून जातो. त्याच्यातला हा भाग झाला. आपण थोडासा कटाक्ष बाळगा की, विषय ज्या पद्धतीने मा. महासभेमध्ये चाललेला आहे, त्या विषयावरती बोलले तर अती उत्तम आहे.

**मा. महापौर :-**

विरोधी पक्ष नेता साहेब, आपल्या माहितीसाठी सांगते कालच तिथे भराव करण्याची ऑर्डर दिलेली आहे. रस्ता ओव्हर वाटेला जाण्या-येण्याची रस्त्याची सोय करून देऊ.  मा. आयुक्त साहेब आपल्याला त्याच्या विषयी थोडीशी माहिती देतील.

**परशुराम पाटील :-**

सांगायची ना आम्हाला आम्ही भराव केला म्हणून.

**मा. महापौर :-**

तुम्हाला तेच सांगते ना. ऐकण्याची तयारी ठेवायला पाहिजे.  जसे आम्ही ऐकतो तुम्ही तसे मा. महापौरांचे ऐकण्याची तयारी ठेवा.

**आसिफ पटेल :-**

विरोधी पक्ष नेता साहेब, विषय कुठला चालला विषयाला अनुसरून बोला.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. आयुक्त महाशयांना खुलासा करायला सांगा.

**आसिफ पटेल :-**

विरोधी पक्ष नेता साहेब, आम्हालाही बोलता येते.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा पत्रव्यवहार मला आज आला म्हणून मला माहिती झाली नाहीतर मला माहित असते तर तुमच्याशी संपर्क केला नसता का? मला आज पत्र आलेले आहे. म्हणून मला त्याच्यावर सांगायचे उचित आहे. नाहीतर मला बोलायचा काही अधिकार नाही.

**आसिफ पटेल :-**

विरोधी पक्ष नेता साहेबांनी ऐकावे मी काय बोलतो आपण उठलेले आहे. त्या खुर्चीवरून.......

**आसिफ शेख :-**

त्यांनी एका महिला मा. महापौर मॅडमचा अपमान केलेला आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

विरोधी पक्ष नेता साहेबांनी भावनेच्या भरामध्ये जे काही शब्द बोलले असतील. तर ते कामकाजातुन काढून टाका आणि कृपया जर काही तसे शब्द आले असतील त्या वाच्यता मध्ये.....

**परशुराम पाटील :-**

साहेब मी बोललो काय? मी काहीच बोललो नाही. मी काय बोललो. साहेब, तुमची समाजाची कामे करता बाकी लोक.

**हेलन गोविंद :-**

साहेब, तुम्ही बोलले तरी खोटे बोलता.

**आसिफ शेख :-**

असे नाही. आपण असे बोललात. आपल्याला भान नाही. भानाच्या भरात काहीतरी बोललात. आपण असे कसे म्हणता की मला माहित नाही.

**परशुराम पाटील :-**

मला माहित आहे मी चवताळून सभागृहामध्ये होतो. कसे काय बोलायचे. ते मला माहित आहे. मला खुर्चीला कसा मान ठेवावा हे मला सगळे समजते. मी मा. महापौर साहेब यांना म्हटलेच नाही.

**जयाबाई भोईर :-**

दखल कशाला घेता. तुम्हाला एवढी कळकळ कसली लागली?

**हेलन गोविंद :-**

शब्द जरा मागे घ्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आम्ही आहे ना. त्यांना आम्ही बघून घेतो.

**जयाबाई भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, आम्हाला मा. महापौर मॅडम यांनी जिथे चार वेळा नेले होते.

**परशुराम पाटील :-**

सगळे शब्द मागे घेतले.

**याकूब कुरेशी :-**

बरोबर आहे. शब्द मागेच घ्यावे लागतील.

**मोहन पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सदनामध्ये अनेक वेळा संसदीय कामकाज करत असताना बरेचसे प्रश्न निर्माण होतात. त्यावेळी शब्दाचा वापर जे होत असतात. ते कोणत्या विषयावर व्हायला पाहिजे. कोणत्या विषयावर व्हायला नाही पाहिजे. इथे असा अनेकदा प्रश्न याठिकाणी निर्माण होतो आणि मी सदनाला विनंती करतो. नम्र विनंती करतो की, सर्व सदनामध्ये दोन-दोन, तीन-तीन वेळा निवडून आलेले सदस्य आहेत. परंतु, सन्मा. महापौर या पहिल्यांदा आपल्या सदनामध्ये निवडून आलेल्या आहेत आणि महिला महापौर आहेत तरी सदनाच्या सर्व सदस्यांना विनंती करतो की, सभेचे कामकाज करत असताना आपल्याला अतिशय अनुभव आहे. आपण अनुभवाने बोलतो अनुभवाने कामकाज करतो. परंतु, एखादी नव्याने महिला महापौर याठिकाणी असेल स्थापन झाले असतील तर आपण त्यांना सांभाळण्याचा प्रयत्न ह्याच्यापुढे केलेला आहे आणि ह्याचे पुर्वी करायचे अपेक्षा व्यक्त करतो आणि पुन्हा असे शब्द सभागृहामध्ये होवू नये याची खबरदारी आपण घेतली पाहिजे. त्या पद्धतीने मी विनंती करतो कारण, मा. महापौर नविनच आहेत. आता मघाशी ३७ खाली जो प्रश्न उपस्थित झाला होता. ह्याच्यामध्ये अतिशय महत्वाचा प्रश्न असा आहे की, बोहरी समाजाला ज्या पद्धतीने दफन करण्यासाठी त्यांना वेळोवेळी अडचण निर्माण होते. त्यांचे डेलिकेशन घेवून मी कमिशनर साहेबांकडे आलो होतो आणि त्यांना मिरारोड येथे काही वेळ त्यांना त्याठिकाणी विधी करण्यासाठी त्यांना नाकारण्यात आले. केअरटेकरच्याव्दारे त्याच्यामुळे ते पुन्हा इथे आले आणि ते आल्यानंतर बोहरी समाजाला कुठेच न्याय मिळत नाही. अशा पद्धतीने भुमिका निर्माण झाली मग त्या अनुषंगाने हा विषय आपल्या मा. सभागृहामध्ये आला. याठिकाणी पूर्वीचे रिझर्वेशन भाईंदर वेस्टला आहे. या ठिकाणी सी.आर.झेड.वर आणि अन्य जी जागा आरक्षणाची आहे. त्या जागेमध्ये शासनाने एका संस्थेत देवू केले. हा प्रश्न इकडे निर्माण झालेला आहे आणि नव्याने कुठेतरी एक ३७(१) खाली या सभागृहापुढे हा प्रश्न आला की, अशा पद्धतीने त्यांना ही गार्डन, स्मशानभुमी, बोहरी समाजाला दफनभुमी द्यावी. त्याकरिता हा प्रश्न याठिकाणी आणलेला आहे. सदनाच्या सर्व सदस्यांनी याठिकाणी चांगल्या भुमिका मांडल्या. त्यांनी सांगितले की, ज्या जागेत सर्व्हे झालेला नाही. बाजुला स्टेडियम आहे. सन्मा. सदस्य अशोक पाटील साहेब यांनी सांगितले की, ह्याच्या बाजुला गार्डन आहे, स्मशानभुमी आहे. परंतु, या जागेचा मॅप आराखडा आपल्या समोर आलेला नाही. ह्याच्यापुढे हा मॅप आराखडा आणि आपण सर्व्हे करावा. पुढे त्याचा नकाशा घेवून यावा आणि तो विषय नंतर याठिकाणी आणावा. याठिकाणी दुसरा प्रश्न असा की, शिलोत्र्यांचाही प्रश्न सुरू आहे. यामध्ये काल-परवा, त्यांना स्टे मिळालेला आहे. तर स्टे मिळाल्या कारणाने विकू शकतात. संपुर्ण रोजी त्याच्यावर अवलंबून आहे. यासाठी त्यांना ही त्रास देता कामा नये. स्टेडियमच्या बाहेर जाता कामा नाही. आणि जर कुठे जागा उपलब्ध असेल तर एखादा

समाज वंचीत झाला असेल तर त्या समाजाला न्याय देणे सुद्धा या सदनाच्या सभागृहांची सर्वांची जबाबदारी आहे, नैतिकता आहे आणि ही नैतिकता प्रत्येक वेळेला आपल्या सन्मा. सदस्यांनी घेतलेली आहे आणि त्या वेळी त्या त्या कामाला त्यांनी प्रोत्साहन दिलेले आहे आणि ते काम झालेले आहे. म्हणून मी सदनाला प्रशासनाला विनंती करतो की, आपण सर्वपरी त्याचा सर्व्हे करावा आणि ज्या ज्या ठिकाणी दफनभुमीची जागा असेल ती करुन घ्यावी आणि शिलोत्र्यांना कुठे त्रास होत नसेल तर ती जागा देण्यात काही हरकत नाही. म्हणून या सर्व गोष्टींच्या घटनांच्या ह्या सर्व सदस्यांनी भुमिका मांडलेल्या आहेत. त्याचा सर्व अभ्यास करून त्या परिने नविन विषय आपण पुढच्या सभेत घ्यावा, अशी मी याठिकाणी विनंती करतो.

**अशोक पाटील :-**

मा. महापौर साहेबा, सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी वक्तव्य केलेले आहे. त्याचा जरा खुलासा करतो की, त्यांनी जे मघाशी सांगितले की, बोहरी समाजाच्या कब्रस्तानासाठी त्यांनी जी वाढीव जागेची मागणी केलेली आहे. ती सी.आर.झेड. बाधित आहेत. सी.आर.झेड. बाधित प्रस्तावित असेल आणि आपण रिझर्व्हेशन करतो. ती देखील जागा सी.आर.झेड. बाधित जागेत आहे.

**मोहन पाटील :-**

आगरीपेक्षा बी मध्ये आपल्याला सी.आर.झेड. बाधित जागा असेल तर आगरी क्षेत्राकडून आपण प्रयोग घेवू शकतो आणि दुसरा प्रश्न मी असा सांगितला की, त्या ठिकाणी सध्या दफन भुमी जागा आहेत. त्याठिकाणी एक जागा शिक्षण संस्थेला देवून टाकलेली आहे. प्रशिक्षण संस्थेला........

**अशोक पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मला त्याबद्दल म्हणायचे आहे. जी जागा शिक्षण संस्थेला देण्यात आलेली आहे.

**रतन पाटील :-**

कुठल्या संस्थेला ते तरी सांगा ना बोला तुम्ही बोलता.

**मोहन पाटील :-**

मला महापौरांनी परवानगी दिलेली आहे.

**रतन पाटील :-**

आपले भाषण संपले असेल तर बंद करा. मला आपण परवानगी दिलेली आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सर्व सदस्यांची भुमिका अशी आहे की एखाद्या जमातीला जागा उपलब्ध नसेल तर ती आपण देवू केली पाहिजे आणि त्या जमातीच्या जागेमध्ये काही अडचण निर्माण झाली असेल तर ती अडचण आपण सोडविली पाहिजे. आपल्याकडे दोन्ही बाबी आहेत आणि मिरारोडला दफनभुमी आहे. त्याठिकाणी बोहरी समाजाचे लोक गेल्यानंतर केअरटेकरनी त्यांना नाकारले. सन्मा. आमदार साहेबांना जेव्हा मा. आयुक्त साहेबांनी संपर्क केला तेव्हा त्यांनी असे सांगितले की, अशी कोणतीही अडचण नाही आणि ते त्या पद्धतीचे नाही. परंतु, केअरटेकर आल्यानंतर त्या लोकांनी इथे संपर्क साधला. त्यावेळी हा प्रश्न निर्माण झाला. आणखीन ही जागा आपल्या भाईंदर वेस्टला आहे. ती विकसीत करता येत नाही. तो सुद्धा प्रश्न आहे. जर आपण ३७ खाली जर भुमिका मांडली असेल तर त्याचे विपरीत परिणाम होत असतील तर ते आपण करू नये. या मताशी आम्ही सहमत आहोत. हा विषय सर्वांनी घेतलेला नाही. या सदनामध्ये सभागृहामध्ये सर्व प्रकारची मते राष्ट्रवादी आणि कॉंग्रेसचे याठिकाणी बहूमत आहे. जर विरोधी पक्ष सदस्य परशुराम पाटील यांनी विचार केला तर तसे होवू शकत नाही. म्हणून त्यांनी हा विचार करू नये की, आम्ही बोलल्याप्रमाणे कुठला विषय होत असेल तुम्ही बोलल्याने विषय येत नाही. त्याच्या भुमिकेची कल्पना आम्हाला पुर्णपणे आहे. आपण स्वतः इथे जास्त बोलत असाल ह्याचे जर तुम्हाला जास्त कळते. हा विषय होवू शकत नाही. सध्या शासनाचे बहूमत असताना आपल्याकडे बहूमत असणे ही आवश्यक आहे आणि आपले बहूमत नसेल तर हे आपला विषय जो आहे तो खरोखरच कामाचा विषय असेल तर शासनाने अपले विषय घेतले असेल. तो विषय कामाचा विषय असेल तर विकासाचा पुर्ण विषय आम्ही केलेला आहे आणि केलेले पण आहे. आजपर्यंन्त आपण कोणताही असा विषय घेतलेला नाही. परंतु, आज खरोखरच या प्रश्नाने ३७ च्या प्रश्नाने जर खरोखरच आमच्या शिलोत्री बांधवांना त्याच्यामध्ये आगरी जातीचा मी सुध्दा आहे. जर आम्हाला कुठे अन्याय होत असेल तर तो अन्याय होता कामा नये. याच पार्श्वभूमीवर विरोधी पक्ष नेते, सदनांनी आम्ही चर्चा केली आणि त्याच्यानंतर आम्ही निषेध केला. म्हणजे असे झाले की, आम्ही सदनामध्ये कोणी जास्त बोलतो. सदनामध्ये आम्ही बोललो. त्यांचा विषय कुठेतरी आल्यानंतर प्रोसिजरमध्ये आम्हाला वाहवा मिळते. हा चूकीचा विषय आहे. जर विरोधी पक्ष नेते मी उद्या हा विचार केला आणि सांगितलं की, तुमची भूमिका पहीली मांडा. आणि आम्ही देवू तेच होईल. म्हणून तर आम्ही अशी भूमिका मांडली नाही. आमची, भूमिका ही आहे की, आपुलक्या आम्ही घेवू. परंतु, काही उठल्यानंतर जसे मागच्या वेळेला मा. उपमहापौर साहेब, बोलले की, भारत माता की जय, आणि आम्ही वन्दे मातरम् बोलतो. हा विषय होवूच शकत नाही. संसदीय कामकाज करताना विचार केला पाहिजे. जास्त बोलणे म्हणजे आम्हाला काय म्हणायचे हा विषय नाही. सदनामध्ये तुम्हाला जो विषय कामाचा आहे. तो विषय बोला. आणि जेव्हा तुम्हाला मा. महापौर मॅडम, बोलायची परमिशन देतात. त्याचा गैरफायदा कृपया घेवू नका.

**अशोक ब. पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेबांनी आता, ज्या कब्रस्तानाचे दफनभूमीचे खुलाशे मांडले की, ती छोटी जागा सी.आर.झेड. बाधित आहे. मान्य आहे. ह्या दोन्ही जागा सी.आर.झेड. बाधित मान्य आहे. परंतु, ज्या शिक्षण मंडळासाठी ज्या शिक्षण संस्थेसाठी उल्लेख केला. ती शिक्षण संस्था निर्मला माखिजा मॅडमची आहे. त्या शिक्षण संस्थेला फक्त नगरपालिका असताना त्या वेळेचे तत्कालीन नगरराज्यमंत्री तटकरे आहेत. त्यांनी फक्त अलाउटमेन्ट लेटर दिल होत. आणि ते अलाउटमेन्ट लेटर दिल्यानंतर सभागृहासमोरच्या विषयाला सर्टिशन, मॉडीफिकेशन ठरावाचे मान्यता लागते. आणि ती अजूनपर्यन्त घेण्यात आलेली नाही. म्हणजे ते रिझर्व्हेशन अजूनपर्यंन्त कायम झालेले नाही. मुळात ते रिझर्व्हेशन नाहीच. त्याला मान्यता दिलेलीच नाही. आता तर महानगरपालिका झाली. आणि असाच विषय स्वर्गिय घंगाळे सरांचा होता. असा आणला होता. तटकरे साहेबांनी त्याला अलाउटमेन्ट लेटर दिलं होतं. तो सभागृहासमोर मान्यतेसाठी आला होता. त्याचे पडसाद सभागृहासमोर काय उघडकीस झाले हे सभागृहाला माहित आहे. म्हणून शिक्षणसंस्थेचा जो उल्लेख आहे. हा चुकीचा आहे. त्या शिक्षणसंस्थेला फक्त नगरपालिका अस्तित्वात असताना तत्कालीन नगरखात्याने राज्यमंत्र्याने अलाउटमेन्ट लेटर दिलं होत. सभागृहासमोर हा विषय आजही आलेला नाही आणि त्याला मान्यता मिळालेली नाही. म्हणून त्या बोहरी समाजाच्या कब्रस्तानाला त्या जागी सेक्शन द्यावे. अशी त्या समाजाची मागणी आहे आणि ती मागणी सभागृहासमोर आणावी. आम्ही त्याला मान्यता द्यायला तयार आहोत.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो बोहरी समाजाच्या कब्रस्तानाचे...........

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब, तुम्ही नंतर बोला.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, विषय क्र. २१ च्या अनुषंगाने बोलतोय की, या सदनामध्ये हाच विषय यापूर्वी एक वषार्पूर्वी आला होता. बोहरी समाजाच्या दफनभूमीच्या आरक्षणाचे जे रिझर्व्हेशन आहे. ते माझ्या वॉर्डमध्ये आहे. बोहरी समाजाची जी दफनभूमी आहे. त्याच्यामध्ये पध्दत काय आहे. त्याचा पहिला नीट विचार केलेला नाही. किंवा अन्य ठिकाणच्या दफनभूमी आपण जावून पाहिल्या पाहिजेत. कारण आपले हिंदू समाजामध्ये, कॅथलिक समाजामध्ये, मुस्लीम समाजामध्ये एक दफनभूमीची जी कबर असते. ती कुठल्यातरी खानदानाला कायम स्वरूपी दिलेली असते. तशी आपल्या बाजूच्या चर्चमध्ये आहे. परंतु, बोहरी समाजाच्या दफनभूमीमध्ये माणूस तिकडे दफन व्हायला गेला, त्याची अंतीम विधी क्रियाक्रम केली की, त्याच्यावर कायम स्वरूपी सिमेंट कॉक्रीटच्या कबरी बनवल्या जातात. म्हणजे एका फॅमिलीमध्ये १० माणसे मेली तर तशी १० माणसांसाठी १० जागा लागणार. आताच्या बोहरी समाजाची संख्या जी मिरा भाईंदरमध्ये झालेली आहे. त्याच्यामध्ये तरीपण ५ एकर जागा दिली तर येत्या भविष्यकाळात १० वर्षांमध्ये ती जागा पूर्ण होईल. परत एका दफनभूमीची मागणी होईल. पूर्वी असे नव्हते. पूर्वी त्याठिकाणी दफनभूमीमध्ये एकाच ठिकाणी जे काही खानदानाची लोक असतील तिकडे ते गाडले जायचे. आपल्या बाजूलाच चर्च आहे. बरेचसे आपल्या ख्रिस्ती धर्म बांधव, आपल्याकडे बसलेले आहेत. ती पध्दत आहे. मुसलमान बांधव सुध्दा आहे. पूर्वी बोहरी समाजाची मिरा भाईंदरला घरे किती होती? १-४, ३-४ घरे होती. आणि त्यांची ती दफनभूमी त्याच्यात पुरी पडायची. आज विषय असा आहे की, या सभागृहामध्ये अनेक ज्येष्ठ नगरसेवक जे ३-३, ४-४ वर्षापासून नगरसेवक आहेत. त्या ठिकाणी मिरा भाईंदरच्या महिलांकरिता फार अत्यंत सोयीचे व्हेजीटेबल मार्केटचे रिझर्व्हेशन आहे. हा विषय सभागृहात कोणीच आणलेला नाही. आज आपण दफनभूमीचे बघतो. पण एक रिझर्व्हेशन कॅन्सल करून दुसरं रिझर्व्हेशन आणायचे. सर्व आमच्या इकडच्या कर धारकाचा नागरिकांचा विरोध आहे. जवळ-जवळ ६० ते ७० सोसायटीने तुमच्याकडे हरकत नोंदवलेली आहे. या अगोदर हा विषय इथे आला होता. त्याठिकाणी तुम्हाला आता तिकडे एक्सपॉईन्डरसाठी जागा नाही. काही आतातरी लोकांमुळे तिकडे अतिक्रमण केले. आणि त्या दफनभूमीच्या बाहेर आता लोक डेड बॉडी तिकडे गाडायला लागलेले आहे. हा विषय एक ना एक दिवस तिकडे धार्मिक होईल आणि तिकडे कोणतरी प्रयत्न करणार आहे. कारण या ठिकाणी हा वाद बराच दोन-तीन वर्ष गाजला. बी. एम. सी. पासून पोलीस ऑफिसर म्हणजे तुमचे एस. सी. पासून सगळे अधिकारी येवून गेले. अनेक लोकांनी धार्मिक भावना प्रकट केलेल्या होत्या प्रशासनाकडे. त्यांना दफनभूमी देवू नये. या मताचा मी नाही. आज आपण आपला विकास आराखडा उघडून बघितला तर प्रत्येक पानावरती डिलीट अॅट टू आर झोन एवढी रिझर्व्हेशन क्लिअर करुन झाली. त्यावेळेला आपण सर्व सदस्य काय करत होतात. ह्या सभागृहात बसलेले सर्व सदस्य इन्क्युड मी म्हणजे माझ्या समक्ष सर्व प्रत्येकाच्या वॉर्डमधली महत्वाचे रिझर्व्हेशन डिलीट होवून तिकडे आर झोन झालेला आहे. हा निवाचा जर आपण परिणाम बघितला. तर त्यापुढे या शहराचा काय होईल याचा मोठा विचार करायला लागेल. मागे एकदा मिटींग झाली त्या मिटिंगमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले होते. सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, त्या मिटिंगला हजर होते. आर. डी. शिंदे साहेब होते, जत्रे साहेब होते आणि ध्रुवकिशोर पाटील साहेब, नयना म्हात्रे, रोहित सुवर्णा आम्ही सर्व नगरसेवक त्या मिटिंगला हजर होतो. त्यांनी स्वयंस्पष्ट आणि बारकुंड साहेब जे बसलेले आहेत, ते सुध्दा मिटिंगला हजर होते. त्यांनी सरळ सांगितले की, माझ्या ज्या जिल्हाधिकाऱ्याच्या जागा आहेत त्याची मागणी करण्याचा प्रस्ताव आमच्याकडे

पाठवा. मी तुम्हाला त्याच्यावरती तात्काळ मंजूरी देतो आणि आमच्या रिझर्व्हेशनच्या जागेत तुम्ही आमच्या जागेमध्ये रिझर्व्हेशन का टाकली नाही. हा प्रश्न जिल्हाधिकाऱ्यांचा होता. आपल्या शहरातील विकास आराखडा हा बहुतेक रिझर्व्हेशन ही खाजगी जागांमध्ये आहे. त्यामुळे कोर्ट मॅटर, कोर्ट कचेरी, पजेशन शेवटला राहता राहिले. पजेशन हे मिळण्याकरिता भरपूर वर्ष जाणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडे आता जे आपण आपले विकास आराखडा जे आहे. त्याच्यामध्ये जर एम्प्लीमेन्टेशन करत असेल त्याच्यावर कारवाई करायची असेल तर आपल्याला सर्व प्रथम जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज तरी केले पाहिजे आणि ते जे आमच्या वॉर्डमधून रिझर्व्हेशन आहे. व्हिजीटेबल मार्केटचे ते डेव्हलपमेन्ट करण्याकरिता गेल्या तीन चार वर्षापासून मी मागच्या टाईमला, २००० पासून नगरसेवक असल्यापासून मी बोंबलतो आहे. त्याच्यावरती रिझर्व्हेशननुसार काहीही कारवाई झालेली नाही. आणि त्याच रिझर्व्हेशनचा प्रश्न विधानसभेमध्ये गाजला आणि मग मुख्यमंत्र्यानी त्याच्यावरती रिझर्व्हेशनचा आश्वासन दिलेले आहे. आपल्या मा. आयुक्त साहेबांना खाजगी इमारतीकरिता रस्ता देण्याकरिता तिकडे तुम्हाला जागा मिळाली. परंतु, रिझर्व्हेशनची जागा होती. ती ताब्यात घेण्याकरिता मा. आयुक्त साहेबांना वेळ, उसंत कसलं आणि कायदासुध्दा आठवला नाही. हे लक्षात घ्या. आपल्या ह्याच रिझर्व्हेशनमध्ये विधानपरिषदेमुळे सन्मा. सदस्य शरद पाटील जनता दलाचे आमदारांनी हा विषय मांडला आणि ते वेशीला टांगले गेले आणि आपली बेआब्रु झालेली आहे आणि आता तत्कालीन आयुक्त यांची चौकशी चालू झालेली आहे. मी सांगतो त्याचे गांर्भिय लक्षात घ्या. ज्या रिझर्व्हेशनच्या जागा आहेत, आहे तशाच ठेवून त्या ताब्यात घेवून लवकरात लवकर अंमलात आणा अशी माझी सभागृहाला नम्र विनंती आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, या ठिकाणी प्रकरण क्र. २१ मंजूर विकास योजनेत मौजे भाईंदर सर्व्हे क्र. ७६२, ७५८ पैकी ७५९ व ७७८ पैकी या जागेत महाराष्ट्र महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कब्रस्तान, स्मशानभूमी, बरेल ग्राउन्ड व बगिचा आरक्षण प्रस्तावित करणेबाबत मा. महापौर मॅडम, गेल्या अनेक वर्षापासून या ठिकाणचे विशेषतः बोहरी समाजाची लोक त्यांना दफनभूमी कब्रस्तानची मागणी येवून सातत्याने पाठपुरावा करित आहे. तत्कालीन मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रभारी अधिकारी श्री. शिवमूर्ती नाईक साहेब, यांनी या संदर्भात सन्मा. प्रथम नगराध्यक्ष गिर्ल्बटजी मेंन्डोसा साहेब, त्याचप्रमाणे आम्ही सर्व जेवढे नगरसेवक आहेत. त्या संपूर्ण समाजाबरोबर मिटिंग घेतली होती. आणि या समाजाला आपल्याला दफनभूमी देणे अत्यंत आवश्यक आहे. आणि ती दिली पाहिजे अशी भावना त्यावेळी शिवमूर्ती नाईक साहेबांनी घेतली. त्यानंतर शिवमूर्ती नाईक साहेब गेले. नंतर आर. डी. शिंदे साहेब, आयुक्त म्हणून आले. आर. डी. शिंदे साहेबांनी देखील तेव्हा आपले ए.डी.टी.पी. जे होते, शिंदे साहेब, यांचे समन्वये सर्व्हे नं. ७२२ आणि सध्या अस्तित्वात त्याठिकाणी बोहरी समाजाची दफनभूमी आहे. त्याची पाहणी वगैरे केली. पाहणी केल्यानंतर ७२२ सर्व्हे नं. जो आहे. भाईंदर पश्चिमेला एस. टी. डेपोच्या लागुन त्याठिकाणी मॅग्रोज वाढलेले आहे. तर मॅग्रोजच्या ठिकाणी आपण कोणत्याही प्रकारची परवानगी देवू शकत नाही. असा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे. आणि त्यानुसार तो निर्णय पण ७२२ सर्व्हे नं. मध्ये दफनभूमी करण्याचा जो प्रकल्प होता त्याठिकाणी पण असा आपण विचार केलेला होता की, ज्याप्रमाणे मिरारोडमध्ये आपण स्मशानभूमी, बरेल ग्राउन्ड, जॉगिंग पार्क, बगिचा एक अद्यावत असे आपण तयार केलेले आहे. आणि आदर्श आपण मिरा भाईंदर महापालिकेने घालून दिलेले आहे मिरारोड परिसरात. त्याचप्रमाणे या संपूर्ण परिसरात भाईंदर पूर्वेला जशी मागणी केलेली आहे. सन्मा. सदस्य दिनेश नलावडे यांनी सर्व्हे नं. २०९ त्याठिकाणी. त्याठिकाणी त्याप्रमाणे भाईंदर पश्चिमेला देखील म्हणजे भाईंदर पश्चिम पासून ते उत्तन पर्यन्त असे प्रत्येक विभागात जर आपण आदर्श असा प्रकल्प राबवला तर सर्व समाजाला आपण न्याय दिल्यासारखे होईल. परंतु, आजदेखील शिवमूर्ती नाईक साहेब गेले, शिंदे साहेब गेले. आता विद्यमान आयुक्त सुदामराव गायकवाडजी साहेब आहेत, यांच्यासमोर सुध्दा गिल्बर्ट शेठ आणि सर्व संबंधित पदाधिकारी आणि समाजाच्या लोकात चर्चा झाली. त्यानंतर हा विषय या ठिकाणी आला. परंतु, अद्यापही या ठिकाणी त्यांना जागा कुठे मिळाली असे वाटत नाही. दरम्यानच्या काळात या ठिकाणी बोहरी समाजातील एका माणसाचे मयत झालेले होते. ते मयत घेवून ते मिरारोडला गेले. इकडे जागा नसल्यामुळे. तर मिरारोडमध्ये त्यांना ४ तास ते प्रेत खोळंबून ठेवावे लागले. तसेच ते राहिले. मग, नंतर सन्मा. आमदार साहेब, यांनी तिथे मध्यस्थीची भूमिका घेतली. आणि ते प्रेत त्या ठिकाणी दफन झाले. परंतु, वारंवार त्या बोहरी समाजाला त्रास होतो. तर त्यांना आपण जागा कुठे देणार आहेत? तर सन्मा. हॅरल बोर्जीस यांनी या ठिकाणी ठराव मांडलेला आहे की, आपण संपूर्ण चौकशी केली पाहिजे. आणि आपली अशी भूमिका आहे की, कोणत्याही समाजावर अन्याय झाला नाही पाहिजे. इकडचे स्थानिक आगरी समाजाची जी लोक आहेत. शिलोत्री बांधव आहेत. त्यांच्यावर पण अन्याय होता कामा नये. आणि इतर समाजावर पण अन्याय होता कामा नये. तर असा सुवर्ण मध्य आपण या ठिकाणी काढला पाहिजे. आणि सन्मा. आयुक्त साहेब, आपण या संपूर्ण भाईंदर वेस्ट परिसराचा विशेषतः पूर्वेला तर २०९ सर्व्हे नंबर आहे. तिथे आरक्षण दफनभूमीसाठी आहे. परंतु, भाईंदर पश्चिमेच्या परिसरात आपण एक अद्यावत मिरारोडच्या धरतीवर बरेल ग्राउन्ड, कब्रस्तान, दफनभूमी, बगीचा, जॉगिग पार्क असा अद्याप प्रकल्प आपल्याला उभारायचे आहे. त्या दृष्टीकोनातून आपण सर्व्हे केला पाहिजे आणि प्रत्येक समाजाला आपण न्याय दिला पाहिजे. तर हे शेवटी आपले आद्य कर्तव्यच आहे. प्रत्येक समाजाला जसे आपण रस्ते, पाणी, विज अशी सुविधा उपलब्ध

करून देणे हे आपलं आद्य कर्तव्य आहे. घटनात्मक आद्य कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या स्मशानभूमीची, दफनभूमीची व्यवस्था करून देणे आपल घटनात्मक अद्य कर्तव्य आहे. आणि ते आपल्याला पूर्ण केले पाहिजेच. तर त्यासाठी आपण सर्व्हे करून हा विषय सन्मा. सदस्य, हॅरल बोर्जीस आणि मोहन पाटील साहेबांनी सांगितल की, पुढच्या मा. महासभेत हा विषय निश्चितपणे घ्या. तोपर्यन्त आपण संपूर्ण माहिती घ्यावी आणि प्रत्येक समाजाला न्याय देवून एक अद्यावत मिरारोडच्या धर्तीवर आपण याठिकाणी भाईंदर पश्चिमेला आणि त्याचप्रमाणे भाईंदर पूर्वेला देखील याप्रमाणे प्रकल्प उभाराल अशी मी आपणास विनंती करतो आणि तत्पूर्वी त्या बोहरी समाजाच्या लोकांचे जे मयत होतात, निधन होतात. तर त्यांना आजही अडचण होत आहे. तर ते अडचण दूर करण्यासाठी मा. आयुक्त साहेब, आम्ही या संदर्भात पत्र व्यवहार केलेले होते. आम्हीही पाठपुरावा केलेला आहे आणि त्यांना आपण एक पत्र द्यायचे आहे. तर कृपया आपण त्यांना तसे पत्र द्यावे. जेणेकरून पर्यायी व्यवस्था होईपर्यन्त त्यांनी त्यांचे दफन विधी इथे मिरारोडमध्ये करण्यासाठी आपण लेखी परवानगी द्यावी. हे सुध्दा आपण आज या संदर्भात निर्णय घ्यावा. आणि आघाडी मा. महासभेत हा विषयाचा सारासार विचार करून आणि सर्व समाजाच्या भावना लक्षात घेवून आपण यावर योग्य तो निर्णय आगामी सभेत लवकरात लवकर घ्यावा. ही नम्रतेची विनंती. जय हिन्द, जय महाराष्ट्र. धन्यवाद.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र. २१, संपूर्ण सभागृहाने व्यक्त केलेल्या आपल्या भावना शिलोत्र्यांचा प्रश्न तसेच बोहरी समाजाला दफनभूमीसाठी आवश्यक असणारी जागा हा सर्व विचार करता संपूर्ण मिरा भाईंदर मधील जनतेला न्याय मिळाला पाहिजे. ह्या सर्व सभागृहाच्या भावना लक्षात घेवून प्रकरण क्र. २१ पूर्ण सविस्तरपणे प्रशासनाकडून माहिती घेवून हा विषय पुढील सभेत ठेवण्यात येईल. तो पर्यन्त हा विषय स्थगित करण्यात येत आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. २१ :-**

मंजुर विकास योजनेत मौजे भाईंदर सर्व्हे क्र. ७४७ या जागेत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कब्रस्तान स्मशानभुमी, बरेल ग्राऊन्ड व बगिचा आरक्षण प्रस्तावित करणेबाबत.

(मा. महापौर सो. यांच्या परवानगीने सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यात आले.)

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. २२ चे वाचन केले.)

(सन्मा. सभागृह नेता श्री. हॅरल बोर्जीस यांनी प्रकरण क्र. २२ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**परशुराम पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम याठिकाणी मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, कलम २० यु.एल.सी. ॲक्टच्या १९७६च्या नियमाप्रमाणे यु.एल.सी. ॲक्टच्या अंतर्गत शांतीनगर बिल्डरला डेव्हलप करण्यासाठी हॉउसिंग स्कीम फॉर विकर सेक्शन म्हणून आपण जी शांतीनगर स्कीम डेव्हलप केली त्या स्कीमच्या वेळोवेळी म्हणजे १९७६पासुन ग्रामपंचायत होती. नंतर ७८मध्ये त्यावेळी यशवंत भोईर साहेब, ग्रामपंचायतचे सरपंच होते. त्या गावाचे त्यावेळी पासून वेळोवेळी त्यांच्या बिल्डींगना, इमारतींना आपण कमेंसमेन्ट सर्टिफिकेट देताना काही अटी शर्ती घातलेले आहेत. प्रशासक ओ. बी. भगत साहेब असताना देखील १९८८मध्ये आपण त्यांना अटिशर्ती अनुसार ४ सुविधा त्यांनी आपल्याला बनवून द्यायचे होते ते आजपर्यन्त पूर्ण झालेले नाही. तर मी आपल्या निदर्शनास आणु इच्छितो की, १०० फुटी पैकी डी.पी. रोड हा शांती नगरच्या स्कीम मधूनच जाते. ते देखील त्या शांती स्टार बिल्डरने डेव्हलप करून आपल्याला द्यायचे. तसेच सार्वजनिक दवाखाना म्हणजे ओ.पी.डी.....

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब, याला आमचा आक्षेप आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मला दोन मिनिट बोलू द्या. नंतर त्यांनी आक्षेप घ्यावा. मी शांती नगरबद्दल बोलतो. मी मिरारोड बद्दल बोलतो.

**लिओ कोलासो :-**

विषय कुठे आहे? आम्हाला हरकत नाही. त्यांचे १० प्रस्ताव या सभागृहामध्ये मंजूरीला आले. तरीसुद्धा आम्ही त्यांच्याशी सहमत राहू. परंतु, या कामकाजामध्ये या विषयाचा संदर्भ कसा जुळतो.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आपण मला बोलायची परवानगी द्यावी. मला बोलू द्या. मग, त्यांनी आक्षेप घ्यावा.

**मा. महापौर :-**

विषयाला धरुन बोला.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मी विषयाला धरुन बोलतो. माझा एक ही शब्द विषयाच्या बाहेर नाही.

**मोहन पाटील :-**

मंजुरी करणार आपण तो विषय कसा होवू शकेल? मा. महापौर महोदया, आपण मंजुरी कशाला दिली? विषय होवूच देत नाही तर विषय कसा होईल. ज्या दवाखान्याला आपण मंजुरी दिली नाही. तरी दवाखान्यात यांचा संबंध काय आहे?

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, शांती स्टार बिल्डर ने आपल्याला प्रभाग कार्यालय मोफत देखील बांधुन द्यायचे आहे. तो देखील..

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब हा विषय त्यांना स्वतंत्रपणे देखील होवू द्या. आमची त्याला काही सुद्धा हरकत नाही. परंतु, ह्या विषयाचा संबंध होवू शकत नाही.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, १५ वर्षामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेने किंवा नगरपरिषदेने प्रभाग कार्यालय देखील शांती स्टार बिल्डर कडून घेतले नाही. हे, मी आपल्या निदर्शनास आणून देतो. ती आपल्या मिरा भाईंदरची संपत्ती आहे. महापालिकेची संपत्ती आहे. जी अटिशर्ती त्यांनी करायचे ती त्यांनी पाहिले नाही. एकच्या ऐवजी दोन हॉस्पीटल होईल १०० पैकी.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ह्यांचा विषय असेल. ह्यांची आपण माहिती घ्यावी. आपण त्यांचे पत्र घ्यावे. आणि तसा विषय आपण आणावा. पुढच्या सभेत घ्यावे.

**रोहित सुवर्णा :-**

शेवटी मिरारोडच्या विकासाचा प्रश्न आहे ना. मी मिरारोडच्या बाहेरच काही बोललो नाही. आणि ते शांती स्टार बिल्डरने त्याच्या खर्चाने करून मिरा भाईंदर महानगरपालिकेला फ्री मध्ये ताब्यात द्यायचे. आणि तसा महाराष्ट्र शासनाबरोबर करारनामा आहे. त्याचे पालन करण्याचे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याकडे जी माहीती आहे. ती लेखी स्वरूपात मा. महापौर दालनात सुपूर्द करण्यात यावी.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मी प्रशासनाला दिलेली आहे आणि ज्यावेळी सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी साहेबांनी सभागृहामध्ये हा विषय आणला. तेव्हा देखील मी बोललो होतो की, तेव्हा ही समाविष्ट करण्यात येईल. पण केले गेले नाही.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर. पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. २२ :-**

विकास आराखड्यातील आरक्षण क्र. १९२, १९३ मधील नियोजित रक्तपेढी, वातानुकुलित शवागृह, दवाखाना व वाचनालय इमारतीवर दवाखाना व प्रभाग कार्यालयाकरिता वाढीव दोन मजले बांधणे कामाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. २० :-**

मिरा रोड येथे विकास आराखड्यातील आरक्षण क्रमांक १९२,१९३ मध्ये आमदार निधी तसेच महानगरपालिकेच्या निधीतून नागरिकांकरिता रक्तपेढी, वातानुकुलित शवागृह, दवाखाना (ओ.पी.डी.) व वाचनालय इत्यादी करीता इमारत बांधणे कामी मा. महासभा दि. ०५/०५/२००५ ठराव क्र. ११ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळाल्यानुसार प्रत्यक्षात काम सुरू आहे. सदर इमारत तळमजल्याची आहे. सदर इमारतीचे संकल्प चित्र G + ६ करिता मंजुर आहे. सदर इमारतीवर वाढीव दोन मजले बांधल्यास दवाखान्याकरिता एक मजला व प्रभाग कार्यालयाकरिता एक मजला उपलब्ध होणार आहे. त्यामुळे प्रभाग क्र. ४ करीता प्रभाग कार्यालयाकरिता अपुऱ्या पडणाऱ्या जागेची अडचण संपणार आहे. सन २००६-०७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात सदर कामाकरिता तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच आमदार निधीतून निधी उपलब्ध होणार आहे. महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार मे. आर्कीझम यांच्याकडून सदर कामी रू. २,२८,९९,१७१/- एवढ्या रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. एकूण बांधकाम क्षेत्र १९४३.३४ चौ. मिटर एवढे प्रस्तावित आहे. तरी सदर कामाच्या अंदाजपत्रकीय खर्चास निविदा मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामे मे. आर्किझ, तांत्रिक सल्लागार यांच्यामार्फत मंजूर दरानुसार करून घेण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. २३ चे वाचन केले.)

( सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस यांनी प्रकरण क्र. २३ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

याला माझा अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. मागच्या सभेमध्ये आरक्षण क्र. २६२ बराचसा गाजावाजा झालेला आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, ४.४८  जमिन होती. ती ताब्यात आलेली जमिन होती ती चूकीने ०.८९ आहे. तिथे आपल्याने २.८९ ताब्यात आलेली आहे. ते जरा ठरावामध्ये करेक्शन करा.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, निश्चितच आरक्षण क्र. २६२ मध्ये मागच्या वेळेला अशा पध्दतीने सभागृहामध्ये तो विषय आलेला होता. त्या आरक्षण क्र. २६२ मध्ये विविध अतिक्रमणे झालेली आहेत. एखाद्या शाळेचे संपवून झालेले आहे. बऱ्याचशा काही ठिकाणी तिथे बांधकाम झालेली आहे. विनंती आहे की, आपण आरक्षणामधली अतिक्रमण हटवली गेली काय? किंवा ती जागा आपल्याकडे आलेली आहे का? त्या अतिक्रमणाकरिता ती तिथे नियोजित शाळा आहे. ती शाळा हटवणार आहात का? त्याचा खुलासा करा. ती तिथेच राहणार की हटवली जाणार आहे. त्याच्यामध्ये एक शाळा आहे. त्याचा खुलासा करा. तिथे एका समाजाचे मंदिर पण आहे. अशा पध्दतीने शाळा आणि मंदिर हे दोन्ही अतिक्रमणातून हटवले जातील की नाही. त्या जागेवरती राहून आरक्षित जागेवरती राहतील. ह्याचा पण जरा खुलासा करा. त्याचबरोबर आरक्षण क्र. २६३ जी आपण अध्यायी आहात. मिरा भाईंदरमध्ये नाट्यगृहासाठी मागणी आहे. तर ह्याच बरोबर तो सुध्दा विषय घ्या. आरक्षण क्र. २६३ हे सुध्दा विकसीत करण्यासाठी सभागृहापुढे त्यापध्दतीत धोरण ठरवावे. जरा खुलासा करा की, अतिक्रमण हटवले जाते की नाही?

**मा. महापौर :-**

खुलासा नंतर केला जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, विषय क्र. २३ वरती आताच या सदनाचा अगोदर आपला एक विषय झाला. तो बोहरी लोकांच्या दफनभूमीसाठी. त्यांच्यामध्ये प्रशासनाने रितसर सर्व्हे नं. टाकलेले होते. या टिपणीमध्ये हा विषय वादग्रस्त आहे. त्याच्यामध्ये २ कोर्ट मॅटर चालू आहे. १ सिम्बॉयसेस हायस्कूल, जनार्दन घंगाळे आणि आणखीन कोणतरी एक्स वाय झेड व्यक्ती आहे. ती सिव्हील कोर्टमध्ये मॅटर चाललेला आहे. ठाणा कोर्टामध्ये सर्व्हे क्र. २६२ चा जो टाउन पार्कचा जो सिम्बॉयसेस हायस्कूल आहे. ही केस आता ट्रायलच्या परिस्थितीला गेलेली आहे. म्हणजे ॲव्हिडेन् चालू झालेला आहे. आपल्या महापालिकेच्या पॅनल वरचे अशोक कुलकर्णी वकिल यामध्ये आपल्या महापालिकेची बाजू मांडतात. अधिकारी वर्ग त्यांना किती सहकार्य करतो. तो थोडा वादाचा विषय आहे. तो विषय जरा बाजूला ठेवा. या संपूर्ण २६२ एकरच्या यात रिझर्व्हेशन आरक्षण क्रमांकामध्ये एकूण किती सर्व्हे नंबर आहे? जे आयताकृती रिझर्व्हेशन आहे आणि ह्याचा कुठे ही उल्लेख दिलेला नाही. कोर्टाचे निर्णय आहे. आपण आजच्या परिस्थितीला कोर्टामध्ये कुठे आहोत? त्याबद्दल सर्व्हे  नं. नाही. वादाचे सर्व्हे नं. कुठचे आहेत ते दिलेले नाही. हिस्सा नं. नाही, मौजे कुठले आहेत. खारी, गोडदेव, नवघर कारण ह्याच्यामध्ये तलाठी सजामध्ये सुद्धा बदल केलेला आहे. त्यामुळे तुम्हाला एक गावउतारा घ्यायला लागणार आहे. त्याचा ह्याच्यात उल्लेख नाही. ए.एम.यु. प्लान आपल्याकडे नाही. कोर्टामध्ये शैक्षणिक संस्थेच्या लोकांचे म्हणणे काय आहे की, १९८२ पासून आमचे पजेशन आहे. ए.एम.यु. प्लानमध्ये साई पेट्रोलपंप हे दाखवले गेले. परंतु ती सिम्बॉयसेस हायस्कूल नाही. हे म्हणणे आपण आपले कोर्टात मांडले का? नाही असे ही असताना आपण मागे त्यांच्या नावावरती जागा करण्याचा ठराव केला. आमच्या प्रयत्नाने आम्ही स्थगिती आणली. म्हणून तो वाचला आणि तो विषय आलेला आहे आणि ह्या ठिकाणी मा. आयुक्त साहेब हे वृक्षप्राधिकरण समितीचे अध्यक्ष आहेत. त्यांना मी विशेष की, त्यामध्ये ह्या ठिकाणी आम्ही बऱ्याचशा सुचना केलेल्या आहेत. मागे आम्ही अहमदाबादचे एक गार्डन बघून आलो ते गार्डनमध्ये बी. ओ. टी. तत्वावर अगदी उत्तम प्रकारे म्हणजे मुंबईपासून ताकरीया गार्डन तर ते गार्डन आम्ही स्वतः बघून आलो. ती सुचना आम्ही आमच्या मा. आयुक्त साहेबांना दिली होती. त्यावेळेला तेव्हा त्यांना मंजूरसुद्धा केलेले होते. बरेच सदस्य वृक्षप्राधिकरणचे या सभागृहामध्ये बसलेले आहेत. त्याचा कुठेही उल्लेख नाही. आणि सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाण साहेब बसलेले आहेत. त्यांनी बॉटनीकल गार्डनबद्दल सांगावे. ह्याच्यामध्ये कुठेही उल्लेख केलेला नाही. तुम्ही आमच्याकडून पूर्ण सूचना जे आहेत. वृक्षप्राधिकरण समितीचे जे ठराव झालेले आहेत आणि त्याच्यामध्ये

मा. आयुक्त साहेबांनी कंन्सीडर केलेले आहे. ह्या सगळ्याचा उल्लेख करून हा विषय इकडे आणावा. सर्व सर्व्हे नं. टाकावे. कारण हा विषय पूर्णपणे कोर्ट मॅटरचा आहे. त्याच्यामध्ये अजून किती जागा मोकळी झालेली आहे. म्हणजे ताब्यात आलेली आहे असे नाही. आरक्षणाचा मुद्दा त्यांनी त्यांनी काढलेला आहे. पण त्या एका कांबळे नावाच्या गृहस्थाने जे कोर्ट मॅटर केलेले आहे. त्यांनी सर्व्हे नं. तिसराच दाखवलेला आहे. स्ट्रक्चर चौथेच दाखवलेले आहे. ह्या दोन केस फार मजेशीर आहेत. आपल्याकडे न्याय आणि विधी अधिकारी नाही. आणि होते तेव्हा त्यांनी काही केले नाही. मा. आयुक्त साहेब आपण इकडे नंतर आलेले आहात. हा विषय फार गाजलेला आहे. संपूर्ण मंत्रीमंडळापासून खालीपर्यन्त हा विषय परत एकदा आणा. आम्हाला कसली ही मंजूरी नाकारण्याचा विषय नाही. पण अगदी परिपूर्णरित्या हा विषय इकडे आणला तर बरं होईल. आणि त्याला स्वयंस्पष्ट आणि परिपूर्ण आपल्याला मंजूरी मिळेल असे मला वाटते. आपण माझी सुचना स्विकारावी अशी अपेक्षा बाळगतो.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, हा जो आपण आरक्षण दाखवलेला आहे. ४.४८ हेक्टर. माझ्या माहितीप्रमाणे हा आरक्षण आपण चूकीचा दिलेला आहे. ह्याच्यापेक्षा जास्त जागा आपल्याकडे असायला पाहिजे आणि हे रिझर्व्हेशनची आरक्षणची आपण जागा, एरिया काढलेला आहे. माझ्या माहितीप्रमाणे आपण डी. सी. बूकमधून काढलेला आहे. आणि प्लान मधला तर काहीतरी वेगळा होईल. कारण, शेंडे साहेब, इकडे असताना त्यांनी त्याच्या मागच्या दोन मिटिंगला आपण परवानगी नाकारली होती. आणि हे जे आहे ते टाउन पार्क रिझर्व्हेशनमध्ये आहे. आता तेवढा एरिया आपण वगळून म्हणजे आपण रिझर्व्हेशन गार्डन चेंज केली का?

**दिलीप घेवारे :-**

डि. सी. बुकमध्ये जेवढे रिझर्व्हेशन आहे. तेवढे आपण त्या लाईननुसार फिक्स केलेले आहे. त्याच्यामागे अतिक्रमण आहे. आणि ते डेव्हलप करणे आपल्याला शक्य नाही. त्याच्यामुळे डि. सी. रूल्स नुसार आणि त्या रिपोर्टसमध्ये एरिया आहे त्यानुसार आपण स्टिकअप करून ती आखणी केलेली आहे. आणि त्यानुसार त्या तत्वावर आपण काम करतो.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, आपण जे सांगतात ती पहिली गोष्ट की, ते अतिक्रमण आहे तर अतिक्रमण सेंटरमध्ये ४.४८ तुम्ही म्हटलेले आहे. त्याच्यात पण अतिक्रमण आहे. तर तो एरिया पण तुम्ही वगळणार आहात का? सिम्बॉयसेस स्कूल वगैरेचा.

**दिलीप घेवारे :-**

नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मग अतिक्रमणच्या एरियाचा काही संबंध आलाच नाही ना?

**मा. आयुक्त :-**

तेवढेच क्षेत्र आहे. आपण तेवढेच क्षेत्र ग्राह्य धरलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, माझे असे म्हणणे आहे की, जी आरक्षणाची बाउन्ड्री लाईन आपण कायम केलेली आहे. त्याच्यामागे अजून कमीत कमी ५० फुट जागा आहे. शेंडे साहेब असताना त्याला दोन परवानगी आपण रायटींगमध्ये नाकारलेले आहे की, हा रिझर्व्हेशनमध्ये आहे. आम्हाला परवानगी देता येणार नाही. त्या बिल्डिंग तर सोडा. त्याच्या बाजूला अजून ५० फुट लांब आपण बाउन्ड्रीवर बांधलेले आहे. हे कसे काय? मग आपण त्याला रायटींगमध्ये पहिले पत्र दिलं ते चूकीचे आहे का? आणि कुठलेही रिझर्व्हेशन आपण कायम करतो. त्यावेळी आपण गटबुकप्रमाणे कायम करतो. डी. सी. बुकचा जो एरिया आहे. त्याच्याप्रमाणे कुठलेही रिझर्व्हेशन कायम करत नाही.

**दिलिप घेवारे :-**

गटबुक असे आहे. गटबुक आणि प्रत्यक्ष मेजर प्लान त्याच्यामध्ये तफावत येते. त्या शेवटच्या बाउन्ड्री ज्या आहेत त्या जुळत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

आरक्षण कमी झालेले आहे ना. मी काय बोलतो, आता जी बाउन्ड्री आपण कायम केलेली आहे. माझ्या माहीतीप्रमाणे त्याच्यापासून अजून ५० ते ६० फुट आपली बाउन्ड्री जावू शकते. तिकडे आपण बिल्डिंगची परवानगी मागितलेली आहे. आणि ती नाकारलेली आहे की, ह्या ठिकाणी परवानगी देता येणार नाही. कारण ते टाउन पार्क रिझर्व्हेशन आहे. आणि आता आपण ५० फुट जागा सोडून बाउन्ड्री बांधतो. महापालिकाने राईटिंगमध्ये केलेले आहे. मा. आयुक्त साहेब, आपण असे १० पार्क नाकारलेले आहेत. जे आपल्या गटबुकप्रमाणे मॅच होत नाही.

**मा. आयुक्त :-**

ह्याच्यामध्ये तिकडे आरक्षणाची जागा सोडलेली नाही.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, मी तुम्हाला १०० पत्र दाखवतो.

**दिलीप घेवारे :-**

दाखवा.

**नरेंद्र मेहता :-**

मग ते काय आपण चेंज करणार?

**दिलीप घेवारे :-**

चेंज काय? जे पत्र असेल ते.

**नरेंद्र मेहता :-**

आपण बी. ओ. टी. कडून टेंडर मागवणार.

**मा. आयुक्त :-**

आपण जे म्हणता ते त्याच्याप्रमाणे आरक्षण जे क्षेत्र आहे. त्या शिवार गार्डन आरक्षणाच जे क्षेत्र आहे. त्या क्षेत्रामध्ये आपण काही कमी केलेले नाही. एक क्षेत्र. आपण जे म्हणता, त्याच्या पाठीमागे जागा आहे. ती मला दाखवा.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, दाखवायची गरज नाही. ते पत्र आपणच बिल्डरला दिलेले आहे की, अशी अशी आरक्षण खाली जागा आहे. मग तसे वाढवणार आपण जागा.

**मा. आयुक्त :-**

तसं असेल तर आपण जागा वाढवू. मी काय सांगतो आरक्षणाची जागा आपण बघितलेली नाही.

**नरेंद्र मेहता :-**

आता साहेबांनी काय सांगितले की, तिकडे मागे इन्क्लोजमेंट होता. म्हणून आपण तेवढं कमी केले. आता हे शब्द वापरले होते.

**मा. आयुक्त :-**

नाही.

**नरेंद्र मेहता :-**

विचारा ना.  त्यांनी आरक्षण सांगितले.

**दिलीप घेवारे :-**

व्हिजीकल बाउन्ड्री बद्दल तुम्ही सांगितले की, पुर्वी जे आहे आरक्षणाच्या एरिया बाबत कमी केले असे मी बोललो नाही.

**मा. आयुक्त :-**

अतिक्रमण आहे.  म्हणुन तो एरिया आपण कमी केला असे नाही.

**नरेंद्र मेहता :-**

चालेल मग, आपण पण चेक करा.  आणि मी सुद्धा पत्र दाखवतो.

**शुभांगी नाईक :-**

साहेब, जे अतिक्रमणचे आहे ते आपण हटवणार का?  त्याच्या जरा खुलासा कराना.

**मा. आयुक्त :-**

टाउन पार्कमध्ये आपण जो काही गाडर्नचा प्रस्ताव केलेला आहे.  किंवा गार्डनला आपण त्या ठिकाणी आरक्षणाच्या गाडर्नचा विकास करणार आहोत तर त्या ठिकाणी जर अशा प्रकारची जी अतिक्रमण असतील तर ती अतिक्रमण निश्चितच दुर केले जातील.

**रतन पाटील :-**

असतील म्हणजे आहेतच.

**मा. आयुक्त :-**

जे असतील ते सगळे दुर केले जातील.  आणि ज्या-ज्या ठिकाणी काही कोर्ट मॅटर असेल किंवा काही कोर्ट केसेस असेल.   तर त्या बाबतीमध्ये आपल्याला जो कोर्टामध्ये काही बचाव करायचा आहे.  किंवा महापालिकेची जी आपल्याला बाजु मांडायची आहे.  ती बाजु आपण मांडणारच आहोत.

**नरेंद्र मेहता :-**

बरोबर आहे.  साहेब, स्टेटस स्कोप असुन आपण ठराव करु शकतो ठराव करु शकतो का?  एखाद्या प्रॉपर्टीवर स्टेटस स्कोप असेल तर आपण ठराव करु शकतो का?

**मा. आयुक्त :-**

जेवढी जागा आपल्या ताब्यात आलेली आहे तेवढया जागेत आपण हे करु या ना.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, जो टाउन पार्क का जो विषय आया है।  उसके आजु बाजू मे जैसे अभी मा. आयुक्त साहबने बोला की, अतिक्रमण हटायेंगे लेकिन मे वहा रोज जाता हूँ।  उसके आगे पिछे रोज नई

झोपडपट्टी बन रही है। यहा कोई भी झोपडपट्टी देता होगा जो पैसे लेके उनको झोपडपट्टी बनाके दे रहा है। ये झोपडपट्टी वहा से तुरंत हटनी चाहीए। क्योकी सुबह जोभी ट्रक पे घुमने जाता है। वहॉ धुवा के कारण इतना प्रदुषण रहता है की, घुमना वहा बराबर नही है। एक बात और है। वहॉ जो तलाव है बोटींग के लिए वो तलाव कितने सालो से साफ नही है। वहॉ के तलाव के अन्दर के पानि की दुर्गंध आने लगी है। वो अभी साफ होना चाहिए। वहॉ पे संडास, बाथरूम, और पानि की टंकी करिब चार महिनेसे बन रही है। कॉन्ट्रॅक्टर कोन है वो मुझे मालुम नही है। लेकिन ४ महिनेसे वो काम पुरा नही हो रहा है। एक पानि की टंकी और संडास, बाथरूम कुछ बना रहे है। वो ४ महिनेसे वैसे ही पडा है। तो वो काम कोई भी पुरा नही कर रहा है। मी तिकडे रोज जातो. ४ महिन्यापासून ते असेच आहे. अर्धे काम झालेले आहे. कॉन्ट्रॅक्टर कोण आहे ते माहित आहे का तुम्हाला? काम चालू आहे तेवढं तरी माहित आहे का? माहिती करून घ्या. तो काम पूर्ण करत नाही. ते काम पूर्ण लवकर करा. माझे एक म्हणणे आहे की, ते सगळ नविन बनवायचे आहे. तर हे नविन कामकाजासाठी आपण पैसे कशाला लावायचे. एक जुना संडास, बाथरूम है। ते आपण सगळ नविन बनवणार आहे. परत- परत आपण तिकडे संडास, बाथरूम बनवायला लागलो.

**दिपक खांबित :-**

हे सगळ काम पूर्ण व्हायला दोन ते तीन वर्ष लागतील ना. तर आपण काय करणार? तो पर्यन्त आपली एक्जेस्टींग तलाव आणि एक्जेस्टींग जागा आहे, गार्डन आहे. ते आपण तशीच ठेवणार आहे. आता तलाव जो आहे, आणि गार्डन आहे तो आपण सध्या तसाच ठेवणार आहे.

**धनराज अग्रवाल :-**

कसा ठेवणार? तसा ठेवणार तर मग पाणी साफ केले पाहिजे.

**दिपक खांबित :-**

पाणी साफ करणार.

**मा. महापौर :-**

विषय सर्वानुमते मंजूर. पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. २३ :-**

विकास आराखड्यातील आरक्षण क्र. २६२ ''टाऊन पार्क'' विकसित करणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. २१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात आरक्षण क्रं. २६२ ''टाऊनपार्क'' करीता आरक्षित असुन सदर आरक्षणाचे एकुण क्षेत्र ४.४८ हेक्टर एवढे आहे. सदर आरक्षणाची जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू असून बरीचशी २.८९ हेक्टर एवढी जागा ताब्यात घेतलेली आहे. तसेच बाहेरील बाजुस कुंपणभिंत बांधण्याचे काम सुद्धा सुरू आहे. सदर आरक्षण पुर्णतः विकसित झाल्यास महानगरपालिकेच्या शोभेत भर पाडणार आहे. सदर ''टाऊनपार्क'' आरक्षणात तलावाचे विस्तारीकरण करणे, नागरीकांकरिता जॉगींग ट्रॅक, रस्ते, कॉफी हाऊस, बोट क्लब, लहान मुलांना खेळण्याकरिता विविध सुविधा, लहान रेल्वे ट्रॅक, सुलभ शौचालय, ॲम्पी थिएटर (स्टेज) डेकोरेटीव्ह वॉल व इतर सुशोभिकरण लॅंड स्केपिंग, विद्युत फिटिंग, शोभेचे दिवे करणे कामी तांत्रिक सल्लागार मे. आर्कीझम यांनी एकुण रू. ६,४१,०३,०९८/- रकमेचे अंदाजपत्रक तयार केलेले असुन खालील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | शिवार गार्डन मध्ये बोटींग ट्रॅक विस्तारीकरण करणे (भाग-१) | रु. २,२१,३२,६१३/- |
| २ | टाऊनपार्क कुंपणभिंतीलगत खेळण्याकरिता रेल्वे ट्रॅक करणे. | रु. ४६,६८,०२०/- |
| ३ | टाऊपार्कमध्ये जॉगर्स ट्रॅक, पाथवे तयार करणे. | रु. ८०,८६,७९१/- |
| ४ | टाऊन पार्क मध्ये अंतर्गत रस्ते तयार करणे. | रु. २८,९१,०८४/- |
| ५ | टाऊन पार्क दर्शनी ठिकाणी डेकोरेटीव्ह व रिटेनिंग वॉल तयार करणे. | रु. १२,८७,३४०/- |
| ६ | टाऊन पार्क मध्ये सुलभ शौचालय बांधणे. | रु. १०,५८,२०४/- |
| ७ | टाऊन पार्क ॲम्पी थिएटर बांधणे. | रु. ७,६८,८१२/- |
| ८ | टाऊन पार्क मध्ये Curved Arch Structure बांधणे. | रु. ३०,३६,०६६/- |
| ९ | टाऊन पार्क मध्ये कॉफी हाऊस बांधणे. | रु. १९,६४,६५२/- |
| १० | टाऊन पार्क मध्ये बोट क्लब बांधणे. | रु. ११,५१,५८८/- |
| ११ | संपूर्ण टाऊन पार्क मध्ये विद्युत फिटींग, लॅंडस्केपिंग व इतर आवश्यक कामे करणे. | रु. १,००,००,०००/- |

वरीलप्रमाणे अंदाजपत्रकिय खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत अहो. सदर खर्च मोठ्या प्रमाणावर असल्याने सदर काम हे बांधा वापरा व हस्तातरण (B.O.T.) या तत्त्वावर खाजगी एजन्सी कडुन त्यांचा स्वतःची रचना, नकाशा, डीझाईन, मुदत, टाऊन पार्क मध्ये करावयाच्या विविध सोयी सुविधा व इतर अटीशर्तीनुसार करण्याकरीता निविदा फॉर्म तयार करुन स्पर्धात्मक निविदा मागविण्यांत याव्यात. सदर

स्पर्धात्मक निविदा मधुन योग्य अटीशर्तीच्या निविदास मा. स्थायी समितीची मान्यता घेऊन आयुक्त यांनी महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने अटीशर्ती ठेऊन एजन्सीसोबत करारनामा करण्यात यावा. तसेच आवश्यकता भासल्यास मे. आर्कीझम, तांत्रिक सल्लागार यांच्या देखरेखीखाली मंजुर दराने सदर प्रकल्पाचे काम करुन घेण्यांस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. २४ चे वाचन केले.)

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी तुम्हाला बोलली आणि मला वाटले बाजूला मा. उपमहापौर बसलेत. महानगरपालिका काम असेल तर मा. महापौर आणि मा. उपमहापौर असतात. आपल्या मागे जे लोगो लागलेले आहे. तिथे अजूनही नगरपरिषद आहे. महापालिका होवून चार वर्ष झालेले आहेत. आणि निदान वर्ष संपता संपता तरी महापालिका करा. वर्ष संपता संपता पाचवे वर्ष झाले. तरी महानगरपालिका तिथे लावण्यात यावे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, प्रकरण क्रमांक चोवीसचे या ठिकाणी वाचन झालेले आहे. ठराव घेण्याअगोदर प्रशासनाकडून थोडासा खुलासा हवा. मागच्या काही महिन्याच्या अगोदर मा. महासभेमध्ये आपल्या या रस्त्यावरचे जे दुभाजक आहेत ते एकूण ५ दुभाजक सोडून इतर सर्व प्रवेश बंद करण्यासाठी आपण मा. महासभेत ठराव पारित केलेला होता. मा. महापौर मॅडम, सगळया रस्त्यावरती सर्व दुभाजक जवळ-जवळ बंद झालेल्या अवस्थेमध्ये आहेत. परंतु, दोन ठिकाणचे दुभाजक आजही त्याच स्थितीमध्ये चालू आहे. मला वाटते प्रशासनाकडून ज्या पध्दतीने इतर दुभाजकावर कारवाई झाली. आणि ते दुभाजक बंद करण्यात आले. परंतु, या दोन दुभाजकावरती तशा पद्धतीची कारवाई झालेली नाही. हे दुभाजक नक्की बंद होणार आहे की, असेच अवस्थेमध्ये उघडा राहणार आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, की काय आहे. सदर विषय.....

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब, आपण बसून घ्या. खुलासा केला जाईल.

**मोहन पाटील :-**

इतर ठिकाणी पोलीस प्रोटेक्शन मागितला. तो आपण बंद केला. पोलिस प्रोटेक्शन आपण अनेक ठिकाणी मागितला. आणि हे बाकी कसे राहिले? म्हणजे प्रशासनाने नक्की केले का? ते बंद का झाले नाही? अगोदर ती बंद करण्यात यावी.

**दिपक खांबित :-**

साहेब, बंद करण्यात येईल.

**मोहन पाटील :-**

पहिल्यांदा ते दुभाजक बंद करा आणि आपण नंतर हा विषय आणायला पाहिजे होता ना.

**दिपक खांबित :-**

दुभाजक चालूच आहे. साहेब, तिथे अर्धे बंद पण झाले.

**मोहन पाटील :-**

असे होत नाही. प्रशासनाकडून हलगर्जीपणा होत आहे. हा हलगर्जीपणा होता कामा नये.

**दिपक खांबित :-**

साहेब, त्वरीत बंद करण्यात येईल.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, मागच्या सभेमध्ये असे ठरले होते की, सगळे दुभाजक बंद करायचे. पण आजपर्यंत बऱ्याचशा ठिकाणी दुभाजक बंद झालेले आहेत आणि जे काही तिथे राहीलेले आहेत त्या रस्त्यावर रोज एक अपघात होतो आणि रोज एक माणूस मेला जात आहे. मिरा भाईंदरमध्ये असा एक मृत्युचा सापळा झालेला आहे. जरा लवकरात लवकर, माझी विनंती आहे की, लवकरात लवकर करायचे आपण ठरवलेले आहे. म्हणून दोन्ही सगळे दुभाजक बंद करा. त्याच बरोबर सर्व्हिस रोड काशीमिरा जो शिवाजी छत्रपती रोड आहे त्याच्या जोडीला सव्हिस रोडचे जे प्लान आहे तर सगळे दुभाजक बंद करून सर्व्हिस रोडचे प्लान चालू करावे. सर्व्हिस रोड व्हावे त्याचबरोबर मागच्या स्थायी समिती मध्ये एक विषय आला होता सिग्नल पासून ते साईबाबा मंदिरापर्यंत त्या रस्त्यामध्ये सध्या आता आपण डिव्हायडर टाकत

आहोत आणि जिथे टेम्पोचे स्टँन्ड आहेत त्याबाबत आम्ही कमीत कमी १० ते १५ वेळा बोललो पण अजून तेथून टेम्पो हटवले गेले नाहीत. तिथेसुद्धा रोज ॲक्सीडेंन्ट होतात. टेम्पोवाल्यांनी एका बाजूला टेम्पो लावलेला आहे. एक गाडी, एक बससुद्धा पास होत नाही. ह्याच्यामुळे तिथे नेहमी अपघाताची जागा झालेली आहे. प्रशासनाला विनंती आहे की, मागच्यावेळी स्थायी समितीमध्ये सांगितले होते की टेम्पो स्टँन्ड आपण वेगवेगळ्या ठिकाणी ते हटवणार आहोत. ते लवकरात लवकर कुठेही हटवण्याची कृती करावी. त्याच बरोबर आपल्याला काही जागा सोयीस्कर पडेल तिथे हटवावे आणि ते सगळे दुभाजक जर करायचे असतील तर सगळे दुभाजक बंद करावे. सर्व्हिस रोडचे आपले जे प्लान आहे, दोन्ही बाजुच्या रस्त्याला तर ते सर्व्हिस रोडचे प्लान सुद्धा चालू करावा. परंतु, ते का होत नाही? का केले जात नाही? का अडथळा येत आहे? कुठेतरी पाणी मुरतय असे मला वाटते. काम का होत नाही?

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब शिवार गार्डन आणि सरदार वल्लभभाई पटेल रोडचा जो रस्ता आहे. ते अंदाजे नुसते चार - पाच फुट किंवा दहा फुट असेल. तर ते दोन्ही बाजुंनी रस्ता ठेवला तर त्या दोन्ही बाजुला सिग्नल आहे. तो सिग्नल माहितच पडत नाही. एक चालू असते तर दुसरा तेथून जातो. तर तिथे एक रस्ता बंद केला पाहिजे आणि एकच रस्ता चालू ठेवला पाहिजे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

जे डिव्हायडर आपण केलेले आहेत तिथे आपण डेव्हलप करायला दिले आहे व झाडे लावायला दिली आहेत. ते बरोबर डेव्हलप करतात का? महानगरपालिका त्या झाडांना पाणी टाकते.

**दिपक खांबित :-**

आता आपण करतो. करायला घेतले आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मग त्यांची नाव काढून टाका. कशाला ठेवली आहेत त्यांची नावे?

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतोय साईबाबा मंदिरापासून ते सिग्नल पर्यंत मघाशी सन्मा. सदस्य रतन पाटील ह्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्याठिकाणी भरपूर टेम्पो उभे राहतात आणि अक्षरशः तिथे ॲक्सीडेंन्ट होण्याची भिती असते. आता आपण तिथे लाखो रूपये खर्च केलेला आहे. तर मला वाटते की, आपण प्रत्येक टेम्पोवाल्यांना नोटीसा द्या. तुम्हाला जर जागा उपलब्ध नसेल तर तुम्ही येथे टेम्पो कसे काय उभे करता, महानगरपालिके जवळ दुसरा मुद्दा असा आहे की, आपल्याने जर ते हॅन्डल होत नसेल तर मला असे वाटते आयुक्त साहेब की, आर.टी.ओ. चे पथक आपण रस्त्यावर उतरावे म्हणजे आर.टी.ओ. ला त्रासदायक झाले की, तिथे टेम्पो उभे राहणार नाही. त्यांना आपण पर्यायी साईडला कुठेतरी जागा सांगितली होती तिथे ते टेम्पो का उभे करत नाही? ॲक्चुअली आताची परिस्थिती फारच खराब आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आपण जो दुभाजक विषय आणलेला आहे. मागच्या मा. महासभेमध्ये आपण दुभाजकाचा विषय पास करून दिलेला आहे. त्याच्यामध्ये काही रस्ते बंद झालेले आहे. परंतु, दोन रस्ते बंद झाले नाहीत आणि आम्ही असे ऐकले आहे की, तिथे आपले ठेकेदार रस्ते बनवायला जातात पण कोणीतरी दादागिरी करून त्यांना पळवतात. मग हे असे असले तर त्याच्यामध्ये आपल्या महानगरपालिकेचे काय राहिले? कोण एखादा व्यक्ती जर आपल्या स्वतःच्या स्वार्थासाठी काहीही करणार आणि आपल्याला दाबवायचा प्रयत्न करणार आणि आपण आपले काम थांबवणार. आता सन्मा. सदस्य रतन पाटील हे बोलले की, तिथे मृत्युचा सापळा झालेला आहे. असे झालेतर रोजची एक व्यक्ती मरते. मग एखादी व्यक्ती स्वतःच्या स्वार्थासाठी जर आपल्या कॉन्ट्रॅक्टरला अडवत असेल तर तिथे फोर्स लावून पहिले बघून घ्या आणि नंतर ही परमिशन घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सिग्नल पासून साईबाबा मंदिरापर्यंत साठ लाखाचा रस्ता बनवलेला आहे. मॅडम आपला मेन सिग्नल ओव्हर ब्रिजपासून उतरल्यापासून ते फाटकपर्यंत साईबाबा मंदिर आहे तिथे आपण रस्ता बनवायला घेतला आहे तिथे टेम्पो चालकांची परिस्थिती काय असणार? ते टेम्पो उभे राहतात त्यांना आपण कुठे शिफ्ट करणार? कारण की तिथे डिव्हायडर बसवण्यात आलेला आहे.

**परशुराम पाटील :-**

मगाशी मी साहेबांना तोच विषय सांगितला.......

**प्रेमनाथ पाटील :-**

स्थायी समितीमध्ये मी हा प्रश्न दोनदा विचारला होता.

**दिपक खांबित :-**

पोलिस स्टेशनला पत्र दिले आहे की, ब्रीज जवळ ब्रीजच्या ......

**प्रेमनाथ पाटील :-**

ब्रिजच्या खाली जागा द्यायचीच नाही. कारण की आपल्याला.......

**परशुराम पाटील :-**

ब्रिजवरून उतरताना लेफ्ट साईडला जाताना सिग्नलच्या बाजूला भयंकर अडचण आहे. काशीमिऱ्यावरून ज्या गाड्या येतात तिथे ॲक्सीडन्ट होण्याची शक्यता आहे, टर्नमध्ये. फ्लाय ओव्हरच्या येथे अतिक्रमण आहे ते हटवले की नाही यात मला शंका आहे. आयुक्त साहेब, त्याच्यासाठी आपण नोटीसा काढायला पाहिजे. स्टॅन्ड जो आहे तो मोठा करण्यात यावा.

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये, टेम्पोच्या बाबतीमध्ये मी मघाशी जे सांगितले की, त्या टेम्पोवाल्याची जी काय संघटना असेल किंवा त्या संघटनेचे पदाधिकारी जे कोणी असेल त्यांना समक्ष आपण बोलवू आणि त्यांच्याशी चर्चा करून हा प्रश्न आपण रस्त्यावर टेम्पो उभे राहणार नाही ह्याची आपण खबरदारी घेवू.

**परशुराम पाटील :-**

टर्नवर अतिक्रमण आहे त्याबाबत मी आपल्याकडे पत्रव्यवहार ही केलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, जो आपला मिरा भाईंदरचा मुख्य रस्ता आहे, ते कुठल्या तरी पक्षाचा कार्यक्रम असावा की, तो रस्ताच बंद करतात त्याचे कायतरी करा. आपण कितींदा त्याच्यावर राष्ट्रीय कार्यक्रम केलेला आहे आणि आपण वनसाईड रस्ता बंद करतात आणि दिवस - दिवसभर तो रस्ता बंद असतो. त्यावेळी ट्राफिकचे हाल काय होते? एका साईडला आपण डिव्हायडर लावता आणि हे सोय करतात व दुसऱ्या साईडला परत अडचणी करता. आपल्याकडे कार्यक्रम करायला सुभाषचंद्र बोस, खारीगाव मैदान असे बरेचसे मैदान आहेत. मग तो रस्ता कशाला बंद करायला हवा? नाहीतर, उद्या लग्नाला ही लोक मागतील की, आम्हाला रस्ता भाड्यावर द्या. मग ते पुढे करणार की, भाड्यावर भेटणार की काय?

**रतन पाटील :-**

रस्ता भाड्याने देणेबाबतचा इथे आला विषय आला आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सदर रस्त्यावर जे दुभाजक अजून ही उभे आहेत ते दुभाजक त्वरीत बंद करण्यासाठी आपण कृपया प्रशासनाला तशाप्रकारचे निर्देश द्यावेत. त्वरीत बंद व्हावे असे रूलिंग आपण प्रशासनाला द्यावे असे ठरावामध्ये मेन्शन आहे.

**रतन पाटील :-**

सर्व्हिस रोड?

(सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस यांनी प्रकरण क्र. २४ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर. मा. सचिव पुढील विषय द्यावा.

**प्रकरण क्र. २४ :-**

मा. महासभा दि. १७/१२/२००५ ठराव क्र. ७४ नुसार बंद न केलेल्या दुभाजकातील प्रवेशाची माहिती देणे.

**ठराव क्र. २२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत छत्रपती शिवाजी महाराज मार्ग रस्त्यावरिल दुभाजकात असलेले खालील प्रवेश वगळता इतर सर्व प्रवेश बंद करण्याबाबत मा. महासभा दि. १७/१२/२००५ ठराव क्र. ७४ अन्वये मान्यता दिलेली आहे.

१. शिवाजी महाराज पुतळ्या मागील पहिले दोन प्रवेश
२. सिल्व्हर पार्क जंक्शन
३. एस.के स्टोन जंक्शन
४. मिरा रोड पोलिस स्टेशन (कलकीया जंक्शन)
५. शिवार गार्डन जंक्शन

वरील नमुद अ.क्र. १ ते ५ प्रवेश वगळता परीवहन सेवेच्या बसला जाण्याकरिता खालील प्रवेश बंद करण्यात आलेले आहेत.

१. दिपक हॉस्पीटल समोरील जंक्शन
२. हटकेश उद्योग नगर येथील जंक्शन

मा. महासभा दि. १७/१२/२००५ ठराव क्र. ७४ मध्ये बदल करून परीवहन सेवेकरिता

१. दिपक हॉस्पीटल समोरील जंक्शन
२. हटकेश उद्योग नगर येथील जंक्शन

वरील ठिकाणी दुभाजकातील प्रवेश सुरू ठेवण्यात यावेत. उर्वरीत सर्व ठिकाणचे रस्ता दुभाजकातील प्रवेश त्वरीत बंद करण्यात यावे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(मा. सचिवांनी प्रकरण क्र. २५ चे वाचन केले.)

**प्रभात पाटील :-**

काँग्रेस पक्षाचे संख्या बळ चुकीचे आहे. त्याची कृपया पहिल्यांदा नोंद घेउन संख्या सुधारावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, आता जो प्रश्न उपस्थित केला होता की, संख्या चुकीची आहे. ह्याच्यावर खुलासा व्हावा. म्हणजे कुठे चुकलेले आहे. हा प्रश्न मागच्या मा. महासभेत आमच्या गटनेत्यांनी संख्याबळाबद्दल विचारला होता.

**नगरसचिव :-**

सदस्य संख्या आहे. राष्ट्रवादी काँग्रेस - ३३, काँग्रेस आय -२७, भाजपा - १६, शिवसेना - ४, जनतादल - ३ + १ = ४.

**शुभांगी नाईक :-**

मा. सचिव, अपक्ष सदस्य सुद्धा काँग्रेसमध्ये का? अपक्ष सदस्यांची मोजणी केली का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, विकास आघाडीचे कुठल्या पक्षामध्ये विलीनीकरण झालेले आहे? त्या पक्षाचे आपल्याकडे पत्र आले असेल ना? त्याचा खुलासा करा.

**नगरसचिव :-**

पत्र आलेले नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग तुम्ही कशाप्रकारे संख्या मोजली? विकास आघाडीचे संख्याबळ आपण कुठे मोजले?

**प्रेमनाथ पाटील :-**

काँग्रेसमध्ये मोजली ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांचे तसे पत्र आले आहे का? विकास आघाडी पक्षाचे विलीनीकरण झालेले आहे, काँग्रेस (आय) किंवा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये, कुठे आपण संख्या बळ मोजलेली आहे? सचिव साहेब, प्रत्येक वेळी आपण त्याची विभागणी व्हाईज करतोय.

**नगरसचिव :-**

आघाडीचे सदस्य कोणत्या पक्षात गेले ह्याबद्दल माझ्याकडे लेखीपत्र नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग तुम्ही काँग्रेसमध्ये कशी काय मोजणी केली?

**नगरसचिव :-**

काँग्रेस (आय) चे २१ सदस्य आहे आणि ६ सदस्य वेगळे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण ही नोंद करा आणि ह्याच्यात सुधारणा करा.

**शरद पाटील :-**

सचिव साहेब, आपण ही जी संख्या दिली आहे ती ही एकोणचाळीस होते. त्यांना अपक्ष घ्या.

**रिटा शाह :-**

जो अपक्ष सदस्य आहे त्याने स्वतःहून डिक्लर करायचे आहे.

**नगरसचिव :-**

स्विकृत सदस्याला पक्ष नसतो.

**शरद पाटील :-**

स्विकृत सदस्याला पक्ष नाही मग आमची संख्या १६ कशाला दिली? १५ द्या ना. काँग्रेसचे आयचे २४ सदस्य दाखवले आहेत तर ते २४ सदस्य कोण आहे ते आपण आम्हाला दाखवा.

**जयंत पाटील :-**

आपण ह्या टिपण्या देता ते वेळेवर तुम्ही कॅन्सल करता का? कोण २१ आहेत ते आपण मला दाखवा आणि अधिकृत तमच्याकडे काय २१ आहे ते दाखवा आणि कसे तुम्ही म्हणता एकवीस. व्यासपीठावर बसून तुम्ही.... सचिव साहेब, काय उत्तर देता की, नाही का बसू? मी विचारले की काँग्रेसचे २१ सदस्य कोण आहे? तुम्ही २४ लिहिले मी २१ लिहिले.

**नगरसचिव :-**

२१ सदस्य आणि त्याच्यात तीन अपक्ष सदस्य.

**जयंत पाटील :-**

त्या लोकांनी काँग्रेस पक्षाची अधिकृत पावती फाडलेली नाही. आमच्या जिल्ह्याचे अध्यक्ष बाजूला बसलेले आहे. रोकडे आलेले नाही. रोकडा दे पण तोकडा दे पण रोकडा दे असे म्हात्रे साहेबांचे म्हणणे आहे आणि ह्या विषयावर कोणी बोलायलाच तयार नाही. हा विषय कठिण दिसतोय. ह्याविषयावर कोणी चर्चा करत नाही. हा एकच विषय आतापर्यंत असा आहे की, ज्या विषयावर कोणी चर्चा करायला उठतच नाही. मी फक्त काँग्रेस संबंधी विचारतोय की, आमचे पक्ष एवढा वाढत चालला आहे.

**प्रभात पाटील :-**

माझे असे म्हणणे आहे की, काँग्रेसची संख्या जर २४ आहे. तर मग आम्हाला जॉईन झालेले किंवा ह्यांची कुठेच दखल घेतली नाही, ह्या बाकीच्या तीन लोकांची. संख्याबळ परफेक्ट होत नाही. तोच माझा प्रश्न होता.

**जयंत पाटील :-**

हे कुठे आहे ते सांगा ना.

**नगरसचिव :-**

अपक्षमध्ये आहे.

**जयंत पाटील :-**

मग तुम्ही असे का लिहिले? खोट आहे. हे तुम्ही गोषवारा का देता?

**प्रभात पाटील :-**

चुकीचा गोषवारा आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, आता आम्ही अपक्ष आहोत की, काँग्रेसमध्ये आहोत?

**नगरसचिव :-**

ज्याप्रमाणे निवडणूक लढवली त्याप्रमाणे आहात.

**नरेंद्र मेहता :-**

मग आम्हाला केबिन नाही. आघाडी अपक्ष आहे. त्यांना केबिन आहे. मग आम्हाला का नाही?

**नगरसचिव :-**

आपण त्याचे धोरण ठरवा. धोरण ठरवण्यासाठीच विषय सभोसमोर आणला आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, विषय क्र. २५ आजच्या मा. महासभेपुढे गटनेत्यांना केबिन देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेण्याकरिता विषय मा. महासभेसमोर आलेला आहे. सन्मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये सदस्य संख्येच्या बळावरून सुद्धा एकवाक्यता कुठे दिसत नाही. ज्या काँग्रेस आय पक्षामध्ये जे सदस्य विलीन झालेले आहेत, बसलेले आहेत ते सदस्य सुद्धा त्यांचीसुद्धा विचारणा आहे की, आमची संख्याबळ का विचारात घेतले गेले नाही. हा एक भाग झाला. दुसरी गोष्ट, सन्मा. महापार मॅडम प्रशासनाला आजूबाजूच्या महापालिकेमध्ये काय स्थिती आहे. तिकडच्या गटनेत्यांच्या केबिनबाबत कशाप्रकारचे निकष आहेत त्याची माहिती प्रशासनाला मागून घ्यायला सांगा. ह्याच्यावर राज्य शासनाचे कायदेशीर जे काही मत असेल ते मत मागवा आणि त्यानंतर संपुर्ण रितसर प्रस्तावासह हा विषय आगामी मा. महासभेपुढे संपुर्ण तपशील मागवून त्यानंतर हा विषय पुढील मा. महासभेपुढे घ्यावा अशी मी आपणांस विनंती करतो आणि सभागृहासमोर असा ठराव मांडतो.

**नरेंद्र मेहता :-**

आयुक्त साहेब, आम्ही अपक्ष की काँग्रेस? सचिव साहेब खुलासा तरी करा. आम्हाला केबिन नाही का?

**मा. महापौर :-**

सदरचा विषय पुढील मा. महासभेत घेण्यात येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ''ज'' चा प्रस्ताव आपण घेणार नाही का?

**प्रकरण क्र.२५ :-**

गटनेत्यांना केबिन देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

(मा. महापौर सोा. यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यात आले.)

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. २७ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर हे गैरहजर आहे व त्यांनी कोणालाही अनुमती दिलेली नाही.

**प्रकरण क्र. २७ :-**

सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर यांचे दिनांक ०३/०५/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा अतिरिक्त मोबदला देणेबाबत.

(सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर हे गैरहजर असल्याने मा. महापौर सोा. ह्यांच्या आदेशानुसार सदरची पुरक घोषणा फेटाळण्यांत आली.)

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. २८ चे वाचन केले.)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, जो प्रस्ताव दिलेला आहे त्याचे वाचन करावे.

(नगरसचिव यांनी सदर प्रस्तावाचे वाचन केले.)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल ह्यांनी विचारलेला प्रश्न फेटाळण्यात येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, आपण विषय फेटाळावा त्यास आमची हरकत नाही. पण महाराष्ट्र शासनाकडे आपण जी. आर. पाठवलेला आहे. उपविधी आपण पाठवलेली आहे आणि राज्यपालांनी उपविधी मंजुर करून आपल्या महापालिकेत पाठवलेली आहे आणि त्या उपविधीचे पालन होत नाही. म्हणून हा प्रश्न आणलेला आहे. आपल्याला फेटाळायचा असेल तर आपण विषय फेटाळा आम्हाला कोर्टात जायचे आहे तर आम्ही कोर्टातही जाउ.

**मा. महापौर :-**

गेल्या मा. महासभेत ह्या विषयावर निर्णय झालेला आहे आणि आपण पुन्हा ''ज'' अंतर्गत हा विषय दिलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

निर्णय काय झालेला आहे ते आपण सांगा ना.

**मा. महापौर :-**

रूलिंग दिलेले आहे. कामकाज सुरू आहे आणि त्यांची माहिती मागवलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उपविधी आपल्या महापालिकेत आलेली आहे आणि मा. महापौर साहेबांनी ठरावावर निर्णय पाठवलेला आहे आणि ठराव मंजुर होउन आलेला आहे त्यानंतरही अनेक टपऱ्या आपल्या प्रशासनाकडून चुकीचे दिले गेलेले आहे. आज पाहिजे तिथे टपरी आहे. आमच्या वार्डमध्ये तीन टपऱ्या आल्या. आयुक्त साहेब, मा. महापौर मॅडम, आम्ही कुठलाही नविन ठराव आणलेला नाही. महाराष्ट्र शासनाकडून जी महापलिकेने उपविधी पाठवून अपंग आणि गटई कामगारांसाठी मंजुरी आणलेली आहे. त्याचे पालन रितसर व्हावे.

**मा. महापौर :-**

पुढील प्रश्न घेण्यात यावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर मॅडम, काही निर्णय तर घ्या. माझ्या वार्डात तीन टपरी आली होती आणि आयुक्त साहेबांच्याही लक्षात नाही की, त्यांना कोणी टपरी दिली आहे आणि नियमाप्रमाणे त्यांनी ते उचलायला हवी होती. अशा पद्धतीने मिरा रोडमध्ये सन्मा. आपले आमदार ह्यांच्या वॉर्डमध्ये टपरी गेली होती. ती पण तेथून उचलायला आले होते. तर आमचा कोणाला विरोध नाही पण महाराष्ट्र शासनाने जी अंपगापोटी पाठवलेली आहे त्याचे पालन हे अधिकारी वर्ग करत नाही आणि हे चालले आहे हे कसे काय चालणार आहे. म्हणजे आपण ज्या जुन्या टपऱ्या दिलेल्या आहेत त्यांना तुम्ही रिन्युएशन करणार नाही. नविनला तुम्ही पाहिजे तिथे देणार हेच महापालिकेचे म्हणणे आहे का? मा. महापौर मॅडम, आपले हेच म्हणणे आहे की, अधिकारी जे करणार ते योग्य आहे. द्या ना दोन मिनिटे लागेल. काय निर्णय आहे ते आपण आम्हाला सांगा ना आणि आयुक्त साहेबांना स्वतःला माहिती आहे माझ्या वार्डात टपरी आली होती. आयुक्त साहेबांना सांगून उठवली गेली. आयूक्त साहेबांना ही माहित नाही, कोणी दिली कशी दिली ती.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, आपण विषय फेटाळलेला आहे आपण राष्ट्रगीताला सुरूवात करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर मॅडम, विषय फेटाळण्याचा आपल्याला अधिकार आहे. पण हा शेवटी अपंगाचा विषय आहे. माझ्या हिताचा नाही. आपण अपंगाना, अंधांना टपरी देणार आहोत. अपंगांसाठी टपरी देण्याचे अनेक अर्ज मागच्या महिन्यापर्यंत पडलेले आहे. म्हणजे आपण अपंगांचा विषय करतो असे आपले म्हणणे आहे का?

**हॅरल बोर्जीस :-**

आयुक्त साहेबांना खूलासा करायला सांगा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उपमहापौर साहेब, आपणही या विषयाला मला शाबासकी दिली होती की.

**प्रकरण क्र. २८ :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक १०/०५/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - अंध व अपंगांसाठी जागा देण्याच्या महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शा.नि. क्रमांक मि.भा.पा. २००४/१४४८/प्र.क्र.१९८/०४/नवि-२८ नियमावलीतील नमूद केलेल्या अटी/शर्तींच्या अधीन राहून जोडलेल्या नियमावलीतील अ, ब, क मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९(अ) अन्वये मान्यता देण्यात आलेल्या नियमावलीचे पालन करण्यांबाबत.

(मा. महापौर सो. यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आला.)

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. २९ चे वाचन केले.)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन कृष्णा पाटील ह्यांनी दिलेली लक्षवेधी फेटाळण्यात येत आहे.

**रतन पाटील :-**

माझी लक्षवेधी नाही.

**मा. महापौर :-**

''ज'' चा प्रश्न फेटाळण्यात येत आहे.

**रतन पाटील :-**

कशासाठी? जी आरक्षण आहेत ती तुम्हाला विकसीत करायची नाही का? किती आरक्षण अशी आहेत जिथे अनधिकृत बांधकामे झालेली आहेत.

**प्रकरण क्र. २९ :-**

सन्मा. सदस्य श्री. रतन कृष्णा पाटील यांचे दिनांक १२/०५/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विकास आराखड्यातील आरक्षणे हस्तांतरीत करुन घेण्याबाबत.

(मा. महापौर सो. यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आला.)

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. ३० चे वाचन केले.)

(सभागृहात गोंधळ.)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर ह्यांनी मांडलेला ''ज'' चा विषय फेटाळण्यात येत आहे.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, आपण हा विषय मतदानाला टाका.

**सुधा गोयंका :-**

मग विषय आणताच कशाला जर फेटाळायचा असेल तर?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

विषय मतदानाला टाका आम्ही चौघेजणांची मागणी केलेली आहे.

( सभागृहात गोंधळ. )

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, विषय फेटाळण्याचे आपण कारण सांगा.

**शशिकांत भोईर :-**

आम्ही चौघांनी मतदानाची मागणी केलेली आहे. आमचा प्रस्ताव मतदानाला टाका.

**रतन पाटील :-**

आमचा प्रस्ताव मतदानाला टाका. आम्ही मतदानाची मागणी करतोय.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, सचिव साहेब आम्ही आपल्याला विनंती करतो की, आमचा प्रस्ताव आपण मतदानाला टाकावा.

**रतन पाटील :-**

आपल्याकडून कुठली अपेक्षा करायची, आपण कुठले विकास करणार आहात.

**शशिकांत भोईर :-**

सचिव साहेबांना विनंती आहे की, प्रस्ताव मतदानाला टाका.

**रतन पाटील :-**

बोला, जोपर्यंत तुम्ही बोलणार नाही तोपर्यंत आम्ही उभे राहणार आम्ही विरोधक आहोत.

**मोहन पाटील :-**

आपण बोला. आपण सांगितले ना मतदान पाहिजे आहे तर मतदान घेत आहोत ना.

**रतन पाटील :-**

आपण फक्त हुशाऱ्या मारतात.

**हॅरल बोर्जीस :-**

तुम्हाला बोलायला दिले आहे म्हणून आपण बोलत आहात. आम्ही बोलायला लागलो ना तर तुम्ही बंद व्हाल बोलायचे.

**रतन पाटील :-**

आम्ही मतदानाची मागणी केलेली आहे.

**मा. महापौर :-**

सचिवजी, मतदानाला सुरूवात करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रत्येक विषयाला मतदान घ्या. आम्हालाही माहित पडेल व लोकांबरोबर आम्ही चर्चा करू जोपर्यंत चर्चा होत नाही तोपर्यंत मागणी होत नाही. तुम्ही आमचा विषय कशावरून फेटाळता आणि महाराष्ट्र शासनाचा जी. आर. आहे. म्हणून आम्ही तुम्हाला सांगतोय. हा आमचा नाही.

**मा. उपमहापौर :-**

विषय मतदानाला टाकण्यात येत आहे असे तुम्हाला सांगितले आहे ना.

**शशिकांत भोईर :-**

मतदानाला प्रस्ताव टाका ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण सांगा की, आम्ही जी. आर चे पालन करणार नाही. असे आपण म्हणा.

**शशिकांत भोईर :-**

आपण प्रस्ताव मतदानाला टाका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महाराष्ट्र शासनाच्या जी. आर चे पालन करणार नाही असे आपण सांगा. महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल ह्यांच्याकडून मान्य करून हे आदेश आलेले आहेत आणि त्याचे आपण पालन करणार नाही.

**मोहन पाटील :-**

सदस्यांनी मतदानाची मागणी केली आहे चर्चा कशाला पाहिजे आपण मतदान घ्या ना. आपल्याला त्यांचे कशाला ऐकायचे मतदान घ्या.

**रतन पाटील :-**

अहो तुमच्याकडून हीच अपेक्षा आहे ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आमचा ठराव दिलेला आहे. आम्ही प्रस्ताव दिलेला आहे. आपण महाराष्ट्र शासनाच्या जी. आर. चे पालन करणार नाही असे तुमचे मत असेल तर तुम्ही तुमच्या बाजूने मतदान घ्या. आम्ही आमच्या बाजूने मतदान घेतोय. आम्ही कुठलाही विरोध करत नाही. महाराष्ट्र शासनाच्या जी. आर. चे पालन या महापालिकेत ......

**मोहन पाटील :-**

आपल्याला चर्चा कशाला पाहिजे? मतदान घ्या ना.

**रतन पाटील :-**

आरक्षणामध्ये तुम्हाला बांधकाम करायची आहेत. तुम्हाला आरक्षण हस्तांतरित कुठे करायचे आहेत?

**शशिकांत भोईर :-**

प्रभाग अधिकारी जो आहे ना त्यांना येथून झालेला ठराव दिला नव्हता आम्ही जेव्हा बोललो तेव्हा ठराव देण्यात आला. हे जनतेचे काम आहे माझे वैयक्तीक नाही.

**सुधा गोयंका :-**

जेव्हा पाचशे रूपयाचे हजार रूपये ठरले. तेव्हा दुसऱ्या दिवशीच ते पोहचले.

**शशिकांत भोईर :-**

हे सर्व पोहचले पाचशेचे हजार रूपये करा आणि जे ठराव होतात ते प्रभाग अधिकाऱ्याला देत नाही का?

**सुधा गोयंका :-**

ठराव केलेला आहे आणि आम्ही विचारल्यावर माहिती काढतात, माहिती काढतात असे बोलले जाते असे तीन महिने काढले.

**रतन पाटील :-**

आठशे बारा जणच मिरा भाईंदर मध्ये आहेत नउ वर्षामध्ये नउ आरक्षणे आपण घेतलेली नाही दुःख आहे.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय, साहेब हा जो घरपट्टीचा विषय आहे की एकाच बिल्डींगमध्ये समान कर लागला पाहिजे आणि काही बिल्डींगमध्ये मागे हे ठरावामध्ये आलेले आहे की, मला वाटते की, विजय पाटील ह्यांनी मला सांगितले होते की, मार्चच्या नंतर ही प्रोसीजर चालू होईल पण सध्यातरी चालू केली की नाही हे मला माहित नाही. चालू केले असेल तर उद्या लागेल याबाबत आपण खुलासा करावा.

**शशिकांत भोईर :-**

माझी महापौरांना विनंती आहे की, ज्यावेळेस आपण ठराव पारित केला त्यानंतर हे ठराव प्रभाग अधिकाऱ्याला दिले गेले नाही. जेव्हा आम्ही त्यांच्याशी विचारणा केली तेव्हा त्यांनी सांगितले की, ठराव झालेला आहे पण ठराव नक्की काय झाला आहे हे आम्हाला माहितच नाही. तद्नंतर त्यांना ताबडतोब ठराव पाठवण्यात आला.

**परशुराम पाटील :-**

मॅडम आपला हा विषय झालेला होता.

**शशिकांत भोईर :-**

विषय झालेला नव्हता. अकार्यक्षम असे उपायुक्त आपल्याला हवेच कशाला? आपण कशाला त्यांची बाजू घेता? त्यांना प्रशासनाच्या कार्याचे काम माहित नाही त्याला पशुसंवर्धन चिकीत्सा करणे ह्याचीच माहिती आहे तर त्याला प्रशासनाची काम का द्यायची अशा अधिकाऱ्याला आपण येथून कार्यमुक्त करावे असा मी ठराव मांडत आहे.

**सुधा गोयंका :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण खाली बसून घ्या.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपला मागच्या वेळेला ठराव झाला होता की, एका बिल्डींगमध्ये दोन टॅक्स लागतात. एक कमी व एक जास्त. त्याबाबत आपला आयुक्त शिंदे साहेब असताना ठराव झाला होता. त्यापद्धतीने एका बिल्डींगमध्ये दोन टॅक्स जरी जास्त आणि कमी तो आपल्याला एकच टॅक्स लावायचा आहे. ग्रामपंचायत पासून असेल तर ग्रामपंचायतपासूनचा असावा आणि नविन असेल तर नविन लावावा असा ठराव झालेला आहे तर त्याची अंमलबजावणी झालेली आहे का नाही त्याची कल्पना नाही.

**शशिकांत भोईर :-**

विरोधी पक्षनेते साहेब, आपल्याला अशी माहती नसेल की, अधिकाऱ्यांपर्यंत ठराव गेलेले नव्हते. त्यानंतर आम्ही येथे आलो हे प्रकरण येथे आणायला आणि अशा अकार्यक्षम अधिकाऱ्याला आपण पाठीशी का घालता? हा जनतेचा प्रश्न आहे. माझा किंवा तुमचा वैयक्तिक नाही. अशा अकार्यक्षम अधिकाऱ्याला ज्याला प्रशासनाबद्दल काही माहिती नाही अशा अधिकाऱ्याला येथे ठेवणे उचित नाही. त्यांना कार्यमुक्त करा असा मी ठराव मांडलेला आहे.

**सुधा गोयंका :-**

आणि त्या ठरावाला मी अनुमोदन दिलेले आहे.

( सभागृहात गोंधळ )

**मा. आयुक्त :-**

जो ठराव झालेला आहे त्या ठरावाच्या अंमलबजावणीचे काम आता आम्ही सुरू केलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

माझ्या वॉर्डामध्ये इमारती आहेत तेवढ्या पुरता हा प्रश्न मर्यादीत नाही. हा मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रश्न आहे.

**मा. महापौर :-**

अधिकारी खुलासा करतील सदस्य आपण खाली बसून घ्या.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आम्ही ठराव मांडलेला आहे आणि त्याला अनुमोदन ही दिलेले आहे. ठराव मी मांडलेला आहे. तुम्हाला कोणाला पांघरूण घालायचे असेल तर घाला.

**परशुराम पाटील :-**

सन्मा. नगरसेवक शशिकांत भोईर आयुक्त साहेब आता आपल्या प्रश्नाचा खुलासा करत आहे ना. त्याच्याने आपले समाधान होत असेल तर ठिक आहे.

**शशिकांत भोईर :-**

मी प्रस्ताव दिलेला आहे त्याच्यावर ठराव झालेला आहे आपण तो प्रस्ताव मतदानाला टाका.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, गए मा. महासभा मे यह ठराव नक्की हुआ और एक महिनेका समय दिया। एक महिनेके समय मे इन्होने इमिजेटली पेपर नोटीस निकाला और लोगो तक पहुचाया। एक महिनेके बाद हमलोग प्रभाग अधिकारी के पास गए की, यह काम शुरू किया जाए । तो अब तक इन्होने वहाँपर आदेश भेजा ही नही की, यहा कामकाज शुरू करना है। तो क्या किया जाए? आप बताईए अभी?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, हा आपला ठराव आहे या सभेमध्ये आपण ठराव आणलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आपणच विषय पटलावर आणलेला आहे. आपल्या या सभागृहाची खरोखर लज्जास्पद गोष्ट आहे की, आपल्या सभागृहाने मंजुर केलेला ठराव हे अधिकारी मानत नाही. आपल्या ठरावाचा अवमान करतात.

**मोहन पाटील :-**

ठराव एकमताने मंजुर केलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपल्या ठरावाचा अवमान करतात. अशा अधिकाऱ्यांना येथे ठेवायची गरजच नाही. ह्यांना कार्यमुक्त करावे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण मांडलेला जो प्रश्न आहे आणि आपली बाजू ऐकून घेतलेली आहे. अधिकाऱ्यांचाही खुलासा आपण ऐकून घ्या. आपण खाली बसावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ठराव झाला व अनुमोदन ही झाले आहे.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, छह महिने से हम सिर्फ खुलासा ही सुनते आ रहे है। काम नही हो रहा है।

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, जर त्यांना खुलासा ऐकायचा नसेल तर मतदानाची प्रक्रीया चालू करा.

**सुधा गोयंका :-**

हमे काम चाहिए। खुलासा नही चाहिए।

**हॅरल बोर्जीस :-**

ह्यांना खुलासाही पाहिजे आणि खुलासाही ऐकायचा नाही मतदानाचे चालले आहे ते ही करू देत नाही.

**सुधा गोयंका :-**

मॅडम, छह महिनेसे हम खुलासा और माहिती ही ले रहे है।

**मा. उपमहापौर :-**

मा. सदस्यांना विनंती करण्यात येते की, आपण सर्वानुमते हा विषय पारित केला होता. या विषयावरून आतापर्यंत आठ महिन्यामध्ये कित्येक वेळा चर्चा झालेली आहे. एका इमारतीमध्ये समान टॅक्स लागावा, समान घरपट्टी लागावी या विषयाशी संबंधित हा विषय आहे. मागच्या मा. महासभेत आपण हा विषय चर्चेलाही घेतला होता आणि ह्याच्यावर आयुक्तांनी जे आदेश काढलेले आहेत ते आदेशाची माहिती संबंधित नगरसेवकांना व्हावी. सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब आपण खाली बसलात तर मला अधिक आनंद होईल. आपण खाली बसा. तर ह्या विषयावर आयुक्त साहेबांनी आदेश काढले चारही प्रभाग प्रमुखांना, कर संकलकांना कारण आर्थिक बाबीशी निगडीत असलेला हा विषय आहे. ह्याच्यामध्ये समान कर आकरणी केली म्हणजे काय, तर जो कमीत कमी टॅक्स आहे त्याला आपण मुक्त बिंदु धरून बाकी फ्लॅटचे टॅक्स कमी करणार, बाकी सदनिकांचे टॅक्स कमी करणार आहोत. त्याच्यामुळे उत्पन्नाच्या प्रमुख स्त्रोतांपैकी घरपट्टी हे एक प्रमुख स्त्रोत आहे. ह्या स्त्रोतावर थोडासा फरक पडणार आहे. घरपट्टी कमी होणार. घरपट्टीच्या उत्पन्नाच्या या प्रमुख स्त्रोतावर किती उत्पन्न आहे. यासाठी सर्व डिपार्टमेंटसकडून आपण अहवाल मागवलेला आहे आणि प्रत्यक्ष कामकाजाला सुरूवात केलेली आहे. मला वाटते त्या विषयात ह्या विकमध्ये किंवा पुढच्या विकमध्ये प्रशासनाने जे आलेले अर्ज आहेत. ज्यांचे हाउस टॅक्स कमी करायचे आहे किंवा जुन्या बिलाप्रमाणे, जुन्या सदनिकेच्या टॅक्सप्रमाणे ते करायचे आहे. त्याच्यासाठी येथे मिटींग बोलावलेली आहे आणि याबाबत प्रशासनाने नेमकी काय हालचाल केलेली आहे. आपण केलेल्या ठरावावर काय काय कार्यवाही झालेली आहे हे पहिल्यांदा प्रशासनाकडून ऐकून घ्या व आपला जो ठराव मांडलेला आहे त्या ठरावाला आमचा कोणाचा विरोध नाही. परंतु, प्रत्यक्ष कार्यवाही काय केलेली आहे ती तुम्ही ऐकून न घेता फक्त आमच्या ठरावाच्या बाजूने मतदान घ्या विरोधात मतदान करा. म्हणजे तुम्हाला काय वाटते तुम्ही ठराव असा मांडला ह्याप्रमाणे कार्यवाही

होईल ती झाली नाही तर आम्ही सांगू की, ही कार्यवाही होवू नये असा ठराव मांडू असे तुम्हाला वाटते का? आम्ही समाजाच्या विरोधात नाही. जो ''ज'' चा प्रस्ताव आलेला आहे आणि आपण असे विषय मा. महासभेच्या समोर यावेत असा जर प्रयत्न आपल्याला करायचा असेल तर संबंधित विषय आपण मा. महापौरांकडे, आयुक्त साहेबांकडे आधीच ॲडव्हान्समध्ये दिले तर ''ज'' चे प्रस्ताव आणण्याची गरज नाही. हा सर्वांच्या हिताचा प्रश्न आहे. ह्यात चुकीचे काहीच नाही. आपण आता बोलू नये. प्रशासनाने नेमकी काय भुमिका बजावलेली आहे ते पहिल्यांदा ऐकून घ्यावे.

( सभागृहात गोंधळ )

**शशिकांत भोईर :-**

मा. उपमहापौर साहेबांना माझी विनंती आहे, आपण निवेदन दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. आपल्याला मी कळवू इच्छितो की, जेव्हा माझा प्रस्ताव फेटाळला त्यानंतरच मी प्रशासनाकडे मागणी केलेली आहे आणि आपण बोलत असाल तर आपला समान कर आकारणीचा जो प्रस्ताव होता तो ठराव क्र. ५७ दि. १९/१०/२००५ च्या सभेला पारित झालेला. तद्नंतर दुसऱ्या सभेला जेव्हा विचारले, त्याच्या अगोदर नवव्या महिन्यामध्ये मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल ह्यांनी जेव्हा सभागृहात ठराव आणलेला तेव्हा मॅडमनी स्वतःने पुढाकार घेतला आणि मॅडमने सांगितले की, हा विषय सविस्तर विषय पटलावर येईल आणि सविस्तर माहिती मिळेल. त्यानंतर तो विषय विषयपटलावर येउन सुद्धा अधिकाऱ्यांनी, या प्रशासनाने कोणताही गोषवारा दिलेला नाही की, एवढ्या रक्कमा निर्लेखित करायच्या आहेत, एवढी प्रकरणे निकाली काढायची आहेत. असा कोणताही गोषवारा दिला नाही. प्रशासनाने आपले हात पुरते वर करून ठेवले आणि तद्नंतर हा प्रॉब्लेम उत्पन्न झाला आणि आजपर्यंत कोणीही त्याच्यावर कार्यवाही केलेली नाही. दहाव्या महिन्यात हा प्रस्ताव झालेला आहे.

**मा. उपमहापौर :-**

ती कार्यवाही का केली नाही हे आपण ऐकून घ्या. प्रशासनाने काय कार्यवाही केली ती तुम्ही ऐकून घ्या ना.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, प्रत्येकवेळी त्यांनी ......

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब आपला वेळ जेवढा महत्वाचा आहे. तसाच सगळ्या सदस्यांचा वेळ महत्वाचा आहे. प्रशासनाची कार्यवाही काय केली ती तर ऐकून घ्या.

**शशिकांत भोईर :-**

ठिक आहे त्यांना बोलू द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, माझा पहिला प्रस्ताव होता. माझ्या प्रस्तावाचे काय झाले? तोही अपंगाचा विषय आहे आणि आज अपंग हे आपल्या कार्यालयात फेरी मारतात. त्यांचे जे जुने अपंगाचे लायसन्स आहे ते रिन्युअल करत नाही. सचिव साहेब सांगतात की ते माझ्या अधिकारात नाही. ए.टी.पी. सांगते की माझ्या अधिकारात नाही. हा अपंगांचा विषय आहे. माझा विषय नाही.

**संभाजी पाणपट्टे ( मा. उपायुक्त सो. ) :-**

एकाच इमारतीबद्दल .......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, पहिल्यांदा माझ्या विषयाबद्दल, सचिव साहेबांकडे मी तीनदा गेलो की, ह्याबद्दल आपण काय भुमिका घेता? ए.टी.पी. कडे गेलो तर ते सांगतात आमच्याकडे नाही शेवटी अपंगाने कोणाकडे जायचे?

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल ह्यांनी ''ज'' चा प्रस्तावाखाली जो प्रश्न दिला आहे त्याचा दोन शब्दात खुलासा केला तर होउन जाईल ना. मॅडम, कशासाठी विषय फेटाळण्यात काय अर्थ नाही. दोन शब्दांचा तो विषय आहे. उत्तर दिले तर होउन जाईल.

**रतन पाटील :-**

साहेब, फेटाळता कशाला? दोन दोन ओळीचे उत्तर दिलेतर होउन जाईल.

**संभाजी पाणपट्टे ( मा. उपायुक्त सो. ) :-**

एकाच इमारतीत समसमान आकारणी बाबत आणि सर्व कायद्याच्या बाबी तपासून एकाच इमारतीला वेगवेगळ्या कर कराने कराची आकारणी झाली त्या संदर्भात कायद्यामधील सगळ्या बाबी तपासायला वेळ लागला. त्या संदर्भात आम्ही ठाणे महानगरपालिका, कल्याण - डोंबीवली महानगरपालिका, इतर महानगरपालिकेत पाहणी केली की त्याची पद्धत काय आहे? या संदर्भात कायद्यात कसे काय बसवता आले त्याची पाहणी केली. मध्यंतरी काळामध्ये आपटे वकील हायकोर्टचे यांचे सुद्धा या संदर्भात गाईडन्स मागवले. असा ठराव कुठल्याही महानगरपलिकेत न केल्यामुळे कुठल्या कायद्यात व्यवस्थित बसवून आपल्याला ऑडीटचे प्वॉईंट येउ नये म्हणून सगळे जे कायदे आहेत ते तपासल्यानंतर मा. आयुक्तांनी दि. १३/०४/०६ रोजी कार्यालयीन आदेश दिला की, आता मताला आलो की, हा ठराव कशाप्रकारे इम्पलिमेंट करावे या संदर्भात

१३/०४/०६ रोजी कमिटी स्थापन केली आहे या कमिटीच्या समोर हे प्रकरणे येतील त्यानुसार दि. १८/०४/०६ रोजी वर्तमानपत्रामध्ये दिले मुंबई संध्या, नवशक्ती व जनसंध्या या वर्तमान पत्रामध्ये प्रसिद्धी दिलेली आहे आणि प्रभाग अधिकाऱ्यांना या संदर्भात सुचना देउन माहिती गोळा केलेली आहे की अशी कार्यवाही चालू आहे आणि २५ - ३० प्रकरणे आमच्या कमिटी पुढे आलेली आहेत त्या संदर्भात उणीव होत्या त्या संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**शशिकांत भोईर :-**

जे आता पाणपट्टे साहेबांनी वक्तव्य केले ते खरोखर चुकीचे आहे कारण ठराव जेव्हा झाला. मॅडमनी जेव्हा विषय सविस्तर विषयपटलावर आणला त्यावेळी प्रशासनाला आठवण नव्हती का? निर्लेखित रक्कमा कराव्या लागतील. एवढी प्रकरणे येणार आहेत. त्याचा बोझा आपल्या महानगरपालिकेवर पडणार आहे की, नागरिकांवर पडणार आहे ह्याचा विचार प्रशासनाला नव्हता का?

**संभाजी पाणपट्टे ( मा. उपायुक्त सो. ) :-**

वसुली चालू होती.......

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तुमचे आम्ही ऐकले ना. आता गप्प बसायचे तुम्ही. प्लीज. ज्यावेळी त्यांनी ठराव आणला त्यावेळी प्रशासनाने गोषवारा देणे गरजेचे होते. त्यावेळी त्यांनी गोषवारा का दिला नाही? त्यानंतर त्यांना आठवले का, आपल्या रक्कमा निर्लेखित होतील, ऑडीट पॉईंट निघेल. साहेब, हे सर्व पळवाटा आहेत आणि जेव्हा ठराव पारित झाला त्यानंतर प्रत्येक मिटींगला समान कर आकारणीच ''ज'' चा प्रस्ताव आलेला आहे, वारंवार आणि शेवटच्या मिटींगला सुद्धा सन्मा. सदस्य शशिकांत शाह ह्यांनी जो प्रस्ताव आणलेला. का आणलेला तर ह्यांच्यापासून कार्यवाही होतच नव्हती. हे बोलत असतील की, त्याच्यात वेळ गेला. तसे नाही. पण काम करण्याची त्यांची क्षमताच नाही. त्यांनी लोकांचे काम करायला पाहिजे. त्यांना वाटते की, नागरिकांकडून पैसे आम्हाला मिळतील की, नगरसेवकांना मिळतील. हाच मुद्दा येथे उपस्थित आहे आणि मागच्या सभेमध्ये सन्मा. सदस्य शशीकांत शाहा यांनी जो ठराव मांडला होता तो मंजुर झालेला ठराव ह्यांनी प्रभाग अधिकाऱ्यांकडे पाठविला नाही. त्यामुळे ठराव काय झाला आहे असे प्रभाग क्र. ३ चे प्रभाग अधिकारी आम्हाला बोलले त्यानंतर ह्या प्रश्नाला वाचा फुटली. असा जो अकार्यक्षम अधिकारी आहे त्यांना कार्यालयीन कामकाजाचे ज्ञान नसेल अशा अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करा असा मी बरोबर ठराव मांडला आहे आणि त्या अधिकाऱ्याला पशुसंवर्धन ह्या पदावर पदोन्नती देता खाली उतरावे असा मी ठराव मांडत आहे.

**लिला पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, मागे दोन तीन दिवसापुर्वी माझ्याकडे एक प्रकरण आलेले आहे. ज्या बिल्डींगमध्ये टॅक्स कमी आकारणीच्या हिशोबाने, पहिले टॅक्स नविन आकारणीच्या हिशोबाने लागलेले आहे आणि त्याच बिल्डींगला त्याच्यानंतर दुसऱ्या फ्लॅटधारकाला दोन. त्याने कसे काय लावून घेतले हे मला माहित नाही. त्यांना जुन्या आकारणीच्या हिशोबाने लावलेले आहे व आता तुम्ही समान आकारणीच्या हिशोबाने लावणार आहात तर त्या बिल्डींगला लागलेले पहिले टॅक्स नविन आकारणीच्या हिशोबाने लावलेले आहे. मग त्या जुन्या आकारणी वाल्यांवर तुम्ही अन्याय करणार की नविन आकारणी वाल्याला न्याय करणार? साहेब, माझा मुद्दा आपल्याला अजुन समजला नसेल. त्या बिल्डींगला पहिली आकारणी नविन कर आकारणीच्या हिशोबाने झालेली आहे. दोन फ्लॅटधारकाने कुठेतरी वशीला लावून घेतलेले आहे. बाकी सर्व बिल्डींगला नविन आकारणी लागलेली आहे. मग त्यांना तुम्ही कुठला कायदा करणार आहात?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, जेव्हा आपण ठराव आणला तर एकतर प्रशासनाने आपल्याला टिपणी दिली पाहिजे होती आणि आता समिती स्थापन केली आहे. समिती त्याची देखरेख करत आहे. हे सर्व सभागृहाची दिशाभुल करण्याचा हेतू आहे. दिशाभूल करण्याचा हेतू आहे. एकतर येथे प्रशासनाने ठरावच आणून दिला नाही पाहिजे आणि मा. महापौरांनी ठराव आणल्यानंतर त्याच्यावर आता नविन समिती स्थापन केली. डोंबीवली महानगरपालिकेत गेले, कोर्टामध्ये गले हे कशाला, कशासाठी? आपण कशासाठी सभागृहाची दिशाभूल करता आणि त्यानंतर लक्षवेधी आली. लक्षवेधीमध्ये आपण सांगितले की, मार्च नंतर ह्याच्यावर कार्यवाही करू आणि हे वेळोवेळी हे ह्या सभागृहाची दिशाभूल करत आहे हे सभागृहामध्ये स्पष्ट दिसून येत आहे.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, हा जो प्रश्न उपस्थित झाला होता व तो दोन वर्षापूर्वी आणि हा प्रश्न मीच उपस्थित केला होता आणि त्यापद्धतीने ठराव झाला. त्याच पद्धतीने अंमलबजावणी करायची म्हणजे मार्च अखेरनंतर करण्यात यावी असे झाले होते पण आता मघाशी पाणपट्टे साहेबांनी माहिती दिली तर प्रत्येक महानगरपालिकेत ठाणे, भिवंडीमध्ये विचारपूस केली तर आपल्याला कशाला असे म्हणायचे आहे की, नविन टॅक्स घेतला नाही की जुना टॅक्स घेतला नाही असे म्हणायचे आहे का? तर नविन टॅक्स घेतला असेल तर नविनच सर्व्हे करा जुना असेल तर जुना सर्व्हे करा. मग इथे तिथे इनक्वायरी करण्याची

आवश्यकता ही नाही. हे थोडक्यामध्ये काम आहे. हे आपल्या प्रशासनाचे काम आहे. आपण हे करू शकतो. जास्तीत जास्त मिरा भाईंदरमध्ये किती फ्लॅटस असतील तर बारा ते पस्तीस एक हजार फ्लॅट असतील आणि गावोगावी असतील ते वेगळे. जास्त नाही आणि ह्याच्यावर मी सुद्धा अर्ज दिलेला आहे. ते मला वाटते, आपल्या डिपार्टमेंटतर्फे कार्यवाही करण्यात यावी जुने असेल तर जुनेच घ्या. नविन असेल तर नविन घ्या.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, आपकी इजाजत से बोलना चाहूँगी, आयुक्त साहब को भी पता है। इसी विषय के उपर मै उनकी केबिन मे बैठकर विषयको चर्चा मे लिया था। अभी जैसे पाणपट्टे साहबने बताया की, नवशक्ती पेपर के अंदर उन्होने भेजा था। भेजा था तो फिर उन्होने प्रभाग अधिकारी को वह आदेश क्यो नही भेजा। जब अपनी मा. महासभा मे यह नक्की हो गया था की, गए महिने मे और उन्होने नोटीस भी निकाल दी तो फिर प्रभाग अधिकारीयो के पास वह आदेश न भेजने का कारण क्या है? वह कामकाज को शुरूआत क्यो नही किया गया? हमारा बस यही प्रश्न था और कामकाज शुरू नही हुआ इसलिए हमको यह प्रस्ताव लाना पडा और यह इतनी बडी भूमिका निकामी पडी। अगर कामकाज होता तो हमे बोलना ही नही पडता था ना।

**मा. आयुक्त :-**

समान कर आकारणीच्या बाबतीमध्ये सन्मा. सदस्यांनी जे काही प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित केलेले आहेत त्याच प्रमाणे ''ज'' खालचे प्रस्ताव जे सादर केलेले आहेत. सन्मा. सदस्य शशिकांत भोईरजी आपण खाली बसलात तर बरे होईल.

**शिवप्रकाश भूदेका :-**

मा. महापौर मॅडम, यह जो बडा बडा होर्डींग लगा हूआ है। मा. पालक मंत्री, मा. गिल्बर्टजी मेंन्डोन्सा की हमने टॅक्स कम करके दिया है और प्रस्ताव तो हमारा था लेकिन विरोधी पक्षनेता बोलते है की, यह मेरे प्रयत्न से हुआ है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

वह भी उनका ही पार्ट है।

**शिवप्रकाश भूदेका :-**

मतलब राष्ट्रवादी वाले भी झुठे है क्या? चार साल से सत्ता का सुख भोग रहे थे। अभी थोडा विरोध पक्ष बदल गया मतलब ऐसा एक साल से प्रॅक्टीस कर रहे है।

**मोहन पाटील :-**

कोई पार्टीका क्रिटीकल बात मत करो।

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या नावाने मोठ - मोठी होर्डींग लावली आहेत.

**मोहन पाटील :-**

तुम्ही हॅन्ड बिल आणा, आम्ही काहीच केले नाही. ठराव पहिला मी मांडला, स्थायी समितीमध्ये जेव्हा मी पहिल्यांदा सभापती झालो तो विषय नाही. विषय असा आहे की, लोकांचा विषय सुटला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही पालकमंत्र्यांच्या नावाची कशाला बदनामी करता? पालकमंत्र्यांच्या नावाने बोर्ड लागलेला आहे की समान कर आकारणी पालकमंत्र्यांनी केलेली आहे का? कशाला पालकमंत्र्यांची बदनामी करता?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या.

**शिवप्रकाश भूदेका :-**

पालकमंत्री येथे सदनामध्ये आले होते का?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी सभागृहामध्ये जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या संदर्भामध्ये मी सन्मा. सदस्यांना खुलासा करू इच्छितो की, समान कर आकारणी करण्याबाबतचा जो ठराव मा. महासभेने पारित केलेला आहे. त्याप्रमाणे त्या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाने पावले उचललेली आहेत. शेवटी हा जो ठराव पारित झालेला आहे. त्या ठरावाची अंमलबजावणी करत असताना पुढच्या दृष्टीकोनातुन ऑडीटच्या दृष्टीकोनातुन ज्या आपल्याला अडीअडचणी येणार आहेत. त्या सुरूवातीपासूनच सोडवण्याचा आपण प्रयत्न करत आहोत. याठिकाणी पाच किंवा दहा हजाराची रक्कम आपण निर्लेखित करत नाही. तर पन्नास लाखाच्या वर आपल्याला रक्कम आपण निर्लेखित करायची आहे. पहिली गोष्ट म्हणजे आपण याठकाणी जो प्रस्ताव पारित केलेला आहे त्या ठरावाची अंमलबजावणीला प्रशासनाने आता सुरूवात केलेली आहे आणि नागरिकांच्या माहितीसाठी आपण एक नोटीफिकेशन जाहिर केलेले आहे आणि त्यांच्याकडून काही सुचना मागवलेल्या आहेत. जर समजा ही अंमलबजावणी होत असताना जेवढे आपल्याकडे अर्ज आलेले आहेत तेवढ्यांवरच आपण फक्त कार्यवाही करणार का? किमान ज्या नागरिकांनी महापालिकेला जे सहकार्य केलेले आहे, कर भरून सहकार्य केलेले आहे त्यांना आपण न्याय देणार नाही का? ह्या सगळ्या बाबींचा विचार करायला पाहिजे आणि त्या सगळ्या बाबींचा विचार करून प्रशासनाने ही भुमिका घेतलेली आहे म्हणून आपण एक जाहिरात

नागरिकांच्या माहितीसाठी जाहिर नोटीस पब्लिश केलेली आहे आणि त्याला एक ठराविक मुदत दिलेली आहे. त्या मुदतीमध्ये आपल्याकडे जेवढ्या तक्रारी येतील त्यांना न्याय देण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत.

**शशिकांत भोईर :-**

आपण हे किती महिन्यांनी करणार आहात ह्याचा मला खुलासा नको. पण मी एवढेच सांगेन की, ज्या अधिकाऱ्याला या घरपट्टी कराबद्दल आस्था नसेल, माहिती नसेल, प्रशासनाचा कारभार फक्त मी पशुसंवर्धक मधला चिकित्सक आहे. या पदाचा जर अनुभव असेल तर मी सांगितले मी माझा प्रस्ताव बदली केला. तसे करा. त्यांना त्या पदावर आणा. उपायुक्त का पाहिजे? त्यांना जर अभ्यासच नसेल त्या गोष्टी ज्ञात नसेल, हे अगोदर माहित नव्हते पण जेव्हा हा प्रस्ताव घेतला तेव्हा ऑडिटचा पॉईंट येणार हा मुद्दा सर्वांना माहित होता. मग आपण प्रशासनातर्फे गोषवारा का दिला नाही?

**मा. आयुक्त :-**

गोषवारा देण्याची तरतुद, सन्मा. सदस्य आपण एक गोष्ट लक्षात घ्या की, हा ठराव मा. महासभेमध्ये पारित झालेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

गोषवारा द्यायला पाहिजे होता.

**मा. आयुक्त :-**

कशाला?

**शशिकांत भोईर :-**

प्रशासनाच्या बाजूने.

**मा. आयुक्त :-**

प्रशासनाने जर हा विषय समोर आणला असता तर नक्की गोषवारा दिला असता.

**शशिकांत भोईर :-**

महापालिकेचे एवढे आर्थिक नुकसान होणार आहे. त्यामुळे महापालिकेने विचार करावा असा तुम्ही कधी गोषवारा दिला नाही. फक्त आपल्या अंगावर आले तर, गोषवारा कारण सांगून ऑडीट प्वॉईंट निघतील, हे निघतील असे.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, अभी आयुक्त साहबने कहा की, हम लोगोने ऑडीट पे जानकारी निकाली। यह छह महिनेसे चल रहा है। ऑडीट के अंदर जानकारी निकालनेका काम पहिले ही हो चुका था। गए महिने के ठराव के अंदर नक्की किया गया, फिर उन्होंने पेपर के अंदर पब्लिश क्यो किया की, पब्लिक आकर अर्जी दो और जिनके टॅक्स एक समान नही है वह लोग अपने अपने काम करवा के लेके जाए तो यह नोटीस नही छपनी चाहिए थी और यह गए महिने के ठराव मे इनकी नक्की नही करना चाहिए था। गए महिने मे मुदतवाढ दी थी।

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्या सुधा गोयंका मॅडम, आप एक ही बात कई अरसे से कह रही हो।

**सुधा गोयंका :-**

हम आपको कही अरसे से समझाना चाह रहे है। इसलिए आप चूप है। चलो हम मानते है की, हम ना समझ है पर अधिकारी तो समझदार है ना।

**मा. उपमहापौर :-**

आप सुनो, यह सार्वजनिक सुचना है, यह पेपर मे आनी जरूरी है क्योंकी जिनके मॅटर है उन्हके अपने पास मॅटर आने चाहिए। इसके लिए यह एक प्रोव्हीजन है। जमीन बेचते है ना तो जमीन का भी पेपर नोटीस निकालते है। यह तो कोई भी महानगरपालिका मे ऐसा निर्णय अभीतक नही हुआ है की, लगे हुए टॅक्स कम करनेके, अपने उधर यह प्रस्ताव आठ महिनेसे हर सदस्यने रखा है और इसका श्रेय लेने का सभीने प्रयत्न किया है।

**सुधा गोयंका :-**

श्रेय की बात ही नही है।

**मा. उपमहापौर :-**

श्रेय लेने का प्रयत्न किया है। सन्मा. सदस्य शशिकांत भोईरजी आपका उस अधिकारी से कोई विषय मे ज्यादा कुछ लढाई हुई है इसलिए आपने प्रतिष्ठा बनाई है।

**सुधा गोयंका :-**

साहब, ऐसी कोई भी बात नही है, यह गलत बात है।

**शशिकांत भोईर :-**

प्रतिष्ठेचा प्रश्न येत नाही. हा नागरिकांचा प्रश्न आहे. आमचे नाही.

**मा. उपमहापौर :-**

ऐकून घ्या. आपल्याला दाखवले ना चार प्रभाग अधिकाऱ्यांची नियुक्ती त्याच्यावर केलेली आहे. उद्या मिटींग होणार हेही सांगितले. पंचवीस प्रकरणे निकाली निघतात हेही सांगितले आणि हे असे असताना आपण, काम चालू आहे. उशिर झालेला आहे. परंतु, काम करायचे आहे आणि सर्व नगरसेवकांसाठी श्री. पाणपट्टे हे अधिकारी किंवा अन्य कोणी अधिकारी माझा नातेवाईक नाही. परंतु, शासन प्रशासन एकमेकांच्या हातात हात घालून चालले पाहिजे. अशाप्रकारे कोणाला तरी आपण अपमानित करतोय हे योग्य वाटत नाही.

**सुधा गोयंका :-**

साहेब, वह हमको अपमानित करेंगे तो चलेगा।

**मा. उपमहापौर :-**

मै बोलता हू ना कि किधर ना किधर तो लढाई हुई है। हकीकत बोल रहा हूॅ ना, कि किधर ना किधर तो लढाई हुई है। इसलिए आप इतनी जोरसे बात कर रहे हो।

**सुधा गोयंका :-**

कारण क्या हुआ है?

**शशिकांत भोईर :-**

काही लढाई नाही. नागरिकांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न आहे.

**मा. उपमहापौर :-**

शासन प्रशासन हातात हात घालून चालल्याशिवाय आपण योग्य न्याय जनतेला देउ शकणार नाही. त्याच्यामुळे सभागृहात अशाप्रकारे तुम्ही आणलेली बाब आहे ती चुकीची आहे असे आम्ही सांगून फेटाळले नाही. त्याच्यावर कार्यवाही चालू आहे असे सांगून फेटाळलेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

कार्यवाही काही कामाची चालू नाही. साहेब, आजपर्यन्त....

**मा. उपमहापौर :-**

कार्यवाही काम चालू आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, जेव्हा शिवमूर्ती नाईक साहेबांनी ह्या महापालिकेत असताना त्यांनी त्यांचा कराचा दर भरावा तेव्हा त्यांनी कसे काय?

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईरजी आपण ठरवून आला असेल की, मला कामकाजच करून द्यायचे नाही किंवा ह्या विषयावर कोणाचे ऐकायचे नाही.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आपले मी म्हणणे ऐकतो ना.

**मा. उपमहापौर :-**

कार्यवाही सुरू आहे हे सांगूनही आपल्याला का कळत नाही.

**शशिकांत भोईर :-**

जेव्हा शिवमूर्ती नाईक साहेब होते तेव्हा त्यांनी त्यावेळी कसा काय अधिकार घेतला?

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला विनंती करण्यात येत आहे, आपण जे ठराव दिलेले आहेत ते दोन्ही ठराव आपण कृपया मागे घ्यावेत. अशी सभागृहाच्यावतीने विनंती करतो.

**शशिकांत भोईर :-**

मी दोन्ही ठराव मागे घेणार नाही. फक्त एकच ठराव जो पहिल्यांदा दिलेला ठराव मागे घेतो आणि दुसरा ठराव आहे त्याच्यावर अंमलबजावणी व्हावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, समान कर आकारणीचा हा जो विषय चालला आहे. ह्याच्यामध्ये दोन ते तीन मुद्दे उपस्थित झालेले आहेत. मा. उपमहापौर साहेबांनी सांगितले की,शासन आणि प्रशासन जोपर्यंत एकत्र येउन काम करणार नाही तोपर्यंत कुठलेही काम होणार नाही. हे आपल्याला मानायला पाहिजे. हा जो विषय समान आकारणीचा आपल्याकडे आला तो पहिल्यांदा सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल ह्यांच्या थ्रु आला आणि मा. महापौर मॅडमने त्याच्यामध्ये इंटरेस्ट घेउन तो विषय विषयपटलावर आणला. त्याच्यामध्ये प्रशासनाचा काही भाग नव्हता. ते आपण सर्व शासकीय लोक, शासन करणारे सर्व पार्टीच्या सदस्यांना ते मान्य करावे लागेल म्हणून ह्या विषयासाठी प्रशासनाने काहीतरी गोषवारा हा त्यांच्यावर अधिकार आहे. कारण तो विषय आपल्याकडून आलेला होता आणि आपण डिस्कशनसाठी हा विषय घेतलेला होता आणि आपण डिसक्शन करून त्यांना ठराव करून दिला. प्रशासनाला आपण ठराव करून दिल्यानंतर त्याच्यामध्ये काय अडीअडचणी येणार, विक पॉईंट किती येणार, किती पैसे कमी होणार, आपल्या बजेटवर काय परिणाम होणार आहे. ह्या सर्वांवर प्रशासनाला लक्ष द्यावे लागते. मग प्रशासनाने लक्ष देताना त्याच्यामध्ये शासन सुटते असे नसते. सर्व

पार्टीचे नगरसेवक बजेटच्या होणाऱ्या कमीमध्ये जबाबदार राहणार. त्याच्यामध्ये आपल्या शहराचा होणारा प्रोग्रेस पण कुठे ना कुठे कमी होणार. ते पण आपल्याला मान्य करून घ्यावे लागेल. म्हणून हा जो समान कर आकारणीचा मुद्दा आहे ते आपण शासनाकडे बसणाऱ्या सर्व नगरसेवकांनी मिळून प्रशासनाकडे ठेवलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य रिटा शाह मॅडम, आपण जो खुलासा त्याबद्दल धन्यवाद. आपण जेव्हा विषय आणलेला तेव्हा प्रशासनाची बाजू नव्हती का, त्यांनी निवेदन करायला पाहिजे होते की, एवढे नुकसान होईल.

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य आपण बोलत असताना मी बोलत नाही. मी तुम्हाला कुठलेही हे देत नाही. आपण मिळून काय केले आहे ह्याची मी तुम्हाला आठवण करून देते. आपण मिळून येथे केले आहे.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, हा माझा प्रश्न आहे. ह्याच्यावर तुम्ही वक्तव्य करण्याची गरज नाही.

**रिटा शाह :-**

तुमच्या प्रस्तावावर मी बोलतच नाही.

**शशिकांत भोईर :-**

माझ्या प्रस्तावावर तुम्हाला बोलायची गरजच नाही.

**रिटा शाह :-**

तुम्ही बोलत असताना आम्ही मध्ये उठून बोलत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतोय की, शहरामध्ये या विषयावर भरपूर चर्चा झाली. परंतु, प्रशासनाने सर्वसामान्य आणि सर्व भाषेच्या लोकांकरिता काय केले आहे ते उपायुक्तांनी सांगितलेले नाही ते मी आता सांगतोय. या हरकती जेवढया आहेत त्या फक्त मराठी पेपरमध्ये आल्या आहेत. हाउस टॅक्स वसुल करण्याकरिता जेव्हा आपण गेटवर, नाक्या- नाक्यावर नोटीसा लावतो तशा प्रकारच्या नोटीसा कुठेही लावलेल्या नाहीत आणि सगळयात कहर म्हणजे आता शाळेच्या सुट्टया झालेल्या आहेत आणि उद्याची त्यांची अंतिम मुदत आहे. दि. १९/५/०६ ही अंतिम मुदत आहे. मी चुकीचे बोलत असेल तर मला बोला. एक महिन्याची मुदत आपण दि. १९/०४/०६ ते १९/०५/०६ पर्यंन्त दिली. आता सांगा जे लोक गावी गेलेले आहेत. भरपूर अख्खे शहर खाली झालेले आहे. अशा लोकांनी काय करायचे? मग तुम्ही परत त्या तारखेवर बोट ठेवणार की, तुम्हाला १९ ला मुदत दिली होती ती आम्ही घालवली. ह्या दोन-तीन महिन्याची मुदत द्या. कारण सहा वर्ष, मी मागच्या हाउसला सुद्धा नगरसेवक होतो. सहा - सात वर्षापासूनचा हा प्रश्न प्रलंबित आहे. सत्ताधारी कोण, निर्णय कोणाचा हे सगळे बाजूला. लोकांच्या हिताकरिता कम से कम ह्या दोन महिन्यांची मुदत वाढवून द्या. १५ जूनपर्यंत लोक आपआपल्या गावावरून येतात. अशा लोकांकरिता आपण काय करणार आहात. ही मुदत वाढवून सर्व गुजराथी, हिंदी, मराठी, इंग्लिश या सगळया पेपरला तुम्ही जाहिरात दिली पाहिजे. नाक्या नाक्यावर आपले ऑक्ट्रायवाले जिथे आहेत तिथे आपली नोटीस मोठ्या प्रमाणावर स्वयंस्पष्ट दिसेल याप्रकारे तुम्ही ती लावली पाहिजे. तर या कारवाईमध्ये सर्व नागरिकांना त्याचा फायदा होईल आणि प्रशासनाने काहीतरी केले असे काहीतरी क्लिअर होईल हे आपण आपल्या उद्गारात कुठेही दिलेले नाही. उद्या आमची अंतिम मुदत संपते. बोला आपण काय करणार आहात? सभागृहामध्ये मुदत वाढवून देणार आहात? कारण हे टेक्नीकली होउच शकत नाही कारण लोक गावी गेले आहेत. माझी विनंती आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर ह्यांनी समसमान कर आकारणी बद्दल विचारलेला 'ज' चा प्रश्न उद्या ही मुदत संपत आहे तर उद्यापासून एक महिन्याची मुदत वाढवून देण्यात यावी व तसेच आतापर्यंत कार्यवाहीला जी दिरंगाई झालेली आहे त्या कार्यवाहीला आपण लवकरात लवकर सुरूवात करून पब्लिकला न्याय मिळवून द्यावा.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, पण माझ्या ठरावाचे काय? मी मागे घेतलेला ठराव आणि अधिकाऱ्यावर कारवाई झाली पाहिजे नाहीतर, अधिकाऱ्यांवर आपण जेवढे पांघरूण टाकणार तेवढे तुम्हाला त्रासदायक होईल आणि आपण सभागृहामध्ये जेवढे ठराव करणार त्याचा अवमान होईल.हे तुम्ही लक्षात ठेवा आणि मी माझा फक्त पहिला ठराव मागे घेतलेला आहे. दुसरा ठराव मी मागे घेत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. उपमहापौर साहेब जे सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब बोलतात, असाच विषय अपंगांकरिता झालेला आहे. पाहिजे तिथे टपरी देतात. कोण जी. आर. वाचत नाही. कोण नियम वाचत नाही. आणि आपसामध्ये भानगडी शहरामध्ये लावतात म्हणजे शेवटपर्यंत कोण कुठपर्यंत बोलत राहिल आणि नगरसेवकांनी आपसात भांडायचे. कुठपर्यंत भांडायचे? ज्याला अधिकार नाही तो टपरी देतो. ज्याला माहित नाही तो टपरी देतो. म्हणजे शेवटी अधिकारी वर्ग कुठल्या डिपार्टमेंटला आहे की, नाही. ही परिस्थिती का निर्माण होते?

**परशुराम पाटील :-**

त्यांनी ठराव मागे घेतला म्हणून सांगितले आहे.

**शशिकांत भोईर :-**

मी पहिला जो ठराव दिला तोच मागे घेतला. दुसरा ठराव मागे घेतलेला नाही.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईरजी आपण दुसरा ही ठराव मागे घ्या अशी मी आपल्याला विनंती करतो.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, मी तुम्हाला विनंती करतो.

**मा. उपमहापौर :-**

हे बघा पुढील कार्यवाहीला...

**शशिकांत भोईर :-**

माझी काय प्रतिष्ठा नाही. हा मी जनहितासाठी मांडलेला प्रश्न होता आणि अधिकाऱ्यांनी दिरंगाई केलेली आहे, हलगर्जीपणा केलेला आहे व त्यांनी आपल्या सभागृहाचा सर्व सदस्यांचा अपमान केलेला आहे. आपण जेवढे ठराव करतो आज त्यांना बोनस द्या किंवा सानुग्रह अनुदान म्हणून काय द्या आणि उद्याला ताबडतोब काय तर ॲक्शन होते. मग या ठरावावर का झाली नाही?

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. उपमहापौरांनी दोन ते तीन वेळा विनंती केलेली आहे आणि जर का ते ठराव मागे घेत नसतील तर रितसर ठरावावर मतदान घ्या आणि हा विषय संपवून टाका.

**मा. उपमहापौर :-**

हे बघा, आपण जी प्रतिष्ठा करतो ह्या प्रतिष्ठेचा आणि आपण उद्या ह्या सगळया जाहिराती करणार आहोत. ज्यांचे टॅक्स कमी करता येत नाही अशीपण लोक उद्या तुम्हा-आम्हा लोकप्रतिनिधींकडे घरी येतील आणि सांगतील आमचा ही हाउस टॅक्स कमी करा. ज्यांचे नियमात बसणार नाही असे ही करतील. सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेबांनी जो ठराव मांडलेला आहे, दुसरा ठराव. पहिला ठराव त्यांनी मागे घेतलेला आहे. 'ज' चा प्रस्ताव. परंतु, असा ठराव मांडता येत नाही. योग्य नाही आणि पुन्हा आपल्याला विनंती करतो की, आपण मनाचा मोठेपणा दाखवून हा ठराव मागे घ्यावा.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आपण आता निवेदन केले की, आपण ठराव मांडू शकत नाही. आपण असे कसे बोलता. आज महापालिकेच्या सदस्याच्या अधिकार आहे. त्या नियमानेच मी हा ठराव मांडला आहे. मी हा ठराव प्रतिष्ठेसाठी न मांडता. आज आमच्या पक्षाचे उपमहापौर चंद्रकांत वैती साहेब ह्यांनी मला विनंती केली. ती विनंती नाही. ते माझे एक चांगले मित्र आहे. त्यांनी मला सांगितल्याबद्दल मी माझे दोन्ही ठराव मागे घेतो. पण जर असे अधिकारी चुकत असेल, या अगोदर अधिकारी चुकत असेल तर या सभागृहाने त्याच्यावर कधीही पांघरूण टाकू नये. असे मी ठामपणे तुमच्या निर्देशनास आणून देतो. यापुढे कधीही माझा ठराव आला तर तुम्ही कधीही विनंती करू नका. धन्यवाद.

**मा. महापौर :-**

सभा संपली असे जाहीर करते.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर ह्यांनी ठराव मागे घेतलेला आहे आणि मा. उपमहापौर साहेब ह्यांच्या शब्दाला किंमत दिली. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतोय. परंतु, प्रशासनाकडून ज्या चुका होतात त्या आपण पाठीशी घालतो हे लक्षात घ्या. मघाशी एक विषय अकरा लाख वसुलीचे त्यावेळेस सुद्धा आपण अशाच तऱ्हेचे वक्तव्य केले आणि आपण एका ठिकाणी म्हणता की, आमचे नुकसान होते, एका ठिकाणी म्हणता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. उपमहापौर साहेब, आपल्याला आमच्या प्रश्नाबद्दल आपुलकी नाही का?

**मा. उपमहापौर :-**

आता आपण सभा संपल्यानंतर माझ्या बरोबर या.

**रतन पाटील :-**

आम्ही मतदानाची मागणी केलेली आहे. आमच्या प्रस्तावाचे काय झाले?

(सभागृहात गोंधळ)

**प्रकरण क्र. ३० :-**

सन्मा. सदस्य श्री. शशीकांत जगन्नाथ भोईर यांचे दिनांक १२/०५/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - समान घरपट्टी कर आकारणी करण्यास अधिकारी टाळाटाळ करीत आहेत अशा अधिकाऱ्यांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ नुसार कारवाई करणेबाबत.

(मा. महापौर सोा. यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आला.)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आपल्याला अपंगांसाठी आपुलकी नाही. आपण असे राष्ट्रगीत घेउन राष्ट्रगीताचे अपमान करू नका. प्रत्येक वेळी राष्ट्रगीत घेउन आपण राष्ट्रगीताचा अपमान करतात त्याचा आम्ही निषेध करतोय.

(जन गण मन या राष्ट्रगीताने सभेचा समारोप केला.)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अपंगांना न्याय न मिळाल्याबद्दल सत्ताधारी पक्षाचा निषेध.

**रतन पाटील :-**

सत्ताधारी पक्षाचा निषेध।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अपंग व्यक्तींना न्याय न देणाऱ्या राष्ट्रवादी आणि काँग्रेस (आय) पक्षाचा जाहिर निषेध, निषेध, निषेध।

**रतन पाटील :-**

विरोधकांचा आवाज दडपणाऱ्या लोकांचा निषेध।

**मा. महापौर :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि कर्मचारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून आपणा सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे मी जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ०५.१० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**